CMYK

आज बुद्धपौर्णिमा



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, १ मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ५४ | पाने १२ | किंमत रु. ८/-
■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


सोलापूर **तरुण भारत** प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

**उद्या अंक नाही !**

शुक्रवार दि. १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे शनिवार, दि. २ मे २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

## विचारपुष्प



भारतीय तत्त्वज्ञांनी कोणत्याही अत्यंत क्लिष्ट उपकरणांचा उपयोग केला नाही, परंतु सत्याच्या अनुभूतीचा प्रयत्न केला. ते हजारो वर्षांपूर्वी या निष्कर्षाला आले की प्रकृतीत सर्वत्र ब्रह्म आहे. हे ब्रह्म पाहता येत नाही आणि त्याचे वर्णन करता येत नाही. म्हणून समग्र हिंदू आध्यात्मिक विचार आपल्याला आधुनिक विज्ञानाच्या शोधाकडे नेतो जो शोध आपल्याला ब्रह्मांडाच्या परम ऐक्याचा आभास करून देतो.

**- स्व. प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# विधान परिषद बिनविरोध

## काँग्रेसने माघार घेत अंबादास दानवेंना पाठिंबा; शिंदेंचा 'कडू घोट गोड'

◆ **मुंबई, ३० एप्रिल**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या १० जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत अखेरच्या क्षणी मोठे राजकीय फेरबदल पाहायला मिळाले असून, ही निवडणूक आता बिनविरोध होण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. महाविकास आघाडीतील जागावाटपाचा पेच सुटल्याने काँग्रेसने माघार घेतली, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडू यांना शिवसेनेत प्रवेश देऊन 'कडू घोट गोड' करीत महायुतीची बाजू भक्कम केली आहे.

१० जागांसाठी आता केवळ १० उमेदवार रिंगणात उरल्याने १२ मे रोजी होणारी निवडणूक ही केवळ औपचारिकता उरली असून, सर्व उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित मानली जात आहे

**काँग्रेसची 'अट' आणि अंबादास दानवेंना पाठिंबा**

शिवसेना ठाकरे गटाने अंबादास दानवे यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर महाविकास आघाडीत निर्माण झालेली धुसफूस आता शांत झाली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेस निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट करीत दानवे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. मात्र, हा पाठिंबा देताना काँग्रेसने भविष्यातील राज्यसभा आणि विधान परिषदेच्या जागांवर आपला दावा ठोकला आहे. उद्धव ठाकरे यांनी ही अट मान्य केल्याने आघाडीतील बिघाडी टळली असली तरी, यामुळे संजय राऊतांच्या पुढील राजकीय कारकीर्दीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. यावेळी मात्र अंबादास दानवेंचा विधान परिषदेवर जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**नीलम गोऱ्हेंवर पुन्हा विश्वास**

महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली पकड पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. शिवसेनेतील काही मंत्र्यांचा आणि नेत्यांचा विरोध डावलून शिंदे यांनी नीलम गोऱ्हे यांना पुन्हा संधी दिली आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून नाराज असलेले प्रहार जनशक्ती संघटनेचे बच्चू कडू यांनी अधिकृतपणे शिवसेनेत प्रवेश केला असून, त्यांना विधान परिषदेची उमेदवारी दिली आहे. संघर्ष करणारे नेते म्हणून ओळख असलेल्या कडूंच्या रूपाने शिवसेनेला विदर्भात एक आक्रमक चेहरा मिळाला आहे.

**काँग्रेसची मुत्सद्देगिरी**

विधान परिषदेतून माघार घेऊन काँग्रेसने 'मोठ्या भावाची' भूमिका बजावली असल्याचा आव काँग्रेस आणत असली तरी, आगामी राज्यसभेच्या जागेची बेगमी करून, काँग्रेसने आतापासूनच ठाकरेंना कोंडीत पकडले आहे.

**शिंदेंचा 'कार्यकर्ता' पक्ष**

हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे, मालकांचा नाही, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे. नीलम गोऱ्हेंना दिलेली उमेदवारी हा महिला नेतृत्वाला दिलेला सन्मान असल्याचे अधोरेखित केले. ◀*(तभा वृत्तसेवा)*



विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर भाजपाचे उमेदवार सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे टिपलेले छायाचित्र

### विधान परिषदेचे उमेदवार

**भाजपा**
**सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार, प्रज्ञा सातव** (रिक्त जागेसाठीची पोट निवडणूक)

**शिवसेना**
**नीलम गोऱ्हे, बच्चू कडू**

**राष्ट्रवादी काँग्रेस**
**झिशान सिद्दीकी**

**उबाठा गट**
**अंबादास दानवे** (मविआ) ■

### भाजपाचे 'सोशल इंजिनीअरिंग' आणि राकाँचे झिशान सिद्दीकी

**भाजपाने आपल्या सहा उमेदवारांच्या यादीत जुन्या आणि नव्या चेहऱ्यांचा समतोल साधला आहे. माधवी नाईक, प्रज्ञा सातव आणि विवेक कोल्हे यांच्या माध्यमातून भाजपाने विविध आघाड्यांवर मोर्चेबांधणी केली आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसने झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी दिली आणि अल्पसंख्याक मतांचे गणित जुळवण्याचा प्रयत्न केला आहे.** ■

### बच्चू कडूंचा 'प्रहार' आता शिवसेनेतून!

**बच्चू कडू यांचा पक्षप्रवेश हा महायुतीसाठी विदर्भात बळ देणारा ठरू शकतो. मात्र, प्रहारची स्वतंत्र ओळख पुसली गेल्याने कडूंचे समर्थक याकडे कसे पाहतात? आणि शिवसेनेचे कार्यकर्ते कडूंना स्वीकारतात का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.** ■

# जनगणनेसाठी महाराष्ट्र सज्ज

### २.६४ लाख कर्मचाऱ्यांची फौज मैदानात

### स्वयं-नोंदणीला १ मे पासून सुरुवात

### १६ मे पासून प्रत्यक्ष गृहभेट

◆ **मुंबई, ३० एप्रिल**

देशाच्या १६ व्या जनगणनेच्या (जनगणना २०२७) तयारीला महाराष्ट्रात वेग आला असून, ही संपूर्ण प्रक्रिया अत्याधुनिक डिजिटल स्वरूपात पार पडणार आहे. राज्याच्या जनगणना संचालनालयाने गुरुवारी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत या मोहिमेची घोषणा केली. येत्या १ मे पासून नागरिकांना सेल्फ इन्युमरेशन म्हणजेच स्वतःहून आपली माहिती नोंदवता येणार असून, १६ मे पासून प्रगणक प्रत्यक्ष घराघरांत भेट देऊन माहिती संकलित करणार आहेत.

राज्यात १ मे ते १५ मे या कालावधीत स्वयं नोंदणी केली जाणार असून, १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रत्यक्ष गृहभेट आणि नोंदणी होणार आहे.

मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी सांगितले की, भारत सरकारच्या डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत ही देशातील पहिलीच डिजिटल जनगणना आहे. यासाठी मोबाईल ॲप्लिकेशन्सचा वापर केला जाणार आहे. जनगणना देखरेख आणि व्यवस्थापन प्रणाली वेब पोर्टलद्वारे यावर लक्ष ठेवले जाईल. विशेष म्हणजे, नागरिकांच्या सुविधेसाठी ऑनलाईन स्वयं-नोंदणीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**२.६४ लाख कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण**

या अवाढव्य मोहिमेसाठी महाराष्ट्रात सुमारे २.६४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक तैनात करण्यात आले आहेत. जिल्हा आणि तालुका स्तरावर ५-स्तरीय प्रशिक्षण पूर्ण झाले असून, २३ एप्रिलपासून ८ मे पर्यंत प्रगणकांचे अंतिम प्रशिक्षण सुरू आहे. हे सर्व कर्मचारी १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रत्येक कुटुंबाला भेट देतील.

◀*(तभा वृत्तसेवा)*

### स्वयं-नोंदणी कशी कराल?

**१ ते १५ मे या कालावधीत अधिकृत पोर्टलवर जाऊन कुटुंबातील कोणताही एक सदस्य १५-२० मिनिटांत माहिती भरू शकतो. यशस्वी नोंदणीनंतर नोंदणीकृत मोबाईलवर एक सेल्फ इन्युमरेशन आयडी प्राप्त होईल. महत्त्वाचे म्हणजे, यासाठी कोणतेही कागदपत्र अपलोड करण्याची आवश्यकता नाही.** ■

> **जनगणना हे केवळ आकडेवारी संकलन नसून, राज्याच्या विकासासाठी आणि अचूक धोरण आखणीसाठी आवश्यक असलेले राष्ट्रीय कर्तव्य आहे. नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन या प्रक्रियेत सहकार्य करावे.**
>
> **- डॉ. निरुपमा जे. डांगे,** मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, महाराष्ट्र



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# यूएई गुंडाळणार पाकिस्तानातील व्यवसाय

## दुबईच्या उद्योगपतीला नोटीस बजावणे भोवले ● गुंतवणूक मागे घेण्याची घोषणा

◆ **दुबई, ३० एप्रिल**

एकेकाळी अत्यंत घनिष्ठ मित्र मानल्या जाणाऱ्या पाकिस्तान आणि संयुक्त अरब अमिरात (यूएई) यांच्यातील राजनैतिक संबंध सध्या टोकाच्या वळणावर येऊन ठेपले आहे. पाकिस्तानने दुबईचे प्रसिद्ध अब्जाधीश मलिक रियाझ यांना अटक करण्यासाठी इंटरपोलची मदत मागितली आणि त्यांना यासंदर्भात नोटीस बजावण्यात आली. यामुळे संतप्त झालेल्या यूएई सरकारने पाकिस्तानातील व्यवसाय बंद करण्याची आणि गुंतवणूक मागे घेण्याची घोषणा केली.

यूएईच्या निर्णयाने डबघाईस गेलेली पाकिस्तानची अर्थव्यवस्था कोलमडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अल-कादिर ट्रस्ट घोटाळा प्रकरणात अडकलेले दुबईचे उद्योगपती मलिक रियाझ यांना अटक करण्यासाठी पाकिस्तान सरकारने थेट

इंटरपोलची मदत मागितली. त्यावरून रियाझ यांना नोटीस बजावण्यात आली. यामुळे दोन्ही देशांतील तणाव आणखी वाढला आहे. अशातच यूएईचे परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार्य मंत्री अब्दुल्ला बिन झायेद अल नाहयान यांनी गुरुवारी समाज माध्यमावरील पोस्टमधून पाकिस्तानातील व्यवसाय बंद करण्याची आणि गुंतवणूक मागे घेण्याची घोषणा केली. त्यानंतर यूएईची दूरसंचार क्षेत्रातील दिग्गज कंपनी एतिसलात यांनीही पाकिस्तानच्या दूरसंचार क्षेत्रातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

### एतिसलातची २६ टक्के हिस्सेदारी

एतिसलातची पाकिस्तानच्या सरकारी दूरसंचार कंपनीत २६ टक्के हिस्सेदारी आहे. एतिसलात कंपनीने गुंतवणूक धोरणाचा आढावा घेत सर्व शेअर्स विकण्याचा निर्णय घेतला आहे. हे पाऊल केवळ यूएईच्या नवीन जागतिक धोरणामुळे उचलले गेले आहे. यापूर्वी यूएईने जगातील सर्वांत मोठ्या तेल-उत्पादक गट असलेल्या ओपेकमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आता पाकिस्तानातील गुंतवणूक मागे घेण्याचा निर्णय घेतल्याने शाहबाज सरकारसाठी हा दुहेरी धक्का आहे. ■

यापूर्वी युएईने आपले ३.५ अब्ज डॉलर्सचे कर्ज वसूल करून पाकिस्तानला मोठा धक्का दिला. यामुळे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचा तीळपापड झाला आणि त्यांनी दुबईच्या उद्योजकाविरोधात अटक वॉरंट काढला, इतकेच नव्हे तर त्यांनी अटकेसाठी इंटरपोलची मदत मागितली. यातून दोन्ही देशातील संबंध विकोपाला गेले.

**कर्ज फेडले पण संबंध बिघडले**

पाकिस्तान आणि युएई यांच्यातील वादाची पाळेमुळे खोलवर आहेत. या वर्षाच्या सुरुवातीला पाकिस्तानने सौदी अरेबिया आणि तुर्कीसोबत मिळून इस्लामिक नाटो बनवण्याच्या हालचाली केल्या होत्या, ज्यामुळे यूएई नाराज झाला. त्यातच इराण युद्धादरम्यान मध्यस्थी करताना पाकिस्तानने यूएईला विश्वासात न घेतल्याने संबंधात अधिक कटुता निर्माण झाली. त्यामुळे कर्ज परतफेडीसाठी यूएईने तगादा लावला. कर्जाची परतफेड करताच दुबईच्या उद्योजकाविरोधात अटकेची प्रक्रिया सुरू केल्याने द्विपक्षीय संबंध अधिक बिघडले. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानवर काय परिणाम होईल?

पाकिस्तानचा एक प्रमुख मित्रराष्ट्र आणि सर्वांत मोठ्या गुंतवणूकदारांपैकी एक असलेल्या यूएईची गुंतवणुकीतून माघार ही पाकिस्तानच्या आधीच डबघाईस आलेल्या अर्थव्यवस्थेसाठी मोठा धक्का आहे. यूएईने सर्व गुंतवणूक काढून घेतली, तर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी पाकिस्तानला मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागू शकते. त्यांच्याकडे सौदी अरेबिया आणि कतारसारख्या देशांवर अवलंबून राहण्याशिवाय पर्याय नाही. ■

# पिकअप-स्कॉर्पिओची धडक; १६ मजूर ठार, २५ जखमी

◆ **धार, ३० एप्रिल**

मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यात मजुरांना घेऊन जाणारे पिकअप वाहन अनियंत्रित होऊन रस्त्याच्या पलीकडे उलटले, त्याचवेळी समोरून आलेल्या स्कॉर्पिओने जोरदार धडक दिली. या अपघातात १६ मजुरांचा मृत्यू झाला, तर २५ जखमी आहे. हा अपघात चिकलिया फाट्याजवळ बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडला. मृतांमध्ये लहान मुले आणि महिलांचाही समावेश आहे.



ही घटना तिरला पोलिस ठाणे हद्दीतील चिकलिया येथील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ घडली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक रहिवासी आणि पोलिस घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही वाहनांचा चक्काचूर झाला होता. क्रेनच्या मदतीने दोन्ही वाहनांना बाजूने केले आणि अपघातग्रस्तांना तातडीने धार येथील शासकीय रुग्णालयात हलविले. डॉक्टरांनी १६ मजुरांना मृत घोषित केले, तर इतर २५ जणांवर उपचार सुरू करण्यात आले.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, पिकअप वाहनात क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे सुमारे ४६ मजूर बसले होते. यामध्ये महिला आणि मुलांचाही समावेश होता. अचानक पिकअप अनियंत्रित होऊन रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला उलटले. त्याचवेळी समोरून येणाऱ्या भरधान स्कॉर्पिओने पिकअपला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की पिकअपचा चक्काचूर झाला आणि त्यातील मजूर रस्त्यावर इतरत्र फेकले गेले.

**पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून शोक**

हृदयद्रावक घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांनी दुःख व्यक्त केले. पंतप्रधानांनी मृत कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केली. दुसरीकडे मुख्यमंत्री यादव यांनी मृतकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख आणि जखमींना दोन लाखांची मदत जाहीर केली. (वृत्तसंस्था)

# अण्वस्त्र नियंत्रण कराराचे इराणकडे उपाध्यक्षपद

## अमेरिकेचा संताप, निर्णयावर आक्षेप

◆ **न्यू यॉर्क, ३० एप्रिल**

इराण आणि अमेरिकेदरम्यान अणुकार्यक्रमावरून युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या नियंत्रणात असलेल्या अण्वस्त्र नियंत्रण कराराच्या उपाध्यक्षपदी इराणची निवड झाली आहे.

न्यू यॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांमध्ये सुरू असलेल्या अकराव्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निवडीवर अमेरिकेने संताप व्यक्त करीत तीव्र आक्षेप घेतला आहे. परिषदेचे अध्यक्ष आणि व्हिएतनामचे राजदूत दो हुंग वियेत यांनी सांगितले की, इराणचे नाव अलिप्त राष्ट्रांच्या गटाकडून आले होते. या गटात भारतासह १०० पेक्षा जास्त देश आहेत. अमेरिकेचे अधिकारी क्रिस्टोफर येओ यांनी निवडीवर आक्षेप घेत म्हटले की, इराण दीर्घकाळापासून अणुबॉम्ब बनवण्याचा प्रयत्न करत आहे. अशा परिस्थितीत त्याला या संघटनेचे महत्त्वाचे पद देणे योग्य नाही. त्याचवेळी इराणने हे आरोप फेटाळून लावले. इराणने म्हटले की, अमेरिकेने स्वतः अणुबॉम्बचा वापर जपानमध्ये केला होता. त्यांच्याकडून सातत्याने अण्वस्त्र क्षमता वाढवली जात आहे. त्यामुळे त्यांना याप्रकरणी आक्षेप घेण्याचा अधिकार नाही. (वृत्तसंस्था)

### कराराचे महत्त्व कायम?

**अण्वस्त्र नियंत्रण करार १९७० मध्ये लागू झाला. जगामध्ये अणुबॉम्बचा प्रसार रोखण्यासाठी ही सर्वांत महत्त्वाची व्यवस्था मानली जाते. ज्या देशांकडे अणुबॉम्ब नाहीत, ते बनवणार नाहीत आणि ज्यांच्याकडे आहेत, ते हळूहळू ते नष्ट करतील या कराराचा उद्देश आहे. हा करार १९६८ मध्ये सुरू झाला आणि १९७० पासून लागू झाला. संयुक्त राष्ट्रांच्या १९५ पैकी १९१ देश या कराराचा भाग आहेत. भारत, पाकिस्तान, इस्रायल आणि दक्षिण सुदान यांचा यात समावेश आहे.** ■


# काश्मिरातील मदरसा दहशतवाद्यांच्या भरतीचे केंद्र

## दारूल उलुम जामिया बेकायदेशीर घोषित ● पोलिसांच्या अहवालावरून कारवाई

◆ **श्रीनगर, ३० एप्रिल**

दक्षिण काश्मीरमधील दारूल उलुम जामिया सिराज-उल-उलुम मदरसा धर्म आणि शिक्षण प्रसाराच्या नावाखाली दहशतवादी घडामोडीचे केंद्र बनल्याचे तपासात उघड झाल्यानंतर राज्य सरकारने तो बेकायदेशीर घोषित केला.

हा मदरसा सुरक्षा दलाच्या चकमकीत ठार झालेल्या दहशतवाद्यांच्या कुटुंबीयांना रोजगार आणि आर्थिक मदत पुरवण्यासाठी एक संघटित माध्यम म्हणून काम करीत होता. जवळपास सहा वर्षे चाललेल्या सखोल तपासानंतर पोलिसांनी सरकारकडे अहवाल सोपवला. त्यानंतर या मदरसा बेकायदेशीर घोषित करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी दिली. काश्मीरमधील




सर्वांत मोठा मदरसा असलेल्या दारूल उलुम जामिया सिराज-उल-उलुमला बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत बेकायदेशीर संस्था म्हणून घोषित करण्यात आल्याचे ते म्हणाले. जमात-ए-इस्लामी आणि इतर फुटीरतावादी संघटनांचे अनेक सदस्य याच मदरशातून बाहेर पडले आहेत.

हा मदरसा काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या आर्थिक जाळ्यातील एक महत्त्वाचा दुवा आहे. विविध स्त्रोतांद्वारे मिळवलेला निधी दहशतवादी आणि फुटीरतावादी कारवायांमध्ये वळवण्यासाठी मदरशाचा वापर केला जात होता. (वृत्तसंस्था)

### विद्यार्थ्यांना बनवायचे इस्लामी कट्टरवादी

हा मदरसा सुशिक्षित कट्टरपंथी दहशतवाद्यांसाठी भरतीचे केंद्र बनला होता. येथे शिकणारे विद्यार्थी, शिक्षक आणि विविध मार्गांनी मदरशाशी संबंधित असलेले लोक कट्टर, हिंसक जिहादी मानसिकतेने ग्रस्त असल्याचे आढळून आले. विद्यार्थ्यांना इस्लामी कट्टरवादी बनविण्याचा त्यांचा अजेंडा असल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. ■

### मदरसाशी संबंधित १७ दहशतवादी ठार

मदरशाशी संबंधित लोक दहशतवादी संघटनेत सामील होण्यास इच्छुक असलेल्या तरुणांचा शोध घ्यायचे. कुलगाम, शोपियाँ आणि पुलवामा येथे अटक करण्यात आलेले अनेक भूमिगत कार्यकर्ते आणि दहशतवाद्यांचे साथीदार हे स्वतः याच मदरशाशी संबंधित होते. हा मदरसा विद्यार्थ्यांमध्ये द्वेष निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत होता. गेल्या आठ वर्षांत सुरक्षा दलांसोबत झालेल्या विविध चकमकींमध्ये याच मदरशातून आलेले १७ दहशतवादी ठार झाले आहेत. ■

## चित्रपट वार्ता

### ‘महावतार’ला विक्की देणार १८ महिने



**मुंबई** : विकी कौशल सध्या संजय लीला भन्साळी यांच्या आगामी ‘लव्ह ॲण्ड वॉर’ या चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे. यानंतर लवकरच तो अमर कौशिक यांच्या ‘महावतार’ या पौराणिक चित्रपटाची तयारी करणार आहे. ‘लव्ह ॲण्ड वॉर’चे चित्रीकरण पूर्ण झाल्यावर जून २०२६ मध्ये तो या चित्रपटाच्या कामाला सुरुवात करणार आहे. या तयारीमध्ये पात्राच्या मानसिक आणि भावनिक पैलूंचा अभ्यास करणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण जानेवारी २०२७ मध्ये सुरू होईल. हे चित्रीकरण एक वर्ष चालेल आणि डिसेंबर २०२७ मध्ये पूर्ण होईल. या काळात, पात्राशी सुसंगतता राखण्यासाठी विकीने केवळ ‘महावतार’वर लक्ष केंद्रित करण्याचा आणि इतर कोणतेही व्यावसायिक काम न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. ■

### जपानीही अनुभवणार ‘ऑपरेशन धुरंधर’ची धून


**बीजिंग** : रणवीरसिंहचा ‘धुरंधर’ चित्रपट १० जुलै २०२६ रोजी जपानमध्ये प्रदर्शित होईल. जपानमध्ये हा चित्रपट ‘ऑपरेशन धुरंधर’ या नावाने प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे नवीन पोस्टरही प्रदर्शित झाले आहे.



‘धुरंधर’पूर्वी रणवीरसिंहचे ‘गली बॉय’, ‘गोलियों की रासलीला राम-लीला’ आणि ‘पद्मावत’ हे चित्रपट जपानमध्ये प्रदर्शित झाले होते. जपानमध्ये सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट ‘आरआरआर’ आहे. याने सुमारे १४३.६९ कोटी रुपये कमावले होते. भारतात चित्रपटाचे एकूण कलेक्शन १,००५.८५ कोटी रुपये होते, तर निव्वळ कलेक्शन सुमारे ८४० कोटी रुपये झाले. विदेशातही चित्रपटाला जबरदस्त प्रतिसाद मिळाला. ■

### ‘टॉक्सिक’च्या प्रदर्शनाची तारीख पुन्हा हुकली

**मुंबई** : यश स्टारर ‘टॉक्सिक’ चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. हा चित्रपट ४ जून रोजी प्रदर्शित होणार होता मात्र आता ही तारीख पुढे ढकलण्यात आली असून, नवीन तारीख




अद्याप घोषित करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे, ही पहिली वेळ नाही जेव्हा चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली आहे. चित्रपटाची मूळ प्रदर्शनाची तारीख १९ मार्च होती, जी ४ जूनपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती. मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावामुळे सिनेमाच्या कामावर परिणाम होत असल्यामुळे तारीख पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निर्मात्यांनी अधिकृत निवेदनात म्हटले होते. याचे दुसरे कारण ‘टॉक्सिक’ हा चित्रपट १९ मार्च रोजी प्रदर्शित झाल्यावर रणवीरसिंहच्या ‘धुरंधर-२’ या चित्रपटाशी टक्कर देणार होता आणि चित्रपटाला नुकसान होऊ नये म्हणून तो पुढे ढकलण्यात आला, असेही सांगितले जात होते. ■

# दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहनाला आग, पाच ठार

◆ **अलवर, ३० एप्रिल**

अलवरमधील मौजपूर येथे दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वेवर धावत्या कारला आग लागली. या अपघातात पाच जण जळाले. बचाव पथकाला आग विझवल्यानंतर कारमधून केवळ सांगाडे मिळाली आहेत.

कार चालकाने आग लागताच बाहेर उडी मारली होती. त्याला गंभीर अवस्थेत जयपूरला हलविण्यात आले. माहितीनुसार, कारमधील प्रवासी मध्यप्रदेशातील शिवपूरचे रहिवासी होते. ते वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन शिवपूरला परत येत होते. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असल्याची पोलिसांना शंका आहे. हा अपघात बुधवारी रात्री ११ वाजता झाला. रात्री ११.१५ च्या सुमारास लक्ष्मणगड पोलिसांना कारला आग लागल्याची माहिती मिळाली होती. रात्री ११.३० च्या सुमारास अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले होते. आग विझवण्यासाठी सुमारे १५ मिनिटे लागली. सीएनजीमुळे आग वेगाने भडकली असावी अशी शक्यता आहे. यामुळे कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही, असे अलवर सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रियंका रघुवंशी यांनी सांगितले. मृतांमध्ये तीन महिला, एक अल्पवयीन मुलगी आणि एक पुरुष आहे. हे सर्व शिवपूरच्या चैनपूरचे रहिवासी होते. सर्वांचे केवळ सांगाडे मिळाले आहेत. मृतदेहांच्या ओळखीसाठी डीएनए नमुने घेतले जातील, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# सिलेंडरच्या स्फोटात ७ जण होरपळले

◆ **जयपूर, ३० एप्रिल**

राजस्थानमधील भिवानी जिल्ह्यातील साथलका गावातील एका घरात गुरुवारी सकाळी जेवण बनवताना गॅस सिलेंडरचा स्फोट झाला, यात एकाच कुटुंबातील सात जण होरपळले. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

स्फोट झाला तेव्हा घरामध्ये जेवण तयार करण्याची तयारी सुरू होती. त्यादरम्यान, गॅस सिलेंडरमधून गळती होत होती. माचिसची काडी पेटवताच अचानक स्फोट झाला आणि घराला आग लागली. यात कुटुंबातील सात जण होरपळले. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळवत जखमी नागरिकांना भिवावी जिल्हा रुग्णालयात हलविले. (वृत्तसंस्था)

# आय-पॅकचे संचालक चंडेल यांना जामीन मंजूर

◆ **नवी दिल्ली, ३० एप्रिल**

पश्चिम बंगालमधील मतदान होताच आय-पॅक कंपनीचे संचालक आणि सहसंस्थापक विनेश चंडेल यांना मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अटी-शर्तीच्या आधारावर दिल्लीच्या पतियाळा हाऊस न्यायालयाने गुरुवारी जामीन मंजूर केला. विशेष असे की, यावेळी झालेल्या सुनावणीत ईडीने जामीन अर्जाला विरोध केला नाही.

तपास अधिकाऱ्याच्या जबाबाचा हवाला देत न्यायालयाने म्हटले, चंडेल यांनी तपासादरम्यान सहकार्य केले आणि यापुढेदेखील त्यांनी तपासात सहकार्य करण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. पुराव्यांशी छेडछाड करणार नाही किंवा साक्षीदारांवर प्रभाव टाकणार नाही आणि तपासात सहकार्य करतील या अटींच्या आधारावर त्यांना जामीन मंजूर करण्यात येत आहे.

दरम्यान, चंडेल यांना ईडीने कोळसा घोटाळ प्रकरणाशी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अटक केली होती. मागील सुनावणीत, न्यायालयाने त्यांच्या जामीन अर्जावर निर्णय घेण्यासाठी ईडीला नोटीस बजावली होती. गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान ईडीने जामीन अर्जावर विरोध केला नाही आणि त्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. (वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मिरातील जम्मू जिल्ह्यातील जम्मू तावी रेल्वे स्थानकावर केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते श्रीनगर-कटरा वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवण्याच्या समारंभाच्या तयारीदरम्यान येथे करडी नजर ठेवून असलेला रेल्वे सुरक्षा दलाचा जवान

# हेलिकॉप्टरमधून एकाच वेळी दोन क्षेपणास्त्रांचे प्रक्षेपण

◆ **नवी दिल्ली, ३० एप्रिल**

डीआरडीओ आणि नौदलाने बुधवारी बंगालच्या उपसागरात हेलिकॉप्टरमधून ‘शॉर्ट रेंज नेव्हल अँटी-शिप’ क्षेपणास्त्र यशस्वीरीत्या प्रक्षेपित केले. यावेळी एका हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे डागण्यात आली. दोन्ही क्षेपणास्त्रांनी जहाजाच्या खालच्या भागाचा अचूक वेध घेतला.



या चाचणीच्या माध्यमातून भारताने ‘साल्वो लॉन्च’ क्षमतेचे प्रदर्शन केले. या अर्थ एका लाँचरमधून कमी वेळेत जास्त क्षेपणास्त्रे डागणे होय. हे तंत्रज्ञान शत्रूच्या रडार प्रणालीला चकमा देऊ शकते. ओडिशातील चांदीपूर येथील चाचणी श्रेणीत बसवलेल्या रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल प्रणाली आणि टेलीमेट्रीच्या माध्यमातून क्षेपणास्त्राचे संपूर्ण उड्डाण आणि लक्ष्यावर नजर ठेवण्यात आली.

संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी या यशाबद्दल, नौदल, वायुसेना आणि उद्योग जगताचे अभिनंदन केले. ते म्हणाले, या क्षेपणास्त्राच्या निर्मितीमुळे सैन्याची ताकद खूप वाढेल. संरक्षण मंत्रालयाने चाचणीचा व्हिडीओ जारी केला. यामध्ये आधी एक क्षेपणास्त्र प्रक्षेपित करण्यात आले. क्षेपणास्त्राने जहाजाच्या त्या भागाला लक्ष्य केले, जिथे हल्ला झाल्यास जास्त नुकसान होते. क्षेपणास्त्रामध्ये सुरुवातीसाठी बुस्टर आणि पुढे उड्डाण कायम ठेवण्यासाठी वेगळी प्रणाली बसवलेली आहे. याचबरोबर लक्ष्य ओळखण्यासाठी, मार्ग निश्चित करण्यासाठी आणि उंची राखण्यासाठी अनेक तंत्रज्ञान जोडले आहेत.

क्षेपणास्त्रामध्ये अशी प्रणाली आहे, यामुळे उडतानाही त्याला नवीन माहिती दिली जाऊ शकते. गरज पडल्यास दिशा बदलता येते. हे क्षेपणास्त्र डीआरडीइोच्या वेगवेगळ्या प्रयोगशाळा आणि भारतीय उद्योगांनी एकत्रितपणे विकसित केले आहे. आता त्याचे उत्पादनही देशातच केले जात आहे. यापूर्वी शनिवारी डीआरडीओ आणि नौदलाने एका नवीन युद्धनौका प्रकल्पासाठी हायड्रोडायनामिक कार्यक्षमता आणि मॉडेल चाचणी पूर्ण केली. हे काम नेव्हल सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजिकल लॅबोरेटरी आणि नौदलाच्या वॉरशिप डिझाईन ब्युरोने एकत्र केले.

चाचणीत जहाजाचा वेग, पाण्यातील त्याचे वर्तन, इंजिनमधून मिळणारी शक्ती आणि वळण्याची क्षमता यांसारख्या महत्त्वाच्या पैलूंची तपासणी करण्यात आली. निकाल आंतरराष्ट्रीय मानकांनुसार आढळले. डीआरडीओचे अध्यक्ष समीर व्ही. कामत यांनी या प्रकल्पाचे निकाल नौदलाचे अधिकारी संजय साधू यांना सुपूर्द केले. यावेळी डीआयडीओ आणि नौदलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

### क्षेपणास्त्राची वैशिष्ट्ये

- महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथे डीआयडीओने नवीन आर्मर्ड प्लॅटफॉर्म सादर केले. हे ट्रॅक आणि चाके अशा दोन्ही प्रकारचे आहेत.
- ते लष्कराच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहेत. या प्लॅटफॉर्ममध्ये ३० मिमीचे क्रूलेस टरेट बसवले आहे.
- यात शक्तिशाली इंजिन आणि ऑटोमॅटिक ट्रान्समिशन दिले आहे. यामुळे त्याचा वेग आणि क्षमता वाढते.
- यासोबतच यात चोहोबाजूंनी सुरक्षा कवच दिले आहे. हा मंच जमिनीवर तसेच पाण्यातही उपयुक्त.
- यात हायड्रो जेट तंत्रज्ञान दिले आहे. यामुळे पाण्यात चालणे सोपे होते. हे अँटी-टँक गाईडेड क्षेपणास्त्र डागण्यासही सक्षम आहेत.
- या मंचासाठी सध्या सुमारे ६५ टक्के स्वदेशी वस्तूंचा वापर झाला आहे, जो पुढे ९० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची योजना आहे.

### कान्हा अभयारण्यात वाघासह बछड्याचा मृत्यू

**भोपाळ** : मध्यप्रदेशातील कान्हा व्याघ्र प्रकल्पात (केटीआर) एका वाघिणीचा आणि तिच्या बछड्याचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. यावर्षी राज्यात वाघांच्या मृत्यूची संख्या २७ वर पोहोचली आहे.

८ ते १० वर्षे वयोगटातील वाघीण आणि तिचा सुमारे १८ महिन्यांचा बछडा यांना उपचारासाठी केटीआरमधील विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले होते. बुधवारी उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला, असे वन्यजीव पशुवैद्य डॉ. संदीप अग्रवाल यांनी सांगितले. या वाघिणीच्या इतर तीन बछड्यांचा २१ ते २५ एप्रिल दरम्यान नैसर्गिक कारणांमुळे, पाण्यात बुडून आणि फुफ्फुसाच्या संसर्गामुळे मृत्यू झाला होता. या वाघिणीला आणि तिच्या चौथ्या बछड्याला मागील आठवड्यात सन्ही रेंजमधून वाचवून विलगीकरण केंद्रात हलवण्यात आले होते. तिथे त्याचाही मृत्यू झाला. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### खेडांच्या जामीन अर्जावरील निर्णय सुरक्षित

**नवी दिल्ली** : आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नीकडे अनेक पासपोर्ट आणि विदेशात अघोषित मालमत्ता असल्याच्या आरोपांशी संबंधित प्रकरणात काँग्रेस नेते पवन खेडा यांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामिनाच्या अर्जावरील निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी सुरक्षित ठेवला. न्या. जे. के. माहेश्वरी आणि ए. एस. चांदुरकर यांच्या न्यायासनाने या अर्जावर सुनावणी केली. मला अटकपूर्व जामीन मंजूर झाला नाही, तर अटकपूर्व जामिनाचा उद्देशच निष्फळ ठरेल, असे खेडा म्हणाले. त्यांच्यावरील आरोप हे फौजदारी खटल्याचे प्रकरण असून, त्यांना अटक करून अपमानित करण्याची गरज नाही. त्यांच्यावरील काही आरोप जामीनपात्र आहेत. त्यामुळे त्यांच्या अटकेची आवश्यकता नाही, असा युक्तिवाद खेडा यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील अभिषेक सिंघवी यांनी केला. आसाम सरकारचे प्रतिनिधित्व करणारे महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी याचिकेला विरोध केला. ते म्हणाले, खेडा यांनी मुख्यमंत्र्यांच्या पत्नीच्या पासपोर्टची बनावट आणि फेरफार केलेली प्रत दाखवली आहे. खेडा फरार असून, व्हिडिओ प्रसिद्ध करत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या पत्नीकडे एकापेक्षा जास्त देशांचे नागरिकत्व असल्याचा सर्व आरोप खोटा आहे. ■

### धावपट्टीवर विमानासमोर आले माकड

**लखनौ** : लखनौच्या अमाउसी येथील चौधरी चरणसिंह आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी सकाळी एक मोठा अपघात टळला. सुमारे १२५ प्रवाशांना घेऊन जाणारे विमान धावपट्टीवरून वेगाने जात असताना अचानक एक माकड समोर आले. वैमानिकाने आपत्कालीन ब्रेक लावत कठीण परिस्थितीत विमान थांबवले. त्यानंतर विमान पुन्हा धावपट्टीवर परत आणण्यात आले. सुमारे एका तासानंतर विमान रायपूरसाठी रवाना झाले. इंडिगोचे लखनौ ते रायपूर जाणारे विमान ६ई ६५२१ गुरुवारी सकाळी सुटणार होते. विमानाने धावपट्टीवर लक्षणीय वेग गाठला होता, तेव्हा वैमानिकाच्या लक्षात आले की, एक माकड समोर बसले आहे. जर त्याने आपत्कालीन ब्रेक लावले नसते तर विमानाच्या थ्रस्ट जेट्सनी त्याला आत खेचले असते. ■

# अमेरिकेला हादरवण्यासाठी सैन्य, शस्त्रसाठा सज्ज

## इराणच्या नौदल प्रमुखाची डोनाल्ड ट्रम्प यांना धमकी



◆ **तेहरान, ३० एप्रिल**

इस्लामिक प्रजासत्ताक लवकरच अशा शस्त्राचा वापर करेल जे शत्रूला घाबरवून सोडेल. हे शस्त्र शत्रूच्या अगदी जवळ आहे. अमेरिका आणि त्यांच्या मित्र देशांना हादरविण्यासाठी आमचे सैन्य व शस्त्रसाठा सज्ज असल्याचा इशारा इराणचे नौदल प्रमुख शहराम इराणी यांनी दिला.

आर्थिक दबाव आणि होर्मुझ जलमार्गात नाकाबंदी करून इराणला वाटाघाटीसाठी तयार करण्याचे प्रयत्न अपयशी ठरले आहे. शत्रूने आम्हाला गृहीत धरून मोठी चूक केली. कमी वेळात उद्दिष्ट्ये साध्य करण्याची योजना फसली आहे. कोणतीही चूक केल्यास सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल, असे इराणी यांनी सरकारी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. इराणी सैन्याने अमेरिकेच्या यूएसएस अब्राहम लिंकन या विमानवाहू नौकेवर किमान सात क्षेपणास्त्रांचा मारा केला. ज्यामुळे अमेरिकेला विमानांचे संचालन करणे आणि हवाई कारवाया करणे अशक्य झाले. होर्मुझमध्ये अमेरिकेची नाकाबंदी असूनही आमची अनेक जहाजे सुरक्षित योग्य त्या ठिकाणी पोहोचली. भविष्यातील संघर्षासाठी आमचे सैन्य सज्ज असून, शत्रूला प्रत्युत्तर दिले जाईल. युद्धात मारल्या गेलेल्यांचा सूड रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत घेतला जाईल आणि शत्रूंना असा धक्का दिला जाईल, ज्याचा त्यांना आयुष्यभर पश्चाताप होईल. ◀(वृत्तसंस्था)

### आखातात विदेशी राजवट टिकणार नाही : पेझेश्कियन

इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी म्हटले की, आखातात परकीय राजवट टिकणार नाही. जर अमेरिकेने सागरी नाकाबंदी अनिश्चित काळासाठी कायम ठेवल्यास त्यांना भयानक परिणाम भोगावे लागेल. इराण कोणत्याही परकीय दबावापुढे, सागरी नाकाबंदीपुढे किंवा धमक्यांपुढे झुकणार नाही आणि त्यांचा धैर्याने सामना करेल. इराणवर सागरी निर्बंध लादणे हे आंतरराष्ट्रीय नियमांचे उघड उल्लंघन आहे. ■

# आज ताडोबात होणार निसर्गानुभव

◆ **चंद्रपूर, ३० एप्रिल**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनातर्फे शुक्रवारी बुद्ध पोर्णिमेनिमित्त निसर्ग अनुभव या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात निसर्गप्रेमींना व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील पाणवठ्यावरील मचानवरून रात्रभर वन्यजीव निरीक्षणाचा अनोखा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होत आहे.

एकूण ५७ मचान उपलब्ध असून, प्रत्येक मचानवर कमाल २ जण उपस्थित असतील. मागील वर्षी प्रति मचान शुल्क ४ हजार ५०० प्रत्यक्ष भरावे लागत होते. यावर्षी शुल्कात कपात करून अधिक जणांचा सहभाग व्हावा यादृष्टीने प्रोत्साहन सहभाग शुल्क प्रति मचान ३ हजार ५०० (कमाल २ व्यक्तिंसाठी) निश्चित करण्यात आले होते.

ज्यांना संधी मिळाली आहे, ते १ मे रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत त्यांना नेमून दिलेल्या सफारी गेटवर हजर राहणार आहेत.



कार्यक्रमाची समाप्ती २ मे रोजी सकाळी ६ वाजता होईल. वाहतूक व्यवस्था केवळ ताडोबा अधिकृत वाहनांद्वारे करण्यात येईल. खाजगी वाहनांना परवानगी दिली जाणार नाही. हा उपक्रम वन्यजीव संवर्धनाबाबत जनजागृती व जबाबदार पर्यावरण पर्यटनाला चालना देण्यासाठी राबविण्यात येत असून, नैसर्गिक अधिवासात वन्यजीवांचे निरीक्षण करण्याची दुर्मिळ संधी उपलब्ध करून दिली असल्याचे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक डॉ. प्रभूनाथ शुक्ल यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

# बर्गी धरणात क्रूझ उलटून पाच पर्यटकांचा मृत्यू

## १५ जणांना वाचवण्यात यश, १८ बेपत्ता

◆ **जबलपूर, ३० एप्रिल**

मध्यप्रदेशातील जबलपूर येथील बर्गी धरणात गुरुवारी सायंकाळी जोरदार वादळामुळे तोल गेल्याने पर्यटकांचे क्रूझ जहाज खमारिया बेटाजवळ उलटले. जहाजावर ३७ हून अधिक लोक होते. पाच मृतदेह सापडले असून सुमारे १५ पर्यटकांना सुखरूप वाचवण्यात आले आहे, तर १८ जण अद्याप बेपत्ता असल्याची प्राथमिक माहिती आहे. पर्यटन विभागाद्वारे चालवल्या जाणाऱ्या या क्रूझमध्ये ३७ पेक्षा जास्त लोक होते. ते क्रूझचा आनंद घेत असतानाच हवामान बदलले. सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास जोरदार वादळामुळे क्रूझवरील नियंत्रण सुटले आणि ते बुडू लागले. जीवाच्या भीतीने लोक आरडाओरड करत होते.

दरम्यान, ज्यांना पोहता येत होते त्यांनी मदतीसाठी धाव घेतली. माहिती मिळताच मदतीसाठी एक बोट पाठवण्यात आली. बचाव पथकाला १५ पर्यटकांना वाचवण्यात यश आले तसेच पाच मृतदेह बाहेर काढले. त्यांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अद्याप १८ जण बेपत्ता असून, त्यांचा शोध सुरू आहे. माहिती मिळताच बर्गी पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि एसडीआरएफच्या पथकाने बचाव आणि मदतकार्य सुरू केले. आतापर्यंत पाच मृतदेह सापडले असून, अनेक जण अजूनही बेपत्ता आहेत. या घटनेवर मंत्री राकेश सिंह यांनीही शोक व्यक्त केला. बर्गी धरणातील खमरिया बेटाजवळ पर्यटकांना घेऊन जाणारे क्रूझ बुडाल्याची घटना अत्यंत दुःखद आहे. या कठीण काळात आम्ही सर्व पीडित कुटुंबांसोबत आहोत, असे त्यांनी 'एक्स'वर म्हटले आहे. माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी 'एक्स'वर म्हटले की, ही घटना अत्यंत वेदनादायी आहे. या अपघातात अनेक जण बेपत्ता असल्याचे वृत्त आहे. प्रशासनाने बचाव कार्याला गती द्यावी आणि बेपत्ता लोकांना लवकरात लवकर वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. तसेच या घटनेबाबत दंडाधिकारी चौकशीचा आदेश द्यावा आणि क्रूझ कंत्राटदारावर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# आता 'जैश'च्या कमांडरला अज्ञात वाहनाने चिरडले

## सलमान अझरचा मृत्यू ● भारताविरुद्ध दहशतवादी कटाचा होता सूत्रधार

◆ **बहावलपूर, ३० एप्रिल**

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझरचा निकटवर्तीय असलेला सर्वोच्च कमांडर मौलाना सलमान अझरला अज्ञात वाहनाने चिरडले. पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील बहावलपूर येथे त्याचा जागीच मृत्यू झाला.



सलमान अझर हा भारताविरुद्धच्या अनेक मोठ्या दहशतवादी कटांचा सूत्रधार होता आणि त्याला मसूद अझरच्या सर्वांत विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक मानले जात होते. या घटनेमुळे पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय पासून ते त्यांच्या दहशतवादी सूत्रधारांपर्यंत सर्वांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सलमानच्या मृत्यूचा संबंध 'टार्गेट किलिंग'शी जोडला जात आहे. पाकिस्तानी वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, सलमान अझर रस्त्यावरून जात असताना एका अज्ञात भरधाव वाहनाने त्याला धडक दिली. घटनेनंतर चालक घटनास्थळावरून वाहनासह फरार झाला. पाकिस्तानी तपास यंत्रणा या घटनेला एक सामान्य अपघात म्हणून दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. पाकिस्तानात दहशतवाद्यांच्या सातत्याने होणाऱ्या हत्येमुळे दहशतवादी संघटनेत दहशत असताना हत्या घडविणाऱ्याचा शोध घेण्यात पाकिस्तानातील पोलिस व तपास यंत्रणा अपयशी ठरल्या आहे. ◀(वृत्तसंस्था)

### मौलाना सलमान अझर कोण होता?

**सलमान अझर जैश-ए-मोहम्मदमधील अत्यंत प्रभावशाली आणि जागतिक दहशतवादी मसूदचा सर्वांत विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक होता. संघटनेचे अनेक महत्त्वाचे निर्णय त्याच्या सल्ल्यानुसार घेतले जात असत. भारताविरुद्ध दहशतवादी कट रचणे, नवीन दहशतवाद्यांची भरती करणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि निधी उभारणे यात त्याची मुख्य भूमिका होती. त्याच्या मृत्युमुळे जैश-ए-मोहम्मदच्या अंतर्गत रचनेला गंभीर धक्का बसला आहे.** ■

### पोलिस महासंचालक सन्मानचिन्हात

# गडचिरोलीचा डंका

## मिळाली १४५ पदके

◆ **नागपूर, ३० एप्रिल**

महाराष्ट्र पोलिस दलात उत्कृष्ट सेवा आणि उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या पोलिस अधिकारी व अंमलदारांना राज्याच्या पोलिस महासंचालकांकडून दरवर्षी सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येते. २०२५ या वर्षासाठी जाहीर झालेल्या अत्यंत मानाच्या पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह पदकांमध्ये गडचिरोली जिल्ह्याने १४५ पदके पटकावली आहेत.

त्याखालोखाल अमरावती जिल्ह्याने १८, भंडारा जिल्ह्याने १०, वर्धा जिल्ह्याने ६, चंद्रपूर जिल्ह्याने ४, वाशिम जिल्ह्याने ४, अकोला आणि गोंदिया जिल्ह्याने प्रत्येकी ३ आणि यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्याने प्रत्येकी एक मानाचे पदक प्राप्त केले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### माझ्या लढाईचे हेच फळ : मिटकरी

**मुंबई** : विधान परिषदेच्या शर्यतीतून पत्ता कट झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते विधान परिषदेचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी समाज माध्यमावरून आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली आहे.

माझ्या लढाईचे हेच फळ मिळेल ही मानसिक तयारी २९ जानेवारीलाच केली होती. तुमच्यासाठी अशा हजार संधी ओवाळून टाकेल, पण न्याय मिळेपर्यंत ही लढाई थांबणार नाही, असे मिटकरींनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले. ■


# अन् सोनारानेच टोचले कान !

लोकसभेतील दारूण पराभवानंतर सोलापूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत मिळालेले संमिश्र यश आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मिळालेल्या भरघोस यशाने हुरळून गेलेल्या सोलापूर भाजपाचे थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच कान टोचल्याने भाजपाच्या निष्टावंत कार्यकर्त्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. सोलापुरातील कौतुक सोहळ्यात मुख्यमंत्री देवाभाऊंनी जाहीर सभेत निवडणुकीतील यशाचे कौतुक केले पण सर्वांना थेट गर्भित इशारा देत चुकीला माफी नाही, हे स्पष्टपणे सांगून अनेकांना धडकी भरविण्याचेही काम चोखपणे केल्याचे कौतुक सोलापूरकर करीत आहेत. कारण सोलापूरची जबाबदारी ज्यांच्याकडे आहे ते काहीसे ट्रम्प तात्यासारखे वागत असल्याचे चित्र आहे. मुख्यमंत्री देवाभाऊंनी शहर व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांच्या साक्षीनेच सुनावले की, देवाभाऊ तूमच्या पाठिशी आहे पण





जनतेशी चांगला व्यवहार ठेवा. सोलापूरचा विकास तर करायचाच आहे पण लोकांशी सौजन्याने वागा. एखादे विकासाचे काम कमी झाले तर हरकत नाही जनता समजून घेईल पण तुम्ही चुकीचा व्यवहार केला, भ्रष्टाचार केल्याचे आढळले तर मात्र, चुकीला माफी नाही. मग एखादे पद पक्षाकडून गेले तरी चालेल पण कोणीही असो माफ केले जाणार नाही. सोलापूरकरांची कृतज्ञता व्यक्त करतानाच सोलापूरकरांसमोर पक्षाचे लोकप्रतिनिधी, आमदार, महापालिका, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी सदस्य आणि पक्षाचे पदाधिकारी यांचे देवाभाऊंनी कान टोचल्याने सोलापूरकरांमध्ये समाधानाचे वातावरण आहे तर भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्याचे स्वागत केले आहे. आता चुकणाऱ्या, गैरव्यवहार, भ्रष्टाचार करणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्याची गरज असून हे काम पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि समाजातील सूज्ञ व्यक्तींनी करणे महत्वाचे आहे.

गेल्या काही वर्षात म्हणजेच भाजपाच्या सत्ताकाळातच शिस्तीच्या पक्षात बेशिस्तीची लाट आल्याचे सोलापूरकरांनी पाहिले आहे. केंद्र व राज्यात सत्ता असतानाही केवळ सोलापुरातील पक्षांतर्गत वादामुळे सोलापूरचा विकास होत नसल्याची शोकांतिका सर्वश्रुत आहे. तरीही सोलापूरकरांनी मोठ्या आशेने भाजपाला भरघोस मतदान करत महापालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायतींमध्ये भाजपाच्या हाती सत्ता दिली. कारण केंद्र व राज्यात भाजपाचे सरकार असल्याने स्थानिक पातळीवर मोठा विकास होईल. आता हे राजकारण सामान्य नागरिकांनाही चांगले समजू लागलेले आहे. सोलापूरची अनेक विकासकामे वर्षानुवर्षे रखडलेली होती. मुख्यमंत्र्यांनी जातीने लक्ष घातल्यामुळे दुहेरी जलवाहिनी, विमानसेवा मार्गी लागली असली तरी उड्डाणपूल, आयटी पार्क, सोलापूर जिल्ह्यातील अर्धवट सिंचन योजना, सोलापूर शहर व जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाला चालना देणे, शहर व जिल्ह्यातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याच्या अर्धवट योजना, बोरामणी येथील प्रलंबित आंतरराष्ट्रीय कार्गो विमानतळ, बाजार समित्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या अडचणी, एम आयडीसींमधील दुरवस्था, शहर व जिल्ह्यात वाढणारी अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, सर्वच प्रशासनावरील अंकुश, सोलापूरकरांना पर्यटनाच्या दृष्टीने उपाययोजना, उजनी धरणावरील पर्यटनाचे गाजर, चंद्रभागा, सीना नदीचे वाढते जलप्रदूषण, पंढरपूर कॉरिडॉर, सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर, दक्षिणेची काशी पंढरपूरचे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, अक्कलकोट श्री स्वामी समर्थ मंदिर यासह लगतचे साडेतीन पीठापैकी एक तुळजापूरचे श्री तुळजाभवानी मंदिर या देवस्थानांचे पर्यटन सर्किट निर्माण करणे खूपच गरजेचे आहे



नेहमीच राजकारणात अग्रेसर असलेल्या पालकमंत्र्यांनी आता सोलापूर शहर व जिल्ह्याच्या या विकासासाठी पूर्णवेळ देण्याची गरज असून किंबहुना निवडणुकीत जसे शहर-जिल्ह्यात ठाण मांडून होतात तसे विकासासाठीही ठाण मांडण्याची गरज आहे. कारण देवाभाऊ देण्यासाठी सदैव सज्ज आहेत आपलीच झोळी फाटकी असे होऊ नये.मुख्यमंत्र्यांच्या गंभीर धमकीनंतर पक्षातील अंतर्गत गटबाजीची सांगता होणे गरजेचे आहे. सगळ्यांसमोर एकीचे चित्र अन् अंतर्गत मात्र बेकीचे राजकारण होवू नये, याची दक्षता आता सोलापूरच्या सर्वच लोकप्रनिधींनी काळजीपूर्वक घेण्याची गरज आहे. टक्केवारीच्या राजकारणाचा आरोप यापुढे होणार नाही, याची खबरदारी डीपीसी, महापालिका, जिल्हा परिषदेसारख्या ठिकाणी प्रामुख्याने घेण्याची गरज आहे. चमकोगिरीच्या जाळ्यातून आता बाहेर पडणे आवश्यक आहे. सोलापूरच्या शाश्वत विकासासाठी सोलापूरचा पालकमंत्री असणे गरजेचे आहे, पण त्यासाठी सोलापूरच्या लोकप्रतिनिधींना पुन्हा एकदा देवाभाऊंचा विश्वास जिंकावा लागणार आहे. मुख्यमंत्री फडणवीसांना चाणक्य उगाच म्हणत नाहीत, त्यामुळे सोलापूरच्या लोकप्रतिनिधींनी त्यांच्यासमोर चालाखीचे व गटबाजीचे राजकारण न करता किमान सोलापूरच्या विकासासाठी तरी एकत्र येऊन काम करावे, अशी माफक अपेक्षा सोलापूरकरांची आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# काही चांगलेही घडते आहे...

महाराष्ट्र हे एक गतिमान राज्य आहे. या राज्याच्या प्रत्येक क्षेत्रात दररोज काही ना काही उल्लेखनीय घडत असल्याने 'सळसळत्या घडामोडींनी भारलेले राज्य' म्हणून उभा देश महाराष्ट्राकडे पाहात असतो. आज महाराष्ट्राच्या राज्य निर्मितीचा ६७ वा वर्धापन दिन साजरा होत असून उभे राज्य महाराष्ट्र दिनाचा उत्साही सोहळा साजरा करीत आहे. गेल्या ६६ वर्षांत महाराष्ट्राने शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रांतही यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत केली आणि देशातील सर्वात प्रगत राज्य म्हणून हे राज्य नावारूपाला आले. महाराष्ट्र दिनाचा सोहळा साजरा करताना राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा हा उंचावलेला आलेख महाराष्ट्रातील प्रत्येकास सुखावणारा असाच आहे. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसप्ताहात राज्यात घडलेल्या उल्लेखनीय घडामोडींची नोंद घ्यावीच लागेल. गेल्या आठवडाभरात राज्याच्या राजकारणापासून समाजकारणापर्यंत आणि उद्योग क्षेत्रापासून पर्यावरणापर्यंत अनेक क्षेत्रांमध्ये परिवर्तनाच्या नव्या पर्वाची नांदी सुरू झाली आहे.

'महाराष्ट्र आता मागे पाहणार नाही' ही फडणवीस सरकारची राजनीती आहे. त्यामुळेच निर्णयांचा धडाका आणि अंमलबजावणीची गतिमान मोहीम राज्याच्या विकासाला नवी दिशा देताना दिसते. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसप्ताहातील काही निर्णय आणि अंमलबजावणीच्या प्रारंभातून राज्याच्या शैक्षणिक व औद्योगिक उपक्रमांची एक नवी मालिका आकाराला येत आहे. समाजाचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि सुरक्षित व आश्वस्त भविष्याची हमी देणारी दुष्काळमुक्त महाराष्ट्राची घोषणा याच आठवड्यात मुख्यमंत्र्यांनी केली आणि पुढील विकासाची दिशा निश्चित करणाऱ्या एका अथक 'जलयात्रे'चा याच आठवड्यात आरंभ झाला. भविष्यात राज्याच्या कोणत्याही कोपऱ्यात दुष्काळ राहणार नाही यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असल्याची ग्वाही या निमित्ताने देताना नदीजोड प्रकल्प, शेततळी आणि दुष्काळाच्या सावटातून सावरण्यासाठीच्या उपायांची मुहूर्तमेढही याच आठवड्यात रोवली गेली. महाराष्ट्राच्या जलविद्युत निर्मिती क्षेत्रात पाच हजार कोटींहून अधिक रकमेच्या गुंतवणुकीच्या प्रकल्पांचा मुहूर्त झाला आणि 'अल निनो'च्या प्रभावामुळे आगामी पावसाळ्यावर दाटलेल्या दुष्काळाचे सावट दूर करण्याकरिता उपायांची आखणी व अंमलबजावणीही याच आठवड्यात सुरू झाली. लालफितीच्या कारभारातून राज्याला मुक्त करण्याचा संकल्प आणि गतिमान कार्यशैलीची नवी नीती याच आठवड्यात उदयास आली. महाराष्ट्र आता देशातील इतर राज्यांशी नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थेशी स्पर्धा करीत असून प्रगतीचा हा वेग असाच कायम राहिल्यास पुढील काही वर्षांत महाराष्ट्र अरब देशांना आणि सिंगापूरलाही मागे टाकेल, अशी ग्वाही देणाऱ्या उद्योगकेंद्री धोरणाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. महाराष्ट्रात डेटा सेंटर उभारणी सुरू आहे, ऊर्जा क्षेत्राची वाटचाल नव्या प्रगतीच्या दिशेने सुरू झाली आहे, येत्या पाच वर्षांत नवीनीकरणीय ऊर्जा क्षेत्राचा वाटा एकूण ऊर्जा निर्मितीच्या निम्म्याहून अधिक स्तरापर्यंत पोहोचलेला असेल. याअगोदरच्या आठवड्यात राज्यात एकाच दिवशी अडीच लाख कोटी रुपये गुंतवणुकीच्या १८ विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. राज्यातील एक लाख रोजगारक्षम तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधींची क्षितिजे उजळली. आजवर मोठ्या आणि अतिविशाल प्रकल्पांची केंद्रे केवळ मुंबई-पुण्यासारख्या महानगरांच्या भोवती वसलेली होती. आता रोजगारांच्या संधींना महाराष्ट्राचा कानाकोपरा खुणावू लागला आहे. गडचिरोलीसारख्या शेवटच्या टोकाच्या जिल्ह्यात आठ हजार रोजगारनिर्मितीची क्षमता असलेला प्रकल्प उभा राहणार आहे.

प्रगतीचा हा रथ असा वेगवान घोडदौड करीत असताना, गेल्या आठवडाभरात चर्चा मात्र महाराष्ट्राच्या राजकारणाची रंगली. महाराष्ट्राच्या राजकारणात फारसे अस्तित्व राहिलेले नसतानाही महाविकास आघाडीच्या राजकारणाची आणि विशेषतः आगामी विधान परिषद निवडणुकीतील उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेची उत्सुकता महाराष्ट्रात शिगेला पोहोचली. मुळात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस गेल्या काही वर्षांत उतरती कळा लागली. राज्याच्या सत्ताकारणात त्यांचा गट बराचसा बेदखल झाला आहे. ठाकरे गटाच्या प्रवक्त्यांकडून केल्या जाणाऱ्या वक्तव्यांची चर्चा वगळता, राज्याच्या धोरणात्मक बाबींमध्ये या गटाच्या भूमिकेस फारसे महत्त्वही राहिलेले नाही आणि ठाकरे यांचा गट महाविकास आघाडीसोबत असल्याचे चित्र धूसर स्थितीतच आहे. महाविकास आघाडीच्या अस्तित्वाचा मुद्दा आला की, या आघाडीतील ज्या पक्षांची आणि नेत्यांची चर्चा अपरिहार्य असते, त्यामध्ये उद्धव ठाकरे यांचेही नाव घेतले जात असते. विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीचा निवडून येऊ शकेल असा एकमेव चेहरा तेच असतील का, याची चर्चा महाराष्ट्रात होणे साहजिकच होते. महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीचा नवा अध्याय समोर येत असताना आणि राज्यात काही चांगलेही घडते आहे, याची खात्री देणाऱ्या निर्णयांची कार्यवाही सुरू झालेली असताना उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीविषयी तर्कवितर्क लढविले जावेत, हे काही अनपेक्षित नसले, तरी अनाठायी ठरावे असे होते. अखेर त्यावर पडदा पडला आहे. आता या निवडणुकीत ते उमेदवार नसणार हे स्पष्ट झाल्यानंतर त्याचेही विश्लेषण सुरू होणे अपरिहार्य आहेच. उद्धव ठाकरे यांनी विधान परिषद निवडणुकीतून माघार का घेतली असावी, त्यामागे त्यांची काही राजनीती असावी की केवळ नाईलाज असावा? त्यांनी निवडणूक लढविली असती तर महाराष्ट्राच्या राजकारणावर असा कोणता प्रभाव पडला असता किंवा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने महाराष्ट्राच्या राजकारणाचे असे कोणते नुकसान होणार आहे, यावरही तर्कवितर्क सुरू होतील. त्यामुळे एका बाजूला राज्याच्या विकासाला दिशा देणारे बरेच काही घडत असताना उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीविषयीच्या निर्णयाचा मागोवा घ्यायला हवा.

उद्धव ठाकरे यांची विधान परिषदेच्या सदस्यत्वाची मुदत मे महिन्यात संपुष्टात येत आहे. गेल्या सहा वर्षांतील मुख्यमंत्रिपदाची अल्पकाळाची कारकीर्द वगळता, त्यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ चमकदार राहिलेला नाही, असेच चित्र आहे. शिवसेनेत फूट पडल्यामुळे मुख्यमंत्रिपद गमावण्याची वेळ आल्यावर पदाचा राजीनामा देताना त्यांनी विधान परिषद सदस्यत्व सोडण्याचेही जाहीर केले होते, पण त्यांनी तसे केले नाही. उलट, त्यानंतरच्या काळातील त्यांचा सभागृहाच्या कामकाजात सहभागदेखील उल्लेखनीय ठरला नाही. अधिवेशनकाळात प्रश्नोत्तरे किंवा राज्यहिताच्या महत्त्वाच्या विषयांवरील चर्चेतही ते फारसे सहभागी झाले नाहीत; उलट त्यांची अधिवेशनकाळातील सभागृहातील अल्प उपस्थिती चर्चेचा मुद्दा ठरला होता. त्यामुळे विधिमंडळाचे सदस्य असताना त्यांनी बजावलेली एकूण सुमार कामगिरी पाहता, पुन्हा सभागृहातील विरोधी बाकावरील एक जागा अडविण्यासाठी त्यांनीच निवडणूक लढवावी हा महाविकास आघाडीतील काही नेत्यांचा आग्रह अनाठायी होता. त्यांच्या निष्क्रिय कामगिरीपेक्षा त्यांच्या गटाने उमेदवारी दिलेल्या अंबादास दानवे यांची कामगिरी निश्चितच उजवी आणि आक्रमक ठरली होती. उद्धव ठाकरे यांना उमेदवारी मिळावी ही महाविकास आघाडीच्या नेत्यांची इच्छा केवळ आघाडीच्या अस्तित्वाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न होता. पण उद्धव ठाकरे यांनी त्याचा मोह आवरला आणि महाविकास आघाडीस संजीवनी देण्यापेक्षा ढासळत्या संघटनेस संजीवनी देण्याची गरज वेळीच ओळखली, हा त्यांच्या निर्णयाचा अर्थ असू शकतो. महाविकास आघाडी अगोदरच खिळखिळी झालेली आहे. ठाकरे यांनी उमेदवारी नाकारून पक्षाच्या आक्रमक नेत्यास उमेदवारी दिल्याने महाविकास आघाडी नव्या फुटीच्या उंबरठ्यावर उभी राहिली आहे. त्यामुळे ठाकरे किंवा महाविकास आघाडीचे भवितव्य हा शिळोप्याच्या गप्पांमध्ये तोंडी लावण्यापुरता मसाला म्हणून योग्य असला, तरी भविष्यात महाराष्ट्राची विकासाच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल आणि जे काही चांगले घडत आहे, त्याची चर्चा होणे अधिक योग्य ठरेल. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर दिसू लागलेल्या विकासाच्या नव्या वाटा आणि त्यावरील नव्या संधींची उजळलेली क्षितिजे यांची चर्चा अधिक व्हावयास हवी.

## प्रासंगिक

# बुद्ध पौर्णिमा : करुणेची पूर्तता

सी. पी. राधाकृष्णन

चित्रा पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी मंदिरांमध्ये उत्सव साजरे केले जात असताना, प्रत्येक घरात समृद्धी नांदो, अशी मी प्रार्थना करतो. बुद्ध पौर्णिमेनिमित्त सर्व बंधुभगिनींना शुभेच्छा देताना मला अत्यंत आनंद होत आहे. भारताने जगाला दिलेल्या अनेक देणग्यांमध्ये बौद्ध धर्म सर्वात अग्रस्थानी आहे. भगवान बुद्धांचे आयुष्य आणि शिकवण आजदेखील जगभरातील लाखो लोकांचे आयुष्य उजळून टाकत आहे. भारताने जगाला आत्मसाक्षात्काराचे महत्त्व शिकवले. बुद्ध या शब्दाचा अर्थच एक जागृत व्यक्ती असा आहे. मानवतेला आत्मसाक्षात्काराचा मार्ग दाखवणाऱ्या या महान विभूतीचा जन्म आणि त्यांना झालेला साक्षात्कार एकाच दिवशी होणे हे विशेष आहे.

राजपुत्र सिद्धार्थाचे बालपण अत्यंत ऐषोआरामात गेले. वयाच्या २९ व्या वर्षी आपला राजवाडा, पत्नी, पुत्र आणि सर्व ऐहिक संपत्तीचा त्याग करून आध्यात्मिक सत्याच्या शोधात त्यांनी घर सोडले. सहा वर्षांच्या कठोर आत्मक्लेशानंतर बोधगया येथील बोधी वृक्षाखाली त्यांना परमोच्च ज्ञानप्राप्ती झाली आणि त्यांनी बुद्धपद धारण केले. चार आर्य सत्यांचा साक्षात्कार आणि नैतिकतेच्या मार्गाचे आचरण यामधूनच एका नवीन तत्त्वज्ञानाचा आरंभ झाला; जे पुढे जागतिक इतिहासात भारताच्या स्थानासाठी अभिमान म्हणून अधिक बहरत गेले. वाराणसीजवळ सारनाथ येथे त्यांनी पाच तपस्वींना आपला पहिला उपदेश दिला. धम्मचक्कप्पवत्तन सुत्त किंवा धर्माचे चक्र फिरवणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्यांच्या शिकवणुकीतून बौद्ध धर्माचा पाया रचला गेला आणि बौद्ध धर्माचा अधिकृतपणे आरंभ झाला. कालांतराने, अनेक जण त्यांच्या शिकवणीकडे आकर्षित झाले. मगधचे राजा बिंबिसार यांनी राजगीर येथील वेणुवन (बांबूचे वन) मठ दान केले. श्रीमंत अनाथपिंडिकाने मठ बांधण्यासाठी संपूर्ण जेतवन वनाला सोन्याच्या नाण्यांनी मढवले. अशा कृतींमधून भारतात अस्तित्वात असलेल्या धर्मावरील गाढ श्रद्धेचे दर्शन घडते. बौद्ध धर्माची पायाभूत शिकवण असलेल्या चार आर्य सत्यांचा प्रसार मठांद्वारे केला जातो. इच्छा हे दुःखाचे मूळ कारण आहे, इच्छेचा नाश केल्याने दुःखावर मात करता येते आणि अष्टांग मार्गाचे अनुसरण करून व्यक्ती दुःखापासून मुक्ती मिळवू शकते.

**बुद्धांनी दिलेली शिकवण :** भूतकाळात रमू नका, आपले मन वर्तमानावर एकाग्र करा, सत्य हीच शक्ती आहे. आपले मन हे सर्व कृतींचे स्रोत आहे, म्हणूनच सकारात्मक विचारांची जोपासना करा. कठीण काळात मनाला भयग्रस्त होऊ देऊ नका. आयुष्याचा प्रवास हा अंतिमतः वैयक्तिक आहे. या प्रवासाला एका आध्यात्मिक मार्गाची जोड द्या. शब्द जखमा करू शकतात, म्हणूनच सौम्यपणे बोला. प्रेम आणि अहिंसा अत्यंत आवश्यक आहेत. नेहमी शिकत राहा; कधीच थांबू नका.



'मणिमेकलाई' आणि 'कुंडलाकेसी' यांसारख्या प्राचीन तमिळ महाकाव्यांमध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाची अत्यंत सुंदररीत्या मांडणी केली आहे. प्राचीन ग्रंथसंपदेपैकी बरेचसे ग्रंथ काळाच्या ओघात नष्ट झाले असले, तरी त्यांचे योगदान आजही अमूल्य आहे. ज्यांच्या मनात कोणतीही मोह-माया उरलेली नाही, अशा सज्ञानी माणसांनी मद्यपान आणि जीवहत्या यांसारख्या गोष्टींचा त्याग केला. ते म्हणतात की, आपण एक बाब समजून घ्यायला हवी; ती म्हणजे जन्म आणि मृत्यू तसेच मृत्यूनंतर पुन्हा होणारा जन्म, हे चक्र म्हणजे निव्वळ झोपणे आणि जागे होण्यासारखेच आहे, हेच खरे सत्य आहे. जे लोक योग्य काम करतात त्यांना आयुष्यात सन्मानाचे स्थान मिळते आणि जे वाईट कर्म करतात त्यांना असंख्य यातना सोसाव्या लागतात. हे सत्य ज्यांना जाणून घेता आले, त्यांनाच या जगातील सर्व बंधने तोडता आली आहेत. अशा शब्दांत 'मणिमेकलाई' या महाकाव्यात बौद्ध धर्माचे सार मांडले आहे. (आथिराई पिच्चईयित्ता काथाई : ८४-९०). अहिंसा, चोरी न करणे, व्यभिचारापासून दूर राहणे, सत्याची कास धरणे आणि मादक पदार्थांपासून दूर राहणे या पाच नीतिमूल्यांवर त्यांनी भर दिला आहे. त्यांनी दुःखात अडकलेल्या जिवांच्या जगण्यात स्पष्टता आणली, त्यांचे आयुष्य उजळवून लावले, म्हणूनच तर त्यांना 'लाईट ऑफ एशिया' अर्थात आशियाची प्रकाशज्योत अशा शब्दांत गौरविले जाते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमात सांगितलेली एक गोष्ट मला आठवते. त्यांनी म्हटले होते की, भगवान गौतम बुद्धांनी दिलेला जीवन संदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे. शांततेची सुरुवात आपल्या आतूनच होत असते, स्वतःवर मिळविलेला विजय हाच सर्वोत्तम विजय असतो, ही शिकवण गौतम बुद्धांनी आपल्याला दिल्याची जाणीव पंतप्रधानांनी आपल्याला करून दिली होती. आज जग ज्या तणाव आणि संघर्षातून जात आहे, त्या पार्श्वभूमीवर बुद्धांची शिकवण अधिकच महत्त्वाची ठरली असल्याचेही पंतप्रधानांनी सांगितले होते. सम्राट अशोकांच्या उदाहरणातून भगवान बुद्धांच्या शिकवणीने घडून येणारे परिवर्तन आपल्याला ठळकपणे दिसून येते. सम्राट अशोक यांनी शिलालेखांच्या आणि स्तूपांच्या माध्यमातून बौद्ध विचारातील तत्त्वांचा देशभर प्रचार-प्रसार केला. आजही जगभरातील असंख्य लोक सांची आणि सारनाथ इथले स्तूप पाहण्यासाठी येतात. असे मानले जाते की, बौद्ध भिक्खूंनी तामिळनाडूमध्ये धर्म प्रसारासाठी मदत केली होती. आजही तामिळनाडूच्या अनेक भागांत बौद्ध धर्माच्या खुणा पाहायला मिळतात. बौद्ध भिक्खूंनी कोणत्याही भेदाभेदाशिवाय मोफत वैद्यकीय सेवा आणि शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी 'त्रिपिटक' यांसारख्या पवित्र ग्रंथांची शिकवण दिली. दानधर्म, विशेषतः गरिबांना अन्नदान करणे, हे मूलभूत कर्तव्य मानले जात असे. भुकेलेल्यांना अन्न देणे म्हणजे एका अर्थाने जीवन देण्यासारखेच आहे, हीच भावना मांडली आहे.

बौद्ध धर्म, ज्याने आयुष्यभर शिक्षणावर भर देत मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक संस्था आणि ग्रंथालयांची उभारणी केली. इ. स. पाचव्या शतकात नालंदा विद्यापीठ हे शिक्षणाचे एक मुख्य केंद्र म्हणून विकसित झाले होते. या विद्यापीठात सुमारे १०,००० विद्यार्थी आणि १५०० शिक्षकांचे संख्याबळ होते. तामिळनाडूतील कांचीपुरम येथेही एक प्रसिद्ध विद्यापीठ अस्तित्वात असल्याची ऐतिहासिक नोंद आहे. विक्रमशिला आणि ओदंतपुरी यांसारख्या विद्यापीठांनी असंख्य साहित्यकृतींसह देशाच्या बौद्धिक उंचीचे दर्शन जगाला घडवले. बौद्ध शिक्षण संस्था व विद्यापीठांमध्ये संपूर्ण आशियातून अनेक विद्वान अध्ययनासाठी भारतात येत असत. चिनी भिक्खू फॅक्सियन/फा-हियान यांनी बौद्ध धर्माच्या अध्ययनासाठी तब्बल १५ वर्षांची प्रदीर्घ यात्रा केली होती तर चिनी भिक्खू ह्युएनसांग यांनी भारतात १६ वर्षे नालंदा येथे अभ्यास करण्यात आणि अनेक ग्रंथ संकलित करण्यात घालवली. त्यानंतर ते चीनमध्ये परतले.

ह्युएनसांग यांच्या प्रवासवर्णनानुसार, त्यांनी तामिळनाडूतील कांचीपुरमलाही भेट दिली होती, जिथे त्यांनी एका बौद्ध विद्यापीठात वास्तव्य करून अध्ययन केले, हस्तलिखितांची प्रत तयार केली. असे म्हटले जाते की, त्यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना विशेष व्याख्याने दिली होती. कठोर तपश्चर्येनंतर अशक्त झालेल्या बुद्धांविषयी करुणा बाळगून सुजाताने त्यांना प्रेमाने दुधाची खीर अर्पण केली; ज्यामुळे त्यांचे प्राण वाचले आणि त्यांना बोधिवृक्षाखाली ध्यान करण्याची शक्ती मिळाली. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी आपण पायसम तयार करून आणि अर्पण करून त्यांच्या प्रेम आणि दयाळूपणाचे स्मरण करतो.

"प्रेम हे आनंदाचा स्त्रोत आहे, प्रेम हे जगाचा प्रकाश आहे, प्रेम हीच सर्वात मोठी शक्ती आहे-" बुद्धांची ही शिकवण आजही तितकीच प्रासंगिक आहे. संपूर्ण जगात प्रेम आणि शांतता नांदो, हीच प्रार्थना.

(लेखक हे भारताचे उपराष्ट्रपती आहेत.)


## विशेष

# मराठी माणसाचे भाषिक भान

डॉ. विलास चिंतामण देशपांडे

कोणत्या ना कोणत्या कारणास्तव विविध संस्कृती, धर्म बाळगणाऱ्यांची सरमिसळ होते. त्याचा परिणाम एखाद्या प्रांतात बोलल्या जाणाऱ्या प्रांत भाषेवर होणे स्वाभाविक आहे. त्याला मराठी भाषा अपवाद नाही. परिणामी त्या प्रांत क्षेत्रातील मराठीचे उच्चार व लेखन भ्रष्ट होण्याचा संभव असतो. एका वाक्यात दोनपेक्षा अधिक शब्द परभाषेतील आले की भाषा बाटते, (हा पारशी शब्द) असे इतिहासकार वि. का. राजवाडे सातत्याने सांगत असत. भाषा शुद्धी चळवळीचे जाज्वल्य पुरस्कर्ते राहिलेले विनायक दामोदर सावरकरही राजवाड्यांच्याच मताचे. पण 'ऋतुपर्ण'च्या ऐवजी 'रुतुपर्ण' या उच्चारण्याने आमची जीभच बाटते. आमच्या मराठीचे वर्णाक्षर आम्हाला कोण शिकवणार? प्रसार माध्यमांनी (विशेषतः इलेक्ट्रॉनिक) मानधन देऊन ठरवलेले वक्ते व तेथे कार्यरत असणारा कर्मचारी वर्ग मराठी माणसाचे उच्चार बिघडविण्याचेच काम करीत आहे, असे एकूण चित्र आहे. समाज माध्यमातील मजकुरांचे विशेषतः रोमन लिपीत लिहिलेल्या जात असलेल्या मराठीतून तर देवनागरी लिपीचे अतोनात नुकसान होत आले आहे.

सर्वसाधारणपणे गावाचे शहरीकरण होत असताना गावाला एक प्रकारे बकाल वातावरणाचा संसर्ग होण्याचा धोका उत्पन्न होत असतो. तथापि, ज्याचे उच्चार शुद्ध आणि अस्सल मराठी आहेत अशी माणसे नागपूरसारख्या मोठ्या शहरातून आढळतातच. परंतु उडत उच्चार करण्याच्या फॅशनचा सध्या प्रसार माध्यमांना प्रादुर्भाव झाला आहे. माध्यमांमधून होणाऱ्या चर्चा - कार्यक्रमातून उच्चार स्वातंत्र्य बोलणारे घेताना आढळतात. अशा प्रकारच्या लोकांची निवड जनजागृती करणाऱ्या ज्ञान प्रसाराच्या प्रांतात होणे भाषेच्या, शुद्धतेच्या व गोडीच्या दृष्टीने धोक्याचे आहे. अर्थात याला मनोरंजनाचे कार्यक्रम अपवाद ठरतात; पण तेही काही मर्यादेपर्यंतच. इतर भाषेतील शब्द प्रादेशिक भाषेत येणे हे विशिष्ट भाषेच्या विकासाचे लक्षण आहे, परंतु एखाद्या भाषेत किती शब्द आहेत; त्याबरोबरच त्यापैकी किती शब्द जास्तीत जास्त लोकांना समजतात, किती शब्द त्या विशिष्ट भाषेच्या प्रकृतीशी जुळणारे आहेत, किती शब्द त्या भाषेच्या कुशीतून जन्म घेणाऱ्यांच्या प्रत्यक्ष सामाजिक, सांस्कृतिक क्रियांशी व संकेतांशी संबद्ध आहेत, यालाही महत्त्व दिले गेले पाहिजे. मराठीच्या बाबतीत ते होताना दिसत नाही. टीव्हीवरील मराठी डेलीसोपच्या नावाखाली प्रसारित होणाऱ्या मालिका त्याचे साक्षात उदाहरण आहे.



लोकांच्या अंतरंगात जाऊन भिडण्याची तळमळ आणि संस्कृत व संस्कृतीचे ज्ञान यामुळे लोकहितवादी, लोकमान्य टिळक, आगरकर ही मंडळी सुगम, शुद्ध आणि भेदक मराठी लिहू लागली. अगदी अलिकडे स्वातंत्र्योत्तर काळात ना. वि. परूळेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, गोविंद तळवलकर इत्यादी पत्रकारांच्या लेखनाचा दाखला देता येईल. जागतिकीकरणाच्या आगमनाने आजचे तरुण मात्र त्यांच्याच उपयोगाची, ज्ञानाची, व्यवसायासाठी पूरक तेवढीच मराठी वाचत आहे. अत्रे, खांडेकर, फडके, भावे, माडखोलकर इत्यादींचे लेखन त्यांच्या वाचनात नाही. याची कारणे आजच्या पुष्कळशा लेखकांचा मराठीशी संबंध मध्यस्थांमार्फत येण्यात सापडतात. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख इत्यादींचे लेखन वाचण्यातून तरुणांना इंग्रजीपूर्व गद्याचा गाभा आत्मसात केल्याचा आनंद मिळवून देऊ शकतो. इंग्रजानंतरची आधुनिक दृष्टी व इंग्रजीपूर्वीचे मराठीचे बाळबोध वळण यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या लेखनात झालेला आढळेल.

निकोप गद्य व स्वाभाविक सुगम शब्द संग्रह या भाषेच्या प्राथमिक गरजा आहेत. भारतात विविध प्रकारच्या बोली बोलल्या जातात, म्हणून राष्ट्रैक्याच्या नावाखातर या दोन अनमोल ठेव्यावर कोणत्याही प्रादेशिक भाषेने पाणी सोडू नये. जगाच्या पाठीवर महाराष्ट्र असा एकमेव प्रांत आहे की, येथील मराठी माणसाला आपल्या भाषेविषयी तीळमात्र अस्मिता नाही, प्रेम नाही. व्यवसायाची भाषा म्हणून इंग्रजीचा व अखिल भारतीय संपर्काची भाषा म्हणून प्रत्येक प्रांतातील सुशिक्षिताने इंग्रजी, हिंदीचा वापर जरूर करावा, आर्थिक विकासाच्या नावाखाली नवराष्ट्र निर्माण करण्याच्या हव्यासाने दीर्घपरंपरेच्या मराठी भाषेच्या शब्द संपत्तीचा जुगार मांडणे हा शुद्ध वेडेपणा आहे. भाषा सल्लागार समितीने महाराष्ट्र शासनाला ५६ पानांचे जीवन व्यवहाराच्या सर्व अंगांचा विकास व्हावा म्हणून मराठी भाषा धोरणाचा मसुदा दिल्यानंतर शासनाने मात्र २०२४ सालात ५६ पानाच्या धोरणाला आक्रसून १२ पानात बसवले. अर्थात त्यात सर्वसमावेशकता असण्याची शक्यता कमीच. १४ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रात परप्रांतीयांचे संख्याबळ जवळपास ५ कोटी आहे. त्यांना मराठी आलेच पाहिजे, असा आग्रह शासनाच्या पातळीवर सातत्याने होत नाही. या प्रांतातील प्रमुख व्यवसाय व निम्नस्तरीय धंद्यावर परप्रांतीयांची पकड आहे. कारण परप्रांतांसाठी मराठी शिकणे आवश्यकच आहे, असे कुठेही धोरणात म्हटलेले नाही. आर्थिक बळ कमावण्याचे बाबतीत मराठी समाज दुबळा ठरलेला आहे. यात प्रसार माध्यमेही आलेत. मग त्यांचा वचक तो काय असणार? आम्ही मराठी बोलणार नाही, असे ठामपणे आपल्या थोबाडावर फेकणारे शब्द उगाच नाही गैर मराठी माणसाच्या तोंडून बाहेर पडतात.

अगदी नर्सरीपासून मुलांना इंग्रजी/हिंदी बळजबरीने शिकवली जात असताना मराठीसाठी आम्ही विविध सवलती जाहीर करण्यात काय अर्थ आहे? धडाधड मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत असताना आणि त्यास शासनाचा मूक पाठिंबा कसा मिळतो आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. मग कोवळ्या वयात मातृभाषेला पारखी झालेल्या (की केलेल्या?) मुलांना मराठीविषयी आस्था, प्रेम तरी कसं उपजणार? त्याचा दुष्ट परिणाम येथील सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक तसेच उच्चार लेखन क्षेत्रांवर तर होणारच. मराठीचा वापर शक्य होईल तिथे टाळणे हेच मराठी समाजाचे भाषा धोरण आहे का, असे वाटावे अशी स्थिती आहे. शासनाने त्यांचे मराठी भाषाविषयक धोरण त्यांना पाहिजे तसं राबवावे; मात्र मराठी भाषिकांनी आपल्या सांस्कृतिक-भाषिक स्वभावाविषयीचे वैयक्तिक आणि सामूहिक धोरण निश्चित केले पाहिजे. नाही तर नजीकच्या भविष्यात मराठी समाजाचे काही खरे नाही..

९९६००३११४८

## अर्थविशेष

# फ्लॅट उशिरा मिळाला... आता आयकर भरावा लागेल का?

हितेश पारसे

पुनर्विकास हा आजच्या शहरी वास्तवाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे. जुन्या, जीर्ण झालेल्या इमारती पाडून आधुनिक सुविधा असलेली नवीन इमारत उभारणे आणि त्याबदल्यात विद्यमान फ्लॅटधारकांना नवीन फ्लॅट देणे- ही संकल्पना रहिवाशांसाठी फायदेशीर वाटत असली तरी आयकराच्या दृष्टीने ती अत्यंत बारकाईने समजून घेण्यासारखी आहे. अनेक वेळा फ्लॅटधारक असा समज करून घेतात की त्यांनी आपला फ्लॅट विकलेला नसतो, त्यामुळे कर लागू होणार नाही; परंतु आयकर कायद्याच्या दृष्टीने वास्तव वेगळे आहे. पुनर्विकासाच्या व्यवहारात फ्लॅटधारक बिल्डरला त्याच्या मालमत्तेवरील विकास हक्क देतो आणि त्या बदल्यात नवीन फ्लॅट, अतिरिक्त क्षेत्र, भाडे, कॉर्पस किंवा काही वेळा रोख रक्कम मिळवतो. आयकर कायद्यातील 'ट्रान्सफर' या संकल्पनेत अशा प्रकारचा व्यवहार स्पष्टपणे समाविष्ट होतो, त्यामुळे हा व्यवहार भांडवली नफा (कॅपिटल गेन) निर्माण करणारा ठरतो.

भांडवली नफ्यावर कर लागू होतो, मात्र करदात्यांना दिलासा देण्यासाठी कायद्यात सेक्शन ५४ आणि सेक्शन ५४ एफ सारख्या तरतुदी आहेत. या तरतुदींनुसार, जर करदात्याने जुन्या मालमत्तेच्या बदल्यात नवीन निवासी घर घेतले किंवा बांधले आणि ते काम ३ वर्षांच्या आत पूर्ण झाले, तर भांडवली नफ्यावर करमाफी मिळू शकते. ही तरतूद पुनर्विकासाच्या व्यवहारात विशेषतः महत्त्वाची ठरते, कारण बहुतेक वेळा फ्लॅटधारकांना नवीन फ्लॅटच मिळतो. परंतु या करमाफीची सर्वांत महत्त्वाची अट म्हणजे नवीन घर ३ वर्षांच्या आत पूर्ण झाले पाहिजे. याच ठिकाणी प्रत्यक्ष व्यवहार आणि कायद्याची अट यांच्यात संघर्ष निर्माण होतो. वास्तवात, अनेक पुनर्विकास प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाहीत. प्रकल्पाला लागणाऱ्या विविध मंजुरी, पर्यावरणीय परवानग्या, आर्थिक अडचणी, बांधकामातील विलंब किंवा काही वेळा बिल्डरच्या व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे प्रकल्प ३ वर्षांच्या आत पूर्ण होणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत आयकर विभाग कडक भूमिका घेतो आणि असे म्हणू शकतो की करदात्याने सेक्शन ५४ किंवा ५४ एफ मधील अट पूर्ण केलेली नाही, त्यामुळे त्याला दिलेली करमाफी रद्द केली जावी. याचा थेट परिणाम म्हणजे आधी वाचवलेला भांडवली नफा करयोग्य ठरतो, त्यावर व्याज लावले जाते आणि काही प्रकरणांमध्ये दंड देखील आकारला जाऊ शकतो. परंतु, न्यायालयांनी या विषयाकडे केवळ तांत्रिक दृष्टिकोनातून न पाहता, व्यावहारिक आणि न्याय्य दृष्टिकोनातून पाहिले आहे. सीआयटी विरुद्ध संबंदम उदयकुमार या प्रकरणात न्यायालयाने स्पष्ट केले की, जर करदात्याने आपली जबाबदारी पूर्ण केली असेल आणि विलंब हा बिल्डरच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे झाला असेल, तर केवळ ३ वर्षांची अट पूर्ण झाली नाही म्हणून करमाफी नाकारता येणार नाही. त्याचप्रमाणे, सीआयटी विरुद्ध श्रीमती बी. एस. शांतकुमारी या प्रकरणात न्यायालयाने असे नमूद केले की पूर्ण बांधकाम झाले नाही तरी करदात्याने प्रामाणिकपणे गुंतवणूक केली असल्यास सूट दिली जाऊ शकते. तसेच पीसीआयटी विरुद्ध राम कुमार सुरी या प्रकरणातही न्यायालयाने हेच मत मांडले की करदात्याला बिल्डरच्या चुकांसाठी शिक्षा करता येत नाही. या सर्व निर्णयांमधून एक मूलभूत तत्त्व स्पष्ट होते- 'भरीव अनुपालन' म्हणजे करदात्याने प्रामाणिकपणे कायद्याचे पालन करण्याचा प्रयत्न केला असल्यास, तांत्रिक त्रुटींवरून त्याला करमाफी नाकारू नये. याशिवाय, सरकारने पुनर्विकासातील करप्रश्न सोडवण्यासाठी कलम ४५(५अ) ही विशेष तरतूद लागू केली आहे, जी या क्षेत्रात एक गेम चेंजर मानली जाते. या तरतुदीनुसार, वैयक्तिक किंवा एचयूएफ करदात्यांच्या बाबतीत भांडवली नफा तेव्हा करयोग्य ठरतो जेव्हा प्रकल्पाचा पूर्णतः प्रमाणपत्र (सीसी) जारी होतो. याचा अर्थ असा की, जरी पुनर्विकास करार आधीच्या वर्षात झाला असला तरी कर भरण्याची जबाबदारी पुढे ढकलली जाते आणि ती सीसी मिळाल्यानंतरच्या वर्षात येते. त्यामुळे, जर बिल्डरने प्रकल्प पूर्ण करण्यात उशीर केला, तर करदात्यालाही कर भरण्याची वेळ पुढे ढकलण्याचा फायदा मिळतो. तथापि, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कलम ४५(५अ) हा केवळ कर भरण्याचा कालावधी निश्चित करतो; कलम ५४अंतर्गत मिळणाऱ्या करमाफीच्या अटी स्वतंत्रपणे लागू राहतात.

व्यावहारिक पातळीवर पाहता, पुनर्विकासातील सर्वांत मोठी गरज म्हणजे योग्य कर नियोजन आणि योग्य करार रचना जर करारात योग्य प्रकारे अटी नमूद केल्या नसतील किंवा कलम ४५(५अ) लागू होईल याची काळजी घेतली नसेल, तर करदात्याला अनावश्यक कराचा भार सहन करावा लागू शकतो. तसेच, काही वेळा फ्लॅटधारक बिल्डरकडून काही रोख मोबदला (रोख घटक) आधी स्वीकारतात, ज्यामुळे कर त्वरित लागू होण्याची शक्यता वाढते. याशिवाय, नवीन फ्लॅट पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळण्यापूर्वी विकल्यास कलम ५४ अंतर्गत मिळणारी सूट धोक्यात येऊ शकते. म्हणूनच, पुनर्विकास हा केवळ बांधकामाचा व्यवहार नसून तो कायदेशीर आणि करदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. योग्य सल्ला, योग्य दस्तऐवजीकरण आणि योग्य नियोजन केल्यास करदात्याला मोठ्या प्रमाणावर कर वाचवता येतो आणि भविष्यातील वाद टाळता येतात. एकंदरीत, बिल्डरने ३ वर्षांच्या आत फ्लॅट दिला नाही तरी करदात्याने घाबरण्याची गरज नाही. कायद्याच्या कडक अटी असूनही न्यायालयीन निर्णय करदात्याच्या बाजूने आहेत आणि कलम ४५(५अ) मुळे कराची देयता पुढे ढकलता येते. योग्य नियोजन आणि व्यावसायिक सल्ल्याच्या मदतीने पुनर्विकासातील आयकराचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो आणि करमाफीचा पूर्ण लाभ घेता येतो.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वाचक पत्रे

### मराठी अस्मितेचा आणि संघर्षाचा गौरव सोहळा आज

१ मे हा दिवस प्रत्येक मराठी माणसासाठी केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून तो स्वाभिमानाचा, बलिदानाचा आणि गौरवाचा सण आहे. १९६० साली याच दिवशी नकाशावर 'महाराष्ट्र' हे स्वतंत्र राज्य अवतरले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याची मागणी जोर धरू लागली होती. परंतु, तत्कालीन केंद्र सरकार मुंबईसह महाराष्ट्र राज्य देण्यास अनुकूल नव्हते. या अन्यायाविरुद्ध 'संयुक्त महाराष्ट्र समिती'च्या नेतृत्वाखाली अभूतपूर्व लोकचळवळ उभी राहिली. मुंबई महाराष्ट्राला मिळावी यासाठी झालेल्या आंदोलनात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या या बलिदानामुळेच केंद्र सरकारला नमते घ्यावे लागले. अखेर १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. १ मे हा दिवस साजरा करताना आपण केवळ आनंद व्यक्त न करता, महाराष्ट्राची परंपरा जपण्याचा आणि राज्यात असलेल्या लव्ह जिहादसारख्या गंभीर समस्या समूळ नष्ट करून राज्याला खऱ्या अर्थाने अधिक प्रगत आणि सुरक्षित करण्याचा संकल्प केला पाहिजे.

**वर्षा आवदे**/नागपूर

### नको करू पर्यावरणाचा नाश...


पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज ओळखून समाजात प्रत्येक स्तरावर याकरिता काम करणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे. कारण निसर्ग हे मानव, प्राणी, पक्षी आणि वनस्पती यांना लाभलेले एक मोठे वरदान आहे. पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु, सध्याच्या औद्योगिक आणि आधुनिक युगात मानवी क्रियाकलापांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे केवळ झाडे लावणे नव्हे, तर निसर्गाचा समतोल राखणे होय. मानवाच्या स्वार्थी आणि बेजबाबदार वागणुकीमुळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे. विकासकामांच्या नावाखाली वनांची कत्तल होत आहे. उद्योगधंदे, वाहनांचा धूर आणि रासायनिक कचऱ्यामुळे हवा, पाणी आणि जमीन प्रदूषित होत आहे. शिवाय प्लॅस्टिक प्रदूषणामुळे जलचरांचे, जमिनीवरील प्राण्यांचे आणि जमिनीचे आरोग्य धोक्यात आले आहे. पर्यावरणाचा समतोल न ठेवल्याने, हरितगृह वायूंचे प्रमाण वाढल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, ज्यामुळे हवामान बदल होत आहे. तसेच तापमानात बरेच बदल होताना पाहायला मिळतात आणि जागतिक तापमानवाढ यासारखे शब्द कानावर पडतात. पर्यावरणाचा ऱ्हास यामागे नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर हे एक कारण आहे. यात प्रामुख्याने पाणी, खनिजे आणि इतर नैसर्गिक साधनांचा अमर्याद वापर केल्यामुळे ती संपत चालली आहेत. तेव्हा पर्यावरणाचे रक्षण व संवर्धनाचे उपायांतर्गत प्रथम पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आणि वसुंधरेचे रक्षण करण्यासाठी विचार करणे आणि उपाययोजना करणे आवश्यक आहे. दरवर्षी नवीन झाडे लावणे आणि ती जगवणे हे सर्वात महत्त्वाचे पाऊल वृक्षारोपण आणि संवर्धनातंर्गत करणे गरजेचे आहे. पुनर्वापर आणि कमी वापर करणे, प्लॅस्टिकचा वापर टाळणे आणि कचरा कमी करणे तसेच सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या हरित उर्जेचा अपारंपरिक आणि प्रदूषणमुक्त ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवण्याकडे विशेष भर देणे व याकरिता आकर्षक विविध योजना राज्यस्तरावर राबविणे गरजेचे आहे. प्रदूषण नियंत्रणावरही विशेष कार्य करण्याची विविध विभागाने कार्य करणे आवश्यक आहे. जसे सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, वाहनांचा कमी वापर करणे आणि कारखान्यांचा धूर फिल्टर करणे, सामाजिक दायित्वाच्या दृष्टिकोनातून पर्यावरणाचे महत्त्व समजून घेणे आणि इतरांनाही त्याबद्दल जागरूक करणे अपरिहार्य आहे. कारण पर्यावरणाचा समतोल बिघडणे म्हणजे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणे होय. त्यामुळे आपली पृथ्वी वाचवण्यासाठी आणि भावी पिढीसाठी स्वच्छ, सुंदर पर्यावरण ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपली नैतिक जबाबदारी ओळखून पर्यावरणाचे रक्षण वरील मुद्यांचे आधारे करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०



## महत्त्वाचे

### परागला ई-सिगारेट ओढणे पडले महागात



**नवी दिल्ली :** राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागला एका आयपीएल सामन्यादरम्यान ई-सिगारेट ओढताना पकडण्यात आले. ई-सिगारेट ओढणे त्याला महागात पडले. पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान ई-सिगारेट ओढताना आढळल्यामुळे रियान परागला त्याच्या सामन्याच्या मानधनाच्या २५ टक्के रक्कम दंड म्हणून ठोठावण्यात आला आहे, तसेच त्याच्या खात्यावर एक डिम पॉईंट (नकारात्मक गुण) जमा करण्यात आला आहे. या घटनेचे दृश्य पुरावे समोर आल्यानंतरच संबंधित अधिकाऱ्यांनी यावर कारवाई केली. त्यामुळे सामना पंचांनी याला आचारसंहितेचे स्तर १ चे उल्लंघन असल्याचे घोषित केले. आयपीएलच्या नियमांनुसार, स्तर १ च्या गुन्ह्यांसाठी सामन्याच्या मानधनात कपात करण्यासारख्या आपोआप लागू होणाऱ्या शिक्षांची तरतूद असते, ज्यासाठी कोणत्याही सुनावणीची आवश्यकता नसते. राजस्थान रॉयल्सच्या संघाकडून धावांचा पाठलाग सुरू असताना परागने केलेल्या या कृतीवर समाज माध्यमावर जोरदार टीका झाली. रियानने आपला गुन्हा मान्य केला.

### श्रेयस अय्यर फॉर्म्युला-१ सिम रेसिंगचा सदिच्छादूत

**अहमदाबाद :** फॉर्म्युला वन सिम रेसिंग इंडिया ओपन २०२६ च्या शुभारंभापूर्वी मुंबई फाल्कन्स रेसिंग लिमिटेडने भारतीय क्रिकेटपटू श्रेयस अय्यरच्या नावाची घोषणा केली असून, त्याची भारतातील फॉर्म्युला १-समर्थित सिम रेसिंग उपक्रमासाठी अधिकृत सदिच्छादूत म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई फाल्कन्सला अधिकृत फॉर्म्युला १-मान्यताप्राप्त सिम-रेसिंग स्पर्धेचे आयोजन करण्याचे हक्क देणाऱ्या करारानुसार आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश, देशभरातील उदयोन्मुख ई-स्पोर्ट्स रेसिंग प्रतिभेसाठी एक संघटित राष्ट्रीय व्यासपीठ तयार करणे हा आहे. सर्व फॉरमॅटमध्ये भारताच्या सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अय्यरने, क्रिकेटच्या पलीकडे जाऊन तरुण प्रेक्षकांशीही एक घट्ट नाते निर्माण केले आहे.

# गुजरात टायटन्सच्या गोलंदाजांचे वर्चस्व

**बंगळुरू १९.२ षटकांत सर्वबाद १५५**



विराट कोहलीला बाद केल्याचा आनंद व्यक्त करताना कॅगिसो रबाडा

◆ **अहमदाबाद, ३० एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमिर लीग हंगामात गुरुवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर आयपीएल सामन्यात गुजरात टायटन्सच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा करत गत विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला १९.२ षटकांत १५५ धावांत गुंडाळले. त्यामुळे आता गुजरातसमोर विजयासाठी १५६ धावांचे लक्ष्य राहिले.

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. आरसीबीने ९.४ षटकांत ९१ धावांत आपला निम्मा संघ गमावला. जेकब बेथेल व विराट कोहलीने आरसीबीच्या डावाची सुरुवात करताना १६ चेंडूंत ३४ धावांची सलामी भागीदारी केली असताना मोहम्मद सिराजने बेथेलला डीपमिडविकेटवर रशीद खानकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. त्यानंतर देवदत्त पडिक्कलच्या साथीने खेळताना विराट कोहली रबाडाच्या गोलंदाजीला बळी पडला. कोहलीने १३ चेंडूंत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने २८ धावा केल्या. त्यानंतर देवदत्त पडिक्कलने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत आरसीबीचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र दुसऱ्या टोकावरून सहकारी फलंदाज गुजरातच्या गोलंदाजांच्या अचूक माऱ्यापुढे फार वेळ खेळपट्टीवर टिकाव धरू शकले नाहीत. कर्णधार रजत पाटीदार १५ चेंडूंत १९ धावा करून बाद झाला. तिसऱ्या पंचाव्दारे पाटीदारला बाद झाल्याच्या निर्णयावर कोहलीने नाराजी व्यक्त केली. पुढच्याच षटकांत होल्डरने गोलंदाजी घेतली आणि जितेश शर्माला १ धावेवर यष्टिरक्षकाकडे झेल देऊन बाद केले. लवकरच डेव्हिडने रशीदला ६ चेंडूंत ९ धावांवर असताना मिडविकेटला उभ्या असलेल्या होल्डरकडे झेल देऊन बाद केले आणि आरसीबीची धावसं‘या ५ गडी बाद ९१ झाली. नंतर कृणाल पांड्याही ४ चेंडूंत ४ धावा काढून अर्शद खानच्या गोलंदाजीला बळी पडला. देवदत्तने रोमारिओ शेफर्डच्या साथीने संघाला १२६ धावांवर आणले, मात्र याचवेळी रशीद खानने देवदत्तचा त्रिफळा उडविला. पुढच्याच षटकांत संघाच्या त्याच धावसं‘येवर रोमारिओला (१७) होल्डरने साई सुदर्शनकडून झेलबाद केले. देवदत्त पडिक्कलने २४ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ४० धावांची खेळी केली. नंतर व्यंकटेश अय्यर व भुवनेश्वर कुमारने संयमाने खेळत आरसीबीला कसे-बसे १५५ धावांवर पोहोचवले. अर्शद खानने व्यंकटेशच्या (१२) रुपाने आपला तिसरा बळी मिळविला. झटपट धाव काढण्याच्या नादात जोश हेझलवूड (०) धावबाद झाला आणि येथेच आरसीबीचा डाव १९.२ षटकांत १५५ धावांत आटोपला. भुवनेश्वर १५ धावांवर नाबाद राहिला.

गुजरात टायटन्सकडून अर्शद खानने ३ बळी, जेसन होल्डर, रशीद खानने प्रत्येकी २ बळी, तर मोहम्मद सिराज व कॅगिसो रबाडाने प्रत्येकी एक महत्त्वपूर्ण बळी टिपण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)

# दिल्लीसमोर राजस्थान रॉयल्सचे आव्हान



**आजचा सामना**
राजस्थान रॉयल्स वि. दिल्ली कॅपिटल्स
**स्थळ :** सवाई मानसिंह स्टेडियम, जयपूर
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट लप्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

◆ **जयपूर, ३० एप्रिल**

१९ व्या इंडियन वप्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी येथे राजस्थान रॉयल्स व दिल्ली कॅपिटल्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

राजस्थान रॉयल्सने आतापर्यंत नऊ सामने खेळले असून, त्यामध्ये त्यांनी सहा विजय व तीन पराभव नोंदविले आहेत. गुणतालिकेत सध्या ते १२ गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहेत.

गत सामन्यात २२३ धावांचे विशाल लक्ष्य यशस्वीरित्या गाठून, पंजाब किंग्सची अजिंक्य मालिका खंडित केल्यामुळे रियान परागच्या नेतृत्वाखालील या राजस्थान संघाचा आत्मविश्वास सध्या नक्कीच उंचावलेला असेल.

मात्र, रियान पराग याची अत्यंत निराशाजनक कामगिरी ही राजस्थानसाठी चिंतेचा एक प्रमुख विषय आहे. गत सामन्यात त्याने एक महत्त्वपूर्ण व छोटीशी खेळी केली होती, ती खेळी त्याच्या आत्मविश्वासाला चालना देणारी ठरेल, अशी आशा आहे. गत सामन्यात राजस्थानची मधली फळीही बहरली होती, ही त्यांच्यासाठी एक अत्यंत सकारात्मक बाब आहे.

दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्सची अवस्था मात्र काहीशी बिकट झाली आहे. आतापर्यंत खेळलेल्या आठ सामन्यांपैकी त्यांना केवळ तीनच सामन्यांत विजय नोंदविता आला असून, पाच सामन्यांत त्यांना पराभव पत्करावा लागला आहे. गुणतालिकेत ते सध्या सातव्या क्रमांकावर अडकून पडले आहेत. अक्षर पटेल आणि त्याच्या सहकाऱ्यांना सध्या सलग तीन सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे.

**दिल्लीला प्ले-ऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी विजय आवश्यक**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या गत सामन्यात मानहानिकारक पराभव पत्करावा लागल्यानंतर दिल्ली कॅपिटल्स संघ जोरदार पुनरागमन करण्यास उत्सुक असेल. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात यजमान दिल्लीचा संघ अवघ्या ७५ धावांत गारद झाला होता; त्यानंतर बंगळुरूने हे माफक लक्ष्य केवळ ६.३ षटकांतच गाठले. शुक्रवारी जर दिल्लीचा पराभव झाला, तर प्ले-ऑफमध्ये पोहोचण्याच्या त्यांच्या संधी लक्षणीयरीत्या कमी होतील.

सवाई मानसिंग स्टेडियम हे नेहमीच समतोल खेळपट्ट्यांसाठी ओळखले गेले आहे. तथापि, आयपीएल २०२६ मध्ये या मैदानावर झालेल्या पहिल्याच सामन्यात, सनरायझर्स हैदराबादने २२९ धावांचे लक्ष्य गाठताना पाच गडी आणि नऊ चेंडू राखून विजय मिळवला. जर शुक्रवारी या दोन्ही संघांना अशाच प्रकारच्या खेळपट्टीचा सामना करावा लागला, तर गोलंदाजांना आपल्या गोलंदाजीच्या अंमलबजावणीत अत्यंत अचूक राहावे लागेल; कारण तिथे कोणत्याही चुकीला वाव नगण्य असेल. (वृत्तसंस्था)

# क्षेत्ररक्षकांनी गोलंदाजांना भक्कम साथ दिली पाहिजे : ऱ्होड्स

◆ **नवी दिल्ली, ३० एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मधील इम्पॅक्ट प्लेयर नियमामुळे फलंदाजीसाठी अत्यंत अनुकूल आणि सतत आक्रमक राहणारे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे गोलंदाजांवर प्रचंड दबाव येत असून, अशा परिस्थितीत क्षेत्ररक्षकांनी गोलंदाजांना साथ दिली पाहिजे, केवळ उत्कृष्ट क्षेत्ररक्षणच त्यांना काहीसा दिलासा देऊ शकते, असे मत दक्षिण आफ्रिकेचे माजी दिग्गज क्षेत्ररक्षक आणि आता युरोपियन टी-२० प्रीमियर लीगमधील रॉटरडॅम संघाचे सह-मालक असलेले जॉन्टी ऱ्होड्सने व्यक्त केले.

जॉन्टी ऱ्होड्सची ही टिप्पणी गोलंदाजांसाठी अत्यंत कठीण ठरलेल्या आयपीएल २०२६ हंगामाच्या पृष्ठभूमीवर आली आहे. या हंगामात जसप्रीत बुमराहसारख्या अव्वल दर्जाच्या वेगवान गोलंदाजालाही फलंदाजांनी अक्षरशः चोपून काढले असून, सात सामन्यांत त्याला केवळ दोनच बळी मिळविता आले आहेत. फलंदाजी आणि गोलंदाजी यांच्यातील या असंतुलनामुळे, स्पर्धेचे खेळण्याचे नियम फलंदाजांच्या बाजूने खूपच झुकले आहेत का, यावर चर्चांना उधाण आले आहे; विशेषतः इम्पॅक्ट प्लेयर नियमाच्या अंमलबजावणीनंतर हा प्रश्न अधिकच ऐरणीवर आला आहे. मला असे वाटते की, इम्पॅक्ट प्लेयर नियमाचा समावेश झाल्यामुळे तुमच्या संघात एक अतिरिक्त फलंदाज उपलब्ध होतो. त्यामुळे २० षटकांच्या सामन्यात, जर तुम्ही आक्रमक फलंदाजी केली, तर तुम्ही सतत जोखीम पत्करत खेळणे सुरू ठेवू शकतो. हो, तुम्ही एखाद्या गोलंदाजाला इम्पॅक्ट प्लेयर म्हणून संघात समाविष्ट करू शकतो. (वृत्तसंस्था)

# उपांत्यपूर्व फेरीत भारताची गाठ चीन तैपेईशी

**थॉमस चषक बॅडमिंटन**



◆ **हॉर्सेन्स, ३० एप्रिल**

गुरुवारी येथे झालेल्या नॉकआउट ड्रॉनंतर प्रतिष्ठेच्या थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय पुरुष संघाचा सामना चीन तैपेईशी होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

२०२२ चे विजेते असलेल्या भारतीय संघाने गट अ मध्ये दुसरे स्थान पटकावले. कॅनडा व ऑस्ट्रेलियाविरुद्ध अनुक्रमे ४-१ आणि ५-० अशा विजयांची नोंद करीत, पहिल्या दोन सामन्यांनंतरच भारताने उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान पक्के केले होते. मात्र, बुधवारी झालेल्या गटातील त्यांच्या शेवटच्या सामन्यात त्यांना चीनकडून ३-२ असा पराभव पत्करावा लागला. चीन तैपेईचा संघ स्पर्धेबाहेर पडण्याच्या अगदी उंबरठ्यावर पोहोचला होता; मात्र, अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक मार्गाचा अवलंब करीत त्यांनी कसाबसा मार्ग काढला आणि थॉमस चषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले.

गट क मधील यजमान डेन्मार्कविरुद्धचा शेवटचा सामना जिंकणे चीन तैपेईसाठी अनिवार्य होते. डेन्मार्कला मात्र केवळ एक सामना जिंकणे पुरेसे होते. गट अ मध्ये अव्वल स्थान पटकावत अजिंक्य राहिलेल्या आणि गतविजेत्या चीनचा सामना आता मलेशियाशी होणार आहे. गट ब मध्ये अव्वल ठरलेल्या जपानचा सामना फ्रान्सशी होईल. दरम्यान, गट क मध्ये दुसरे स्थान मिळवणाऱ्या यजमान डेन्मार्कचा सामना आता थायलंडशी होणार आहे. असे होतील बाद फेरीचे सामने- चीन विरुद्ध मलेशिया, थायलंड विरुद्ध डेन्मार्क, फ्रान्स विरुद्ध जपान आणि भारत विरुद्ध चीन तैपेई. (वृत्तसंस्था)

# साउथ एशियन गोल शॉट बॉलमध्ये भारतीय संघास विजेतेपद

**संघात सिंहगड स्कूलच्या ८ विद्यार्थ्यांचा समावेश**

**सोलापूर रेल्वे स्थानकावर जल्लोषात स्वागत**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे २४ ते २८ एप्रिलदरम्यान पार पडलेल्या साउथ एशियन गोल शॉट बॉल चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत भारतीय संघाने अभूतपूर्व कामगिरी करत चारही गटांमध्ये विजेतेपद पटकावत सर्वांगीण वर्चस्व सिद्ध केले. विशेष म्हणजे या विजयी संघात केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथील तब्बल ८ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

भारतीय संघ स्पर्धा जिंकून परतताना संघ चेन्नई मार्गे रेल्वेने सोलापूरला दाखल झाला. स्पर्धेतील सब-ज्युनियर बॉईज, सब-ज्युनियर गर्ल्स, यूथ बॉईज आणि यूथ गर्ल्स या सर्व गटांमध्ये भारताने अपराजित कामगिरी करत सुवर्णपदकांची लयलूट केली. प्रत्येक गटात भारताने लीग फेरीपासून अंतिम सामन्यापर्यंत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखत शानदार विजय नोंदवले.

सब-ज्युनियर बॉईज गटात भारताने अंतिम फेरीत श्रीलंकेवर २३-१८ असा विजय मिळवला, तर सब-ज्युनियर गर्ल्स गटात १९-१६ अशी मात केली. यूथ बॉईज गटात ३६-२७ आणि यूथ गर्ल्स गटात २३-१९ अशा विजयांसह भारताने सर्वच गटांमध्ये सुवर्णपदक पटकावत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. या स्पर्धेत सिंहगड संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार प्रदर्शन केले. सब-ज्युनियर गर्ल्स गटात जानवी बुराडे, यूथ गर्ल्स गटात श्रद्धा चव्हाण व आर्या पाटणे, सब-ज्युनियर बॉईज गटात आदित्य गुंड, आशिष बनसोडे व समर्थ मगर, तसेच यूथ बॉईज गटात अथर्व गुर्रम व वरुण सरडा यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत देशाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

सोलापूर रेल्वे स्थानकावर जल्लोषात स्वागत विजय मिळवून सोलापूरमध्ये आगमन होताच सोलापूर रेल्वे स्थानक येथे या विजेत्या खेळाडूंचे उत्स्फूर्त आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले. स्वागतावेळी परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

**प्रशिक्षक व क्रीडाशिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे**

यावेळी बोलताना संजय नवले यांनी विद्यार्थ्यांचे, प्रशिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन करत सांगितले की, आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. क्रीडा क्षेत्रात सिंहगडचे विद्यार्थी सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. या यशामागे भारतीय संघाचे प्रशिक्षक व क्रीडाशिक्षक राजू ठाकूर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांच्या तांत्रिक प्रशिक्षण, शिस्तबद्ध सराव आणि मानसिक तयारीमुळे संघाने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.

# भारतीय मुष्टियोद्धे आशियाई स्पर्धेसाठी सज्ज



◆ **नवी दिल्ली, ३० एप्रिल**

भारताने ताश्कंद येथे होणाऱ्या आशियाई १५ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील गटाच्या मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धा २०२६ साठी ५६ सदस्यांचे पथक पाठविले आहे. या स्पर्धेत १७ वर्षांखालील आणि १५ वर्षांखालील या दोन्ही गटांमध्ये मुले व मुली अशा दोन्ही विभागांचा समावेश आहे.

१७ वर्षांखालील संघांमध्ये प्रत्येकी १३ मुष्टियोद्ध्यांचा समावेश असून, ते ४४ किलो ते +८० किलो या वजन गटांमध्ये स्पर्धा करतील. १५ वर्षांखालील संघांमध्ये प्रत्येकी १५ मुष्टियोद्ध्यांचा समावेश असून, ते ३० किलो ते +७० किलो या वजन गटांमध्ये स्पर्धा करतील.

भविष्यातील उत्कृष्ट भारतीय मुष्टियोद्धे घडविण्यासाठी ही अजिंक्यपद स्पर्धा एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरते.

**भारताचे मजबूत पथक**

मुले आणि मुली अशा दोन्ही विभागांमध्ये एक मजबूत आणि सर्वसमावेशक संघ घेऊन भारत या प्रतिष्ठित वयोगट-आधारित स्पर्धेत सहभागी होत आहे. तसेच प्रत्येक संघाला चार प्रशिक्षक आणि एका फिजिओथेरपिस्टचे सहकार्य लाभेल.

उत्कृष्ट मुष्टियोद्ध्यांच्या पुढील पिढीला शोधण्यासाठी आणि घडविण्यासाठी ही अजिंक्यपद स्पर्धा एक अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ ठरते. यातील अनेक तरुण खेळाडू राष्ट्रीय स्तरावरील प्रक्रिं येतून पुढे जात, आगामी काळात प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करतील, अशी अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

# सोलापुरात आयपीएल फॅन पार्क

## उद्यापासून क्रिकेटप्रेमींसाठी ‘स्टेडियमसारखा’ थरार




**लकी ड्रॉ काढून विजेत्यांना प्रसिद्ध खेळाडूंचे सही केलेले टी-शर्ट**

शनिवार २ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता चेन्नई सुपर किंग विरुद्ध मुंबई इंडियन्स हा सामना तर रविवार ३ मे रोजी दुपारी अडीच वाजल्यापासून दोन सोमने होतील. पहिला सामना सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध कोलकत्ता नाईट रायडर्स आणि दुसरा सामना गुजरात टायटन्स विरुद्ध पंजाब किंग्स हे सामने पाहता येणार आहेत. यावेळी उपस्थिती प्रेक्षकांतून लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे. विजेत्यांना प्रसिद्ध खेळाडूंनी सही केलेले टी-शर्ट देण्यात येणार आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

देशभरातील क्रिकेटप्रेमींसाठी यंदाचा इंडियन प्रीमियर लीग (IPL 2026) हंगाम अधिक मोठा, भन्नाट आणि आकर्षक ठरणार आहे. चाहत्यांच्या उत्साहाला नवा आयाम देण्यासाठी आयपीएल फॅन पार्कची भव्य संकल्पना यंदा ५० शहरांमध्ये राबवण्यात येत असून, लाखो चाहते या सोहळ्यात सहभागी होण्यास सज्ज आहेत. २ व ३ मे रोजी हा थरार जुळे सोलापुरातील विजापूर रस्त्यावरील नेहरूनगर शासकीय मैदानावर आयोजित केल्याची माहिती सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मैदानावर ३२ बाय १८ फुटाचा मोठी स्क्रीन लावण्यात येत आहे. मागील वर्षी याच ठिकाणी १७ हजार प्रेक्षक उपस्थित होते. यंदा २५ हजार प्रेक्षक उपस्थित राहतील, अशी अपेक्षा आहे. या फॅन पार्कमध्ये मोठ्या स्क्रीन्सवर सामन्यांचे थेट प्रक्षेपण होणार असून, मैदानात बसल्याचा अनुभवच चाहत्यांना मिळणार आहे. विशेष म्हणजे, या फॅन पार्क्समध्ये प्रवेश पूर्णपणे मोफत असणार आहे. अधिकृत प्रायोजकांच्या माध्यमातून संगीत, खाद्यपदार्थ, शीतपेये आणि विविध मनोरंजन उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. त्यामुळे क्रिकेटसोबतच फॅमिली एंटरटेनमेंटचाही आनंद घेता येणार आहे. चाहत्यांना त्यांच्या आवडत्या संघ आणि खेळाडूंबद्दलचे प्रेम व्यक्त करण्याची संधीही येथे मिळणार आहे.

सीमारेषेवरील षटकार, हॅट्रिक्स आणि रोमांचक क्षणांचा थरार अनुभवण्यासाठी आता चाहत्यांनी सज्ज व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे. IPL 2026च्या जल्लोषासाठी उलटगणती सुरू झाली असून, यंदा ‘क्रिकेट फॅनडम’चा उत्सव अधिक रंगतदार ठरणार आहे.

या पत्रकार परिषदेस प्रकाश भुतडा, आनंद दातार, संजय वडजे, ऋत्विज चव्हाण, संतोष बडवे आदी उपस्थित होते.

# भारताचा स्लोव्हाकियावर निसटता विजय

**जागतिक सांघिक टेबल टेनिस स्पर्धा**



◆ **लंडन, ३० एप्रिल**

येथे सुरू असलेल्या आयटीटीएफ जागतिक सांघिक टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेतील गट-७ मधील एका अत्यंत चुरशीच्या लढतीत भारतीय पुरुष संघाने जोरदार पुनरागमन करत स्लोव्हाकियाचा ३-२ असा निसटता पराभव केला. या विजयासह, भारताने गट-७ च्या गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले असून, ग्वाटेमाला विरुद्धच्या पुढील लढतीपूर्वी आपली स्थिती अधिकच मजबूत केली आहे.

ही लढत सतत चढ-उतारांनी भरलेली होती; अखेरीस दबावाखालीही दाखवलेला संयम आणि जिद्दीच्या जोरावर भारताने विजयश्री खेचून आणली.

स्लोव्हाकियाच्या लुबोमिर पिस्टेजने आपल्या अनुभवाचा वापर करत ५१ व्या स्थानी असलेल्या भारताच्या मानुष शाहला पहिल्याच लढतीत ११-८, ५-११, ८-११, ११-५, ११-६ अशा गुणांनी पराभूत केले. त्यानंतर भारताने चोख प्रत्युत्तर दिले. भारताचा जागतिक क्रमवारीत ४२ व्या स्थानी असलेला मानव ठक्कर याने याकुब झेलिंकाचा ११-६, ११-८, ११-६ असा पराभव केला आणि लढतीची स्थिती १-१ अशी बरोबरीत आणली.

मात्र, तिसऱ्या लढतीत स्लोव्हाकियाने पुन्हा एकदा वर्चस्व गाजविले. वांग यांगने अचूक खेळ करीत हरमीत देसाईचा १६-१४, ११-५, ११-९ असा पराभव केला.

१-२ अशा पिछाडीवर पडल्यामुळे करो या मरो अशा स्थितीत सापडलेल्या भारताने त्यानंतर निर्णायक पुनरागमन केले. मानव पुन्हा एकदा संघाच्या मदतीला धावून आला; त्याने लुबोमिरचा ११-३, ११-३, ११-३ असा एकतर्फी आणि दणदणीत पराभव करत लढत पुन्हा बरोबरीत आणली. शेवटच्या लढतीत मानुषने दबावाखालीही उत्कृष्ट कामगिरी करीत याकुबचा ११-८, ११-८, ११-७ असा पराभव केला आणि भारतासाठी ३-२ असा महत्त्वपूर्ण विजय निश्चित केला.

तत्पूर्वी, महिला खेळाडूंनीही गट ६ मधील एका अत्यंत महत्त्वाच्या लढतीत आपली चमक दाखवली. युक्रेन विरुद्धच्या एका थरारक लढतीत त्यांनी ३-२ ने निसटता विजय मिळवला. या विजयामुळे त्यांची स्पर्धेसाठी पात्र ठरण्याची आशा कायम राहिली आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### कवी कालिदास मंडळाच्या अध्यक्षपदी आबासाहेब घावटे यांची बिनविरोध निवड

**बार्शी, दि. ३० एप्रिल-**

कवी कालिदास मंडळाच्या नूतन वर्षाच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये एकमताने निवड करण्यात आली. मंडळाच्या अध्यक्षपदी कथा आणि बाल कथा लेखक आबासाहेब घावटे तर उपाध्यक्ष पदी कवयित्री सुमन चंद्रशेखर यांची नियुक्ती झाली. कार्याध्यक्षपदी साहित्यिक प्रकाश गव्हाणे तर सचिव म्हणून कवयित्री अर्चना पोळ यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली. यावेळी मावळते अध्यक्ष कवी रामचंद्र इकारे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचा सन्मान केला. गेली ३५ वर्षे साहित्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत आणि नवोदित कवींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन देणाऱ्या कवी कालिदास मंडळाचा आषाढाच्या पहिल्या रविवारी होणारा कवी कालिदास महोत्सव



अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण असतो. यावेळी वितरित केले जाणारे राज्यस्तरीय मेघदूत पुरस्कार हे काव्य क्षेत्रातील प्रतिष्ठेचे पुरस्कार समजले जातात. मंडळाची ही वैभवशाली परंपरा पुढे चालवण्याचा किंबहुना ती अधिक समृद्ध करण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न करु, असे मनोगत नूतन अध्यक्ष आबासाहेब घावटे यांनी व्यक्त केले. यावेळी मंडळाचे नूतन पदाधिकारी सुमन चंद्रशेखर, प्रकाश गव्हाणे, अर्चना पोळ यांनीही विचार मांडले. कार्यकारिणी सदस्य मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, रामचंद्र इकारे, प्रा.रविराज फुरडे, शिवानंद चंद्रशेखर यांनी मनोगत व्यक्त केले.



### डॉ. घोडके यांच्यामार्फत गरजूंना उन्हाळी टोप्यांचे वाटप

**महाळुंग, दि. ३० एप्रिल-**

श्रीपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. सचेतन घोडके यांनी आरोग्यवर्धिनी केंद्रातील कर्मचारी तसेच गरजू नागरिकांना उन्हाळी टोप्यांचे वाटप केले. डॉ. सचेतन घोडके प्रत्येक उन्ह्याळ्यामध्ये हा उपक्रम राबवितात. श्रीपूर येथील उजनी वसाहत येथे सर्व सोयींनी सुसज्ज असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातून नागरिकांना सर्व तपासण्या व योग्य औषधोपचार मिळत असून व कायम स्वरूपी वैद्यकीय अधिकारी व पूर्ण स्टाफ असल्याने नागरिकांची चांगली सोय होत आहे.



### संध्या सूर्यकांत धर्माधिकारी यांना राज्यस्तरीय बाबूराव बागुल उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

आंबेडकरी विचाराचे लेखक कवी डी.एस. घोडेस्वार यांच्या पाचव्या स्मृतीदिनानिमित्त भुसावळ येथे दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी आशादिप राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा.वा.ना.आंधळे होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मिलिंद बागुल, डॉ. प्रविण कांबळे, पुष्पाताई साळवी, सुमंगल अहिरे यांच्यासह आयोजक कवयित्री, लेखिका प्रज्ञा बागुल, हंसराज बागुल, आशा घोडेस्वार, विशाल घोडेस्वार, सविता घोडेस्वार, पुजा घोडेस्वार रुपेश साळूंके आदी मान्यवर उपस्थित होते. सोलापूर येथील ग्रामीण कथा लेखिका सौ. संध्या सूर्यकांत धम र्धिकारी यांच्या बेरं या कथासंग्रहाला बाबुराव बागुल उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले. धर्माधिकारी यांच्या बेरं कथासंग्रहाला मिळालेला हा सहावा पुरस्कार आहे.



### कवठेकर प्रशाला येथे संस्कार वर्गास प्रारंभ

**पंढरपूर, दि. ३० एप्रिल-**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित, कवठेकर प्रशाला येथे संस्कार वर्गास प्रारंभ करण्यात आला. प्रारंभ बालचमूच्या औक्षण व स्वागताने झाला. सरस्वती पूजन करून मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील यांनी प्रास्ताविक केले. बालकांवर योग्य वयात उत्तम संस्कार झाल्यास उद्याचा सक्षम नागरिक घडू शकतो, असे सांगितले. उपमुख्याध्यापिका विश्वासे यांनी बालकांना वेगवेगळ्या पद्धतीचे खेळ, छंद, गायन, चित्रकला, स्तोत्रे, धार्मिक व नैतिक मूल्यांच्या गोष्टी व इतर सर्वसंस्कारक्षम अशा बाबी आवर्जून शिकवण्यात येतील, असे सांगितले. प्रमुख अभ्यागत म्हणून पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु.र.पटवर्धन यांनी विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी संस्कार वर्गाची नितांत गरज असल्याचे सूचित केले. कार्यक्रमास पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमन वीणा जोशी व सर्व सदस्यांनी आपल्या शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ पर्यवेक्षक एम.बी. गडदे यांनी पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन नाना कवठेकर, सदस्य डॉ. मिलिंद जोशी, आदर्श बाल प्राथमिक मंदिरच्या मुख्याध्यापिका माया सांगोलकर व सर्व पालकांचे आभार मानले. यावेळी अनेक प्रतिष्ठित नागरिक, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षिका एडगे यांनी केले.

# श्रीपूर येथील कर्मयोगी कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

### ऊस उत्पादनासाठी एआय तंत्रज्ञान विकसित

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३० एप्रिल -**

येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या २०२६-२७ या गळीत हंगामाचे मिल रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक यांच्याहस्ते व व्हा. चेअरमन कैलास खुळे, उमेश परिचारक, सर्व संचालक आणि कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झाला. रोलर पुजन जेष्ठ संचालक दिनकर मोरे यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना चेअरमन प्रशांत परिचारक यांनी कारखान्याच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेता यावे व त्यामध्येही



आधुनिकीकरणाचा वापर व्हावा, यासाठी ए.आय.तंत्रज्ञान विकसित केले आहे. ऊस उत्पादकांनी त्याचा जास्तीत जास्त उपयोग करुन घ्यावा यासाठी कारखाना स्तरावरुन ए.आय.तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात येत असल्याचे सांगितले.

कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांनी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याकडे गळीत हंगाम २०२६/ २७ साठी सुमारे १०,५०० हेक्टर क्षेत्राच्या ऊस नोंदी झाल्या आहेत. सध्या उन्हाची तीव्रता जास्त असल्यामुळे ऊस क्षेत्रात चढ-उतार होवू शकतो. या हंगामात उपलब्ध होणाऱ्या संपुर्ण ऊसाचे वेळेत गाळप केले जाणार आहे.

कारखान्यामार्फत ऊस उत्पादकांसाठी ऊस विकासाच्या विविध योजना मोठया प्रमाणात राबवत असुन गळीत हंगाम २०२६/ २७ हा विनाखंड चालविण्यासाठी कारखान्यामधील सर्व कामे सुरु असुन ती वेळेत पुर्ण होतील, असे सांगितले. गळीत हंगामात ऊस तोडणीसाठी आवश्यक असणारी ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा उभारली जात आहे. करार प्रक्रिया सुरु असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन कैलास खुळे, संचालक दिनकर मोरे, उमेश परिचारक, दिलीप चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हणमंत कदम, किसन सरवदे, दाजी पाटील, दिलीप गुरव, शाम साळुंखे, राणू पाटील, कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी उपस्थित होते.

> **ए.आय.तंत्रज्ञानाचा वापर करावा**
>
> ए.आय.तंत्रज्ञान ही योजना कारखाना, शेतकरी व वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट यांच्या संयुक्त विद्यमाने राबवली जात असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी त्याचा अवलंब करावा.
>
> **- प्रशांत परिचारक,**
> चेअरमन, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग कारखाना.

## बार्शीत विवाहितेचा छळप्रकरणी, पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा

### हुंड्यासाठी पाच लाखांची मागणी, मारहाण व मानसिक छळ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० एप्रिल-**

विवाहितेला हुंड्यासाठी छळ व मारहाण केल्याप्रकरणी पती, सासू व सासऱ्यांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी प्रेरणा शुभम कमले (वय २३, रा. सुभाषनगर, बार्शी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा विवाह दि. १९ मार्च २०२१ रोजी शुभम सतीश कमले (रा. गांधी रोड, पंढरपूर) यांच्यासोबत धार्मिक विधीनुसार झाला होता. विवाहानंतर त्या पंढरपूर येथे राहत होत्या. विवाहानंतर काही काळाने पती शुभम कमलेने माहेरुन काहीच आणले नाही, तसेच मुलगा होत नाही अशा कारणांवरुन वारंवार मारहाण करुन शारीरिक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली. सासू राखी कमले व सासरे सतीश कमले यांनीही घरगुती कारण व लग्नातील देवाणघेवाणीवरुन वारंवार टोमणे मारत शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. सुमारे



तीन महिन्यांपूर्वी संबंधितांनी फिर्यादीला घरातून हाकलून दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर त्या दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी माहेरी बार्शी येथे राहण्यासाठी आल्या. मागील महिन्यात पती व सासरचे मंडळी बार्शी येथे आल्यावर, पाच लाख रुपये दिल्यासच नांदवू, अन्यथा नांदवणार नाही, अशी मागणी करत शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या सर्व प्रकारांमुळे दि. १९ मार्च २०२१ पासून ते आजपर्यंत पती शुभम सतिश कमले (वय २८), सासू राखी सतीश कमले (वय ४३) व सासरे सतिश बलभिम कमले (वय ५०, सर्व रा. पंढरपूर) यांनी हुंड्याच्या मागणीसाठी शारीरिक व मानसिक छळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस तपास करत आहेत.

### झोपल्या ठिकाणी २८ वर्षाच्या तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

घरामध्ये रात्रीच्या सुमारास झोपल्या ठिकाणी एका २८ वर्षाच्या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना सलगरवस्ती परिसरातील डोणगाव रोड येथे आज गुरुवारी सकाळी घडली. नितीन चंद्रकांत गायकवाड (वय २८ वर्ष, रा सलगर वस्ती, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

तो बुधवारी रात्री घरात झोपला होता. गुरुवारी पहाटे चार वाजेच्या सुम ारास तो बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला शोभा गायकवाड यांनी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी साडेसात वाजता दाखल केले असता त्याचा दुपारी बारा वाजता मृत्यू झाला.



## एच.एन. कॉलेजमधील अकरावीतील गुणवंतांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

येथील हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये इयत्ता अकरावी वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा प्राचार्य डॉ. सत्यजित शहा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी स्वयंअध्ययन सहाय्य विभाग प्रमुख सारिका महिंद्रकर, समन्वयक प्रा. अजित देवसाळे, स्मिता मगदूम, समीना रंगरेज, डी. ए. गोरनाळे, अमोल क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तय्यबा इंगळगी यांनी केले. शेवटी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

**गुणवंत विद्यार्थी (प्रथम पाच) : अनुदानित :** ओमकार कणकी ९३%, अशुल दरगड ९२.५०%, खुशी चंडक ९२.५०%, विनिता चंडक ९२%, फैजा शेख ९१.८३%, विराज मर्दा ९०.६६% **स्व-वित्तीय :** सुयोग सुरवसे ९५.३३%, सानिका भोसले ९५.१७%, समृद्धी अक्कलकोटे ९४.६७% आर्यन राजदेव ९४.५०%, सौंदर्या मंगरुळे ९३.६७%.

## 'केबीपी' महाविद्यालयात सेवानिवृत्तीनिमित्त समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० एप्रिल -**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयात विविध शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निवृत्ती निमित्त कृतज्ञता सोहळा पार पडला. कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, प्रा. महादेव जेधे, प्रा. राजेंद्र पाटील, कमल शिंदे तसेच प्रयोगशाळा परिचर परमेश्वर बनसोडे यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव, माजी सहसचिव प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे हेही मान्यवर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते.

प्रमुख पाहुणे डॉ. जाधव, यांनी सेवकांनी दिलेल्या योगदानामुळे संस्थेचा नावलौकिक वाढल्याचे नमूद केले. प्राचार्य के.एच.शिंदे यांनी 'सेवकांच्या त्यागातूनच रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष बहरल्याचे सांगितले.



अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी 'निवृत्त होणाऱ्या सेवकांच्या जाण्याने निर्माण होणारी पोकळी भरून काढणे आव्हानात्मक असल्याचे सांगितले. कार्यक्रमात निवृत्त शिक्षक व सेवकांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव, संस्थेबद्दलची कृतज्ञता तसेच सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याची आठवण सांगितली. कार्यक्रमात अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. चंद्रकांत काळे, प्रा. राजाराम गोडसे, प्रा. वर्षा गारोळे, कार्यालयीन प्रमुख चौरंगनाथ वाघमारे, डॉ. रामदास नाईकनवरे, आकांक्षा जेधे, स्वप्निल व्हटकर आदींनीही मनोगते व्यक्त केली. तसेच सांगली येथील दलित चळवळीचे नेते प्रा. सुकुमार कांबळे, प्राचार्य डॉ. चांगदेव कांबळे, प्राचार्य डॉ. तानाजी लोखंडे, पुणे ग्रामीणचे डी. वाय. एस. पी. मनोजकुमार यादव, पत्रकार जैनुद्दीन मुलानी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राध्यापक कल्याण समितीचे चेअरमन डॉ. उमेश साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहिणी बावस्कर, प्रा. दिपाली माने व प्रा. योगिता खपके यांनी केले. आभार प्रा. महेश कोंडुभैरी यांनी मानले समारंभात निवृत्त सेवकांचा पुष्पगुच्छ, पुष्पहार, शाल, श्रीफळ व चांदीचे नाणे देऊन सत्कार करण्यात आला.





## नरसिंह जयंती उत्साहात साजरी

**अकलूज, दि. ३० एप्रिल-**

निरा नरसिंहपूर येथे नरसिंह जयंती निमित्त गेले नऊ दिवस नवरात्र उत्सव व विविध धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. गुरुवारी ह.भ. प. राघवेंद्र देशपांडे यांचे कीर्तन होऊन फुलांचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमानंतर नरसिंहांची दुग्ध अभिषेक पूजा करण्यात आली. पंचक्रोशीतील हजारो भावी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. मंदिर समितीने दर्शनाची उत्तम व्यवस्था केली होती तसेच लाईव्ह प्रक्षेपण हे ठेवले होते. अकलूज येथे वेळापुरे कुटुंबाच्या वतीने नरसिंह जयंती साजरी करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मोहन वेळापुरे व त्यांच्या पत्नी शिला वेळापुरे यांनी पूजन केले.

# वैरागच्या अमित खेंदाडची नवी मुंबई पोलीस दलात निवड

### भावाचा पाठिंबा अन् सात वर्षांच्या कष्टाला मिळालं यश

● जिद्द आणि चिकाटीचं फळ; हॉटेलवर काम करणाऱ्या भावाने पूर्ण केलं धाकट्याचं स्वप्न

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३० एप्रिल-**

परिस्थिती माणसाला हरवू शकत नाही, जर मनात जिद्द आणि पाठीशी कुटुंबाचा भक्कम पाठिंबा असेल. याचाच प्रत्यय वैराग (ता. बार्शी) येथील अमित खेंदाड याच्या यशाने दिला आहे. गेल्या ७-८ वर्षांपासून सातत्याने पोलिस भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या अमितची अखेर नवी मुंबई पोलिसपदी निवड झाली असून, त्याच्या या यशाने संपूर्ण तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अमितचा हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. २०१९ मध्ये वडील जिन्नस खेंदाड यांचे आकस्मिक निधन झाले आणि कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा कठीण काळात मोठा भाऊ अमोल खेंदाडने वडिलांची जबाबदारी स्वीकारली. अमोल यांचे वैराग शहरात चहाचे छोटे हॉटेल आहे. हॉटेलचे उत्पन्न आणि तुटपुंज्या शेतीतून घरचा उदरनिर्वाह चालवतानाही त्यांनी अमितच्या स्वप्नांना आच येऊ दिली नाही. खचलेल्या मनाला कुटुंबाची उभारी : अनेक वर्षे प्रयत्न



करूनही यश मिळत नसल्याने अमित काही काळ खचला होता. प्रयत्न सोडून द्यावेत असा विचारही त्याच्या मनात आला. नातेवाईक आणि मित्रपरिवारातील काही जणही भरती सोडून दे आणि भावाला मदत कर असा सल्ला देत होते. मात्र, अमोल खेंदाड, बहीण अर्चना खेंदाडांनी अमितला खंबीर पाठिंबा दिला. तू मेहनत घे, आम्ही तुझ्या पाठीशी आहोत, हा विश्वास दिला.

**तरुणांसाठी प्रेरणादायी यश**

आजच्या काळात दोन-तीन प्रयत्नांत अपयश आले की तरुण प्रयत्न सोडून देते. मात्र, अमितने सलग ८ वर्षे जिद्दीने अभ्यास आणि मैदानी सराव सुरू ठेवला. स्वतः वरचा विश्वास आणि भावाच्या प्रेमाच्या जोरावर त्याने हे यश मिळविले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येऊन स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे.

अमितच्या यशाबद्दल त्याचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि वैराग शहर व बार्शी तालुक्यातील ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे. सामान्य कुटुंबातील तरुणाने पोलीस गणवेश परिधान करण्याचे स्वप्न सत्यात उतरवल्याने, नवीन पिढीसाठी अमितचा संघर्ष 'रोल मॉडेल' ठरत आहे.

> **यशाचे श्रेय कुटुंबाला**
>
> माझ्या यशाचे पूर्ण श्रेय माझ्या कुटुंबाला, विशेषतः माझ्या मोठ्या भावाला जाते. वडिलांनंतर त्यांनी मला कधीही कशाची उणीव भासू दिली नाही. चिकाटीने प्रयत्न केले तर यश नक्की मिळते, हेच मला तरुणांना सांगायचे आहे.
>
> **- अमित खेंदाड**
> (नवनियुक्त पोलीस, नवी मुंबई)

### गुटखा विक्री; पानटपरी चालकावर गुन्हा

**टेंभुर्णी, दि. ३० एप्रिल-**

करमाळा चौक परिसरातील मे. शिव बेकरी ॲण्ड पान शॉप येथे प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा करून विक्री केल्याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात पानटपरी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाई अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने केली.

या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन सहायक आयुक्त रेणुका रमेश पाटील (वय ४०), सोलापूर यांनी फिर्याद दिली असून स्वप्निल दिलीप देशमुख (वय ३८, रा. गव्हर्नमेंट हॉस्पिटलजवळ, देशमुख गल्ली, टेंभुर्णी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल आहे. गुरुवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान दुकानातून विविध प्रकारचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. एकूण १ हजार ८६५ रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि रोहित पवार करीत आहेत.

# पात्र घंटागाडी कामगारांना कायम करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

महानगरपालिकेकडील २२९ कामगारांपैकी ११९ कामगारांना कायम करण्यात यावे असे आदेश औद्योगिक न्यायालयाने आज दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी केस क्रमांक २७/२०१८ नुसार दिले आहेत. निर्णयानंतर संबंधित कर्मचाऱ्यांनी जल्लोष केला.

सोलापूर महानगरपालिकेमध्ये १ जानेवारी २०१५ पासुन ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत घंटागाडी कर्मचारी कार्यरत होते. महानगरपालिकेच्या प्रशासनाने सदर सेवकांना बेकायदेशीर बडतर्फ करण्यात आल्याचा आरोप करत औद्योगिक न्यायालयात दावा दाखल करण्यात आला. उच्च न्यायालय या ठिकाणी सदरच्या दाव्यावर प्रतिदावा दाखल करण्यात आला. उच्च न्यायालयाकडुन औद्योगिक न्यायालयास सदर सेवकासंदर्भात तपासणी करुन निर्णय घेण्यात यावा असे आदेश देण्यात आले. त्यानंतर औद्योगिक न्यायालयाने न्याय निवाडा करुन सर्व पुरावे तपासुन तसेच ११९ कामगारांचे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन सर्व पुराव्यानिशी या सर्व कामगारांना कायम करण्यासाठी शासनाकडे सेवाजेष्ठतेची यादी तयार करुन पदे मंजुरी करीता प्रस्ताव तातडीने पाठविण्यात यावा तसेच हा प्रस्ताव मंजूर करुन ३ महिन्यामध्ये निर्णय घेऊन ११९ कामगारांना कायम करावे असे आदेश औद्योगिक न्यायालयाने दिले आहेत, अशी माहिती कामगार नेते श्रीशैल गायकवाड यांनी दिली. यासाठी कामगार नेते श्रीशैल गायकवाड यांनी गेले ८ वर्षापासुन पाठपुरावा केला आहे. याप्रकरणी ॲड. रा. गो. म्हेत्रस यांनी काम पाहिले. कामगार प्रतिनिधी दयानंद प्रकाश चंदनशिवे, यल्लप्पा उडाणशिवे, सुरज तोरणे, मलिक ओहाळ तसेच कामगार नेते भाई सोनकांबळे , भारत क्षिरसागर यांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र शासनाने सामनेवाले क्र. २ यांनी त्यांचेकडे पाठविलेला प्रस्तावावर कायद्यातील तरतूदींप्रमाणे योग्य तो विनाविलंब निर्णय घ्यावा.शासनाने प्रस्तावाप्रमाणे पदे निर्मिती केल्यास त्या निर्णयाची अंमलबजावणी सामनेवाले क्र. २ यांनी त्यानंतर तीन महिन्यांच्या आत करावयाची आहे, असे आदेशात म्हटले आहे.

# आजपासून जिल्ह्यात स्व-गणना सुरू

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची माहिती

## नागरिक घरच्या घरी ऑनलाईन स्व-गणना करु शकणार

- **जिल्ह्यात २८ अधिकारी, ६,७४६ प्रगणक,१,१७५ पर्यवेक्षक**
- **सोलापूर शहरासाठी ८ अधिकारी अन् २८०८ कर्मचारी करणार काम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

१ मे पासून राज्यात जनगणना सुरू होणार आहे. यंदा पहिल्यांदाच स्व-गणना अशी नवीन प्रक्रिया सुरू करणार आहे. राज्यासह सोलापूर जिल्ह्यासाठी स्व-गणना पोर्टल १ मे ते १५ मे पर्यंत कार्यरत आहे. अवघ्या १५ ते २० मिनिटात स्व-गणना प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. या स्व-गणनेदरम्यान कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करण्याची आवशकता नाही. राज्यातील नागरिकांना se.census.gov.in या संकेतस्थळावर जावून स्वत:ची माहिती ऑनलाईन भरता येईल. यानंतर १६ मे ते १४ जूनपर्यंत घरगणना होणार आहे आणि यानंतर फेब्रुवारी २०२७ मध्ये जनगणनेचे अंतिम काम पूर्ण होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी आज (दि. ३०) दिली.

दरम्यान, यासाठी जिल्ह्यात २८ अधिकारी, ६,७४६ प्रगणक व १,१७५ पर्यवेक्षक करणार काम करणार आहेत. सोलापूर शहरासाठी ८ अधिकारी अन् २८०८ कर्मचारी काम करणार आहेत. जिल्हाधिकारी




कार्तिकेयन म्हणाले की, स्व-गणना पूर्ण झाल्यावर सेल्फ आयडी दिला जाणार आहे. स्व-गणना ही ऐच्छिक आहे. १६ मे १४ जून या कालावधीत अधिकारी घराघरात जावून पडताळणी करणार असून संकलित केलेली माहिती गोपनीय ठेवली जाणार आहे. संपूर्ण आणि अचूक माहिती अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. देशात प्रथमच जनगणनाची माहिती डिजीटल माध्यमातून घेतली जाणार आहे. जर कुणी स्व-गणना केली नसेल तरी काळजी करण्याची आवश्यकता नाही. माहिती गोळी करण्यासाठी घरोघरी १६ मे १४ जून या काळात जनगणना करणारे अधिकारी भेट देणार आहेत. यासाठी राज्य शासनाने १६ फेब्रुवारी रोजी ३३ प्रश्न अधिसूचित केले आहेत. गृह-यादी टप्प्यात लोकांना हे प्रश्न विचारले जातील. यातून घराची स्थिती, सोयी-सुविधा आणि घरगुती मालमत्ता यांविषयीची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित होईल.

जनगणना २०२७ ही भारताची १६ वी तर स्वातंत्र्यानंतरची ८ वी आहे. या जनगणनेसाठी पूर्णपणे मोबाईल ॲपचा वापर होणार आहे. महाराष्ट्रातील जनगणनेचे महत्त्वाचे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत: यामध्ये १ मे ते १५ मे २०२६ स्व: गणना, १६ मे ते १४ जून घरयादी आणि घरगणना होणार आहे आणि फेब्रुवारी २०२७ ते मार्च २०२७ या कालावधीत जनगणना होणार आहे.

स्व-गणना म्हणजे नागरिकांनी स्वतःहून जनगणनेची प्रश्नावली ऑनलाइन पोर्टलद्वारे भरणे, पूर्ण करणे आणि सबमिट करणे होय. नागरिक https://se.census.gov.in या पोर्टलवर जाऊन माहिती भरू शकतात. हे पोर्टल इंग्रजी, हिंदी आणि इतर १४ प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध असेल. स्व-गणना प्रक्रियेमध्ये नागरिक मोबाईल नंबर आणि ओटीपीद्वारे लॉगिन करून राज्य, जिल्हा, गाव/शहर, परिसर आणि जवळच्या खुणांची माहिती निवडतील. डिजिटल मॅपवर घराचे अचूक स्थान निश्चित करावे लागेल. प्रश्नावली प्रगणकांच्या मोबाईल ॲपसारखीच असेल. माहिती सबमिट केल्यानंतर नागरिकांना एक युनिक SE ID एसएमएस आणि ईमेलद्वारे प्राप्त होईल. हा आयडी प्रगणकाला देणे आवश्यक आहे. प्रगणक घरी भेट देताना स्व-गणना केली आहे का याची विचारणा करतील. स्व-गणना केलेली असल्यास डए खऊ घेऊन माहितीची पडताळणी करतील. माहिती जुळल्यास ती स्वीकारली जाईल, अन्यथा आवश्यक दुरुस्ती केली जाईल.

सोलापूर जिल्ह्याकरिता एकूण २८ चार्ज जनगणना अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात एकूण ५४५३ घरयादी गट तयार झाले असून त्याकरिता ६७४६ प्रगणक व ११७५ पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे प्रगणक ३४ प्रश्न विचारून माहिती घेतील.

जनगणनेदरम्यान नागरिकांनी दिलेली माहिती कोणत्याही न्यायालयात पुराव्यासाठी वापरता येत नाही आणि ती प्राप्तीकर, पोलीस विभागासह कोणत्याही विभागाला ही माहिती पुरवली जात नाही. जनगणनेचा उद्देश हा करवसुली किंवा तपासणी नसून केवळ नियोजनासाठी सांख्यिकी माहिती गोळा करणे, हा आहे. यामध्ये कोणताही आधार क्रमांक, पॅन क्रमांक विचारण्यात येत नाही. यामुळे याबाबत कोणाला फोनवरून विचारणा झाल्यास कोणीही आपला ओळख क्रमांक देऊ नये, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. दरम्यान, सोलापूर शहरासाठी एकूण घरयादी २२०१ आहे. तर प्रगणक व पर्यवेक्षक २८०८ आहेत.



सोलापूर : श्री नरसिंह जन्मोत्सव गुरुवारी सायंकाळी गोरजमुहूर्तावर उत्साहाने साजरा करण्यात आला.



सोलापूर : एक मे महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला जिल्हाधिकारी कार्यालयाला विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# चंद्रभागेत तरुण भाविक बुडाला



## अवैध वाळू उपश्याने बळी घेतल्याचा संताप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० एप्रिल-**

विठुरायाच्या दर्शनासाठी आलेला आंध्रप्रदेश मधील तरुण चंद्रभागा नदीत स्नानासाठी गेला होता. तेव्हा इस्कॉन मंदिराजवळ त्याला नदीपात्रातील खड्ड्याचा अंदाज न आल्याने गुरुवारी सकाळी तो बुडाला. त्याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. अवैध वाळू उपशाने तरुणाचा बळी घेतल्यामुळे भाविकातून संताप व्यक्त होत आहे. वाळूची टंचाई भासत असल्याने वाळू तस्कर चंद्रभागा वाळवंट व नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा करीत आहेत. काही महिन्यापासून चंद्रभागा नदीत पुरेसे पाणी नसल्यामुळे नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा केला आहे.

परिणामी नदीपात्रात मोठे खड्डे पडले आहेत. सध्या उजनी धरणातून चंद्रभागा नदीत पाणी सोडले आहे. त्यामुळे नदी दुथडी भरून वाहत असून नदीपात्रात पडलेल्या खड्डयांचा अंदाज येत नसल्याचे चित्र आहे. अशातच संबंधित तरुण भार्गव कटम नदीपात्रात स्नानासाठी उतरला. मात्र खड्डयाचा अंदाज न आल्याने बुडाला. येथील कोळी समाज बांधव तसेच प्रशासनाकडून शोध मोहिम सुरु आहे. मात्र दुपारपर्यंत त्याचा कुठेही ठावठिकाणा लागला नव्हता.

**आपत्ती व्यवस्थापन टीम नाही**

चंद्रभागा नदीत पाणी आल्यानंतर भावीक बुडू नये, यासाठी आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत टीम नगर परिषद व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती यांनी कार्यरत ठेवणे गरजेचे आहे. शासनानेही त्याला परवानगी दिली आहे. मात्र मंदिर समितीच्या उदासीन भूमिकेमुळे टीम कार्यरत न ठेवल्याने भार्गवचा नाहक बळी गेला, असा आरोप महर्षी वाल्मिक संघाचे संस्थापक अध्यक्ष अंकुशराव यांनी केला.

# दलितमित्र कदम गुरुजी पुण्यतिथी; आजपासून विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३० एप्रिल-**

शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा या नामवंत संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष दलितमित्र कदम गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि. १ मे ते ४ मे या कालावधीत मंगळवेढा महोत्सव २०२६ चे आयोजन केले आहे.

यशवंत मैदान, इंग्लिश स्कूल, मंगळवेढा येथे होणाऱ्या या महोत्सवात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गजांची मांदियाळी असल्याचे संस्थेचे अध्यक्ष ॲड.सुजित कदम यांनी सांगितले. महोत्सवाचा प्रारंभ ०१ मे रोजी दुपारी ४:३० वाजता कदम गुरुजींच्या पुतळा पूजनाने होईल. उद्घाटन आ.समाधान आवताडे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख उपस्थिती म्हणून डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे, उद्योजक पवन महाडीक, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, जि.प. सदस्य प्रदिप खांडेकर, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुजित कदम आणि उपाध्यक्ष सुभाष कदम उपस्थित असतील. त्याच दिवशी सायंकाळी ६:३० वाजता शिवशंभो महिला ग्रामीण पतसंस्थेच्या



चौथ्या वर्धापन दिनानिमित्त ह.भ.प.शिवलीला पाटील यांचे कीर्तन होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.मिना कदम असून, प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सुनंदा आवताडे, उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे-पाटील, धनश्री पतसंस्थेच्या चेअरमन शोभा काळुंगे आणि माणगंगा परिवाराच्या अर्चना इंगवले उपस्थित राहतील. शनिवार दि.२ मे रोजी सकाळी ७:०० वाजता 'कृषी- क्रीडा ज्योत दौड' काढण्यात येईल. याचे उद्घाटन पी.आय. संगीता जाधव यांच्या हस्ते होईल, तर अध्यक्षस्थानी खजिनदार राम नेहरवे असतील.



# धर्माला पुढे नेण्यासाठी गुरुच्या विचाराची गरज

## कोळेकर महास्वामी; जवळे येथे मठ वास्तू प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० एप्रिल -**

गुरु विद्वान व चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी तसेच धर्माला पुढे नेण्यासाठी गुरूच्या विचाराची गरज आहे असे कोळेकर महास्वामी यांनी सांगितले.

जवळे (ता.सांगोला) येथे मठ वास्तु प्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मठाचे सेवेकरी म्हणून शिरसो स्वामी यांची निवड करण्यात आली.

यावेळी मठाचे सेवेकरी म्हणून शिरसो स्वामी यांची निवड करण्यात आली.

> “कोळेकर महास्वामींचे आज स्वप्न पूर्ण झाले. यासाठी गुरुचे ध्यान करा तसेच ओम नमः शिवाय मंत्राचा जप करा.
> **-सिद्धेश्वर झाडबुके**

यापसंगी शशिकांत स्वामी, आशिष मोगले, नागेश नकाते, पिंटू माळी, मधुकर वसमळे या दाम्पत्याच्या हस्ते होम हवन करण्यात आले. यावेळी कोळेकर महास्वामींची गावातून शोभायात्रा काढण्यात आली. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, रूपमती साळुंखे पाटील, आप्पासो देशमुख, गणेश जळक, नानासो मेणकुदळे, मुन्ना शेटे, उत्कर्ष शेटे, सचिन देशमुख, रविराज शेटे, बंडू स्वामी, सचिन चिंचणे, गणेश शेटे, उत्तरेश्वर घोंगडे, पुरोहित योगेश स्वामी, करबसय्या स्वामी, के.जी. स्वामी व सर्व वीरशैव समाजबांधव उपस्थित होते.

# वीरशैव विचारप्रणाली हे हिंदू धर्माच्या विस्ताराचे प्रवेशद्वार : श्रीशैल जगद्गुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

जर कोणत्याही गैर हिंदू धर्माला हिंदू धर्मात प्रवेश करायचा असेल तर वीरशैव विचारप्रणाली हे त्यासाठीचे मुख्य प्रवेशद्वार आहे, असे प्रतिपादन श्री शैल पीठाचे जगद्गुरू डॉ. चन्नसिद्धाराम पंडिताराध्याय शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.

ग्रीसची राजधानी अथेन्स येथे आयोजित धार्मिक पुनरुज्जीवन शिखर परिषदेत जागतिक चेतना म्हणून शैव धर्म या विषयावर आशीर्वचन करताना महास्वामीजी बोलत होते. ते म्हणाले, हिंदू धर्म ही अनेक विचारप्रणाली आणि परंपरांची एक सामूहिक संस्कृती आहे, ज्यापैकी बहुतेकांमध्ये जन्मापासूनच आपापल्या परंपरेत प्रवेश मिळतो. तथापि, वीरशैव विचारप्रणाली लिंगादीक्षेसारखे धार्मिक विधी प्रदान करत असताना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, गरीब, श्रीमंत, काळा, गोरा इत्यादींमध्ये कोणताही भेद न करता, सद्गुण आणि चांगल्या कर्मांच्या आधारावर प्रत्येकाला शक्ती देते. त्याने धर्माच्या माध्यमातून सर्वांना सामाजिक न्याय प्रदान केला आहे. जागतिक तत्त्वज्ञानाचे उगमस्थान असलेल्या ग्रीसमध्ये जगाचा गुरू मानल्या जाणाऱ्या भारतीय तत्त्वज्ञानावर चर्चा आणि वादविवाद होत आहे. ही एक दुर्मिळ घटना आहे. जागतिक गुरूंनी स्पष्ट केले की, ग्रीस आणि भारत हे भौगोलिकदृष्ट्या खूप दूरचे देश असले तरी तत्त्वज्ञानाच्या बाबतीत ते खूप



जवळचे आहेत. या परिषदेला विविध परंपरांमधील १० हून अधिक भारतीय मठाधिपती उपस्थित होते, ज्यामध्ये हरिहरपूर मठाचे श्री स्वयं सच्चिदानंद सरस्वती स्वामीजी आणि त्रिची श्री यांचा समावेश होता. ग्रीसमध्ये आदिशक्तीवर चित्रपट निर्मिती ज्या मातेने पित्याच्या देहात एकरूप झालेल्या आपल्या पुत्राला पित्यापासून वेगळे केले, तीच माता पित्याची पुत्राशी ओळख करून देते आणि त्याला पित्याशी पुन्हा एकत्र आणते; आणि ज्या शक्तीने जीवांना शिवापासून वेगळे केले, तीच शक्ती त्यांना अखेरीस शिवाशी एकरूप करण्याचे कार्यही करते. म्हणूनच, अध्यात्मात शक्ती ही शिवाइतकीच महत्त्वाची आहे.

अशा आदिशक्तीचा महिमा जगभर पसरवण्यासाठी, ग्रीस सरकारने चित्रपटाच्या निर्मितीसाठी १२० कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्या कार्याचा शुभारंभ करण्यासाठी भारतातून सर्व परंपरेतील संतांची परिषद आयोजिली होती. यामध्ये हरिहरपूरचे श्री जगद्गुरू शंकराचार्य स्वयंप्रकाश सच्चिदानंद स्वामीजी, कैलास आश्रम, बंगळुरूचे महामंडलेश्वर श्री जयेंद्रपुरी स्वामीजी, उडुपी पुट्टीगे मठाचे श्री सुगुणेंद्र तीर्थ स्वामीजी, श्री महामहोपाध्याय भद्रेशदास स्वामीजी, दिल्ली अक्षरा मुजी, दिल्लीचे लोकआश्रम डॉ. प्रयागराज, निर्मला आखाड्याचे श्री ज्ञानसिंह महाराज, अमृतसरचे सहजदीप सिंह महाराज आणि बौद्ध परंपरेचे खेमचर भिक्कूजी यांनी विविध विषयांवर आपली मते मांडली.

देवी महात्म्य चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक संघाचे प्रमुख मनु कुमार, शशांक आचार्य, अभिषेक रुद्रमूर्ती, आकाश विश्वामित्र आदी उपस्थित होते.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ■ लातूर तालुक्यातील मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन ■

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार यादी अधिक पारदर्शक आणि निर्दोष करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग (पडताळणी) करणे अनिवार्य असून, लातूर तालुक्यातील सर्व मतदान केंद्रांवर २५ एप्रिल २०२६ पासून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपलब्ध आहेत.

दुबार आणि तिबार मतदारांचा शोध घेण्यासाठी पश्रि्चम बंगाल आणि तामिळनाडूच्या धर्तीवर आता महाराष्ट्रातही मतदारांची पडताळणी केली जात आहे. मतदारांनी त्यांच्याकडील मतदार ओळखपत्र दाखविल्यानंतर बीएलओ २००२ मधील मतदारसंघ, भाग क्रमांक आणि अनुक्रमांक या आधारावर मॅपिंग करणार आहेत. ज्या मतदारांची नोंद २००२ नंतरची आहे, अशा मतदारांची पडताळणी त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारावर केली जाईल.

**एप्रिल पासून दररोज सायंकाळी ४ ते ७ या वेळेत बीएलओ मतदान केंद्रावर उपस्थित राहतील. तसेच इतर वेळी बीएलओ मतदारांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत.**



## विविध वृत्त...

### महाऑनलाईनची सेवा 'ऑफ'

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** गतआठवड्यात महसूल कर्मचाऱ्यांचा संप आणि आता महाऑनलाईनचे पोर्टलचे सर्व्हर डाऊन, यामुळे विद्यार्थ्यांसह इतरांची कामे रखडली आहेत. मंगळवार सकाळपासून सर्व्हर लॉगिन होत नाही. दोन दिवसांवर स्पर्धा परीक्षा असल्याने परिक्षार्थींना नॉन क्रिमिनल आणि उत्पन्नाचा दाखला मिळत नाही. कागदपत्रांचीच पुर्तता झाली नाही तर हे विद्यार्थी परिक्षेला कसे बसतील, असा सवाल आहे. शासनाचे महाऑनलाईन पोर्टल म्हणजे सुविधांपेक्षा अडचणी अधिक अशा अवस्थेत आहे. अधिक काळ हे पोर्टल बंदच असते. आता स्पर्धा परीक्षा दोन दिवसांवर असताना विद्यार्थ्यांना कागदपत्रे ही ऑनलाईन करायची आहेत. याकरिता सीएससी केंद्रावर मोठी गर्दी होत आहे. पण सर्व्हर डाऊन असल्याचे सांगण्यात येत आहे. तांत्रिक अडचण दूर करुन मंगळवारी सायंकाळीच पोर्टल सुरु होणार असल्याचे सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात बुधवारीही पोर्टल हे सुरु झाले नव्हते. या पोर्टलशिवाय विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्जच करता येत नाही. विद्यार्थ्यांच्या अडचणी वाढत आहेत.

### उसणे घेतलेल्या पैशांवरून एकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** 'तू माझे घेतलेले पैसे परत का देत नाहीस?' म्हणत एकास लाथाबुक्क्यांनी व काचेची बाटली डोक्यात फोडून मारहाण केल्याची घटना मंगळवारी (दि. २८) दुपारी दोनच्या सुमारास बार्शी रोडवर घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

महेश दत्तात्रय कराड (रा. प्रकाशनगर, लातूर) याने आरोपी अमोल गडेराव (रा. सैनिकपुरी, प्रकाशनगर, लातूर) याच्याकडून हातउसणे पैसे घेतले होते. पैसे परत न केल्याने आरोपी अमोल गडेराव याने फिर्यादी महेश व त्याच्या भावास शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करत काचेची बाटली फिर्यादीच्या डोक्यात फोडली. याप्रकरणी कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) कलमान्वये गुन्हा दाखल आहे. पोहे दिवे अधिक तपास करीत आहेत.

### हरिभाऊ नगरातून दुचाकीची चोरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी चोरीच्या घटना सुरूच असून, हरिभाऊ नगर भागातून एक मोटारसायकल लंपास करण्यात आली आहे. फिर्यादी प्रल्हाद विजय चामले यांनी हनुमान मंदिराजवळ आपली काळ्या रंगाची 'स्प्लेंडर प्लस' (क्र. एमएच २० डीके २८८१) पार्क केली होती. २३ एप्रिलच्या रात्री अज्ञात चोरट्याने सुमारे २५,००० रुपये किमतीची ही दुचाकी चोरून नेली.

### आज शासकीय रुग्णालयाची ओपीडी बंद


**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल : महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून, शुक्रवारी १ मे २०२६ रोजी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग बंद राहणार आहे. सार्वजनिक सुट्टी असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.**

**रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी माहिती दिली की, शनिवार २ मे २०२६ पासून सर्व ओपीडी सेवा पुन्हा नियमित वेळेनुसार सुरू होतील. दरम्यान, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून रुग्णालयाची आपत्कालीन व तातडीची सेवा मात्र २४ तास सुरू राहणार आहे. नागरिकांनी या बदलाची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाकडून करण्यात आले आहे. गंभीर रुग्णांसाठी मात्र रुग्णालय सुरू राहणार आहे.**

# पालकांनो सावधान..! लातुरात वाढतोय ' लव्ह जिहाद' चा धोका..!!

**तभा वृत्तसेवा**



**लातूर,दि. ३० एप्रिल :** कधीकाळी लातूर शहर शैक्षणिक दृष्ट्या अतिशय सुरक्षित समजले जायचे. मागच्या काही वर्षांच्या कालखंडात लातूरमध्ये आमूलाग्र असे बदल होत गेले. शिक्षणामुळे प्रकाशाच्या झोतात आलेले हे शहर येणाऱ्या काळात ' लव्ह जिहाद'च्या धोक्यांनी पुरते पोखरले जाण्याची भीती सुजाण नागरीकातून व्यक्त होत असलेली पाहायला मिळतेय. त्यामुळे लातुरात आपल्या मुली शिक्षणासाठी ठेवणाऱ्या तसेच मुळात येथेच राहणाऱ्या हिंदू समाजातील पालकांनी आताप-ासून, किमान या क्षणापासूनच सावधान होणे गरजेचे असल्याच्या चिंतायुक्त प्रतिक्रिया ऐकावयास मिळत आहेत.

आपल्या समाजात पिढ्यानपिढ्या हिंदू - मुस्लिम, शिख इसाई सर्वच गुण्या गोविंदाने राहत आले आहेत. हिंदू - मुस्लिम आजही आपले सण - उत्सव मिळून - मिसळून एकत्रित साजरे करतात. या दोन्ही समाजातील जाणकार मंडळी जात - पातीच्या पलीकडे जाऊन माणुसकीचे, सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यास प्राथमिकता देत असल्याचे पाहायला मिळते. मात्र, काही मनोविकृत तरुण आपल्या पूर्वजांच्या सगळ्या माणुसकीच्या कल्पना धुळीला मिळवून चालण्याचे काम करत असल्याचे दिसून येते. त्यातूनच 'लव्ह जिहाद' हा नावाचं प्रकार उदयास आला. यामध्ये केवळ आणि केवळ हिंदू समाजातील शालेय - महाविद्यालयीन विद्यार्थिनी, तरुणींना कोणत्या ना कोणत्या प्रकारचे आमिष दाखवून त्यांचे शारीरिक शोषण केले जात असल्याचे बोलले जाते. या केवळ कपोलकल्पित कथा नाहीत तर वास्तव आहे. ' लव्ह जिहाद' चे प्रकार आजमितीसही विविध ठिकाणी घडत असल्याचे ऐकायला मिळते. असंख्य पालक त्यांच्या कुटुंबातील मुलीकडून अजाणतेपणे असा प्रकार घडला असेल तर इज्जतीच्या , बेअब्रुपणाच्या भीतीपोटी काहीही बोलत नाहीत. परिणामतः असे प्रकार करणाऱ्या माथेफिरू वृत्तीच्या बदमाशांचे चांगलेच फावते.

समाजातील अनेक परिवारांनी आतापर्यंत अशा अमानुष बाबींचा सामना केला आहे. मुलींना या प्रकारामध्ये एवढी फूस लावली जाते की,त्या स्वतः च्या माता - पित्यांना सुद्धा ओळखायला तयार होत नाहीत. ज्या आई - वडिलांनी तळहाताच्या फोडाप्रमाणे मुलींना जपलेले असते, त्यांनाच जर एखाद्या फसवणाऱ्या बदमाशावर विश्र्वास ठेवून त्यांची लेक ओळख दाखवत नसेल, त्यांच्यासोबत घरी परतायला नकार देत असेल तर अशा पालकांनी करायचे तरी काय ? असा प्रश्र्न कोणाही सुजाण नागरिकांच्या मनात उपस्थित होऊ शकतो. मागच्या काही दिवसात अन्यत्र सोडा, आपल्या लातुरा-तही अशा घटना मोठ्या प्रमाणात घडत असल्याची चर्चा आहे. ही बाब कोणीही जास्त उघडपणे बोलायला धजावत नाही. आपल्या सभोवती, आजूबाजूला असणाऱ्या एखाद्या हिंदू कुटुंबात असा प्रकार घडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, याचा विचार आता संपूर्ण हिंदू समाजाने एकत्रित येऊन करणे काळाची गरज आहे.

समाजजीवनात वावरताना प्रत्येक कुटुंब प्रमुख आपले कुटुंब सुखी - समाधानी राहावे, अशी अपेक्षा बाळगून चालत असतो. शेवटी समाज म्हणून किंवा समाजातील एक घटक म्हणून हिंदू समाजाने जागृत होणे गरजेचे आहे. समाज जागा होण्यास जर आणखी काही वेळ व्यर्थ गेला तर समाजाचे कधीही भरून न निघणारे अतोनात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ' लव्ह जिहाद' च्या वाढत्या घटनांवर अंकुश आणण्याचे काम हिंदू समाज बांधवांनी एकत्रित येऊन ठरवल्यास ते कदापि अशक्य नाही. त्यासाठी आवश्यकता आहे, ती हिंदू समाजातील पालकांनी वेळीच सावध होण्याची, आपल्या परिवारातील तसेच समाजातील मुलींच्या संरक्षणासाठी एकत्रित येण्याची.

## शोध घ्या, संशोधक व्हाल : डॉ. सौताडेकर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात आपला महाराष्ट्र समजून घेऊया या तीन दिवसीय उपक्रमाचे उद्घाटन इतिहास संशोधक, लेखक डॉ. विवेक सौताडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सौताडेकर यांनी शोध घ्या, संशोधक व्हाल, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात २० एप्रिल ते १ मे या तीन दिवसीय प्रदर्शनात इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी आपला महाराष्ट्र समजून घेण्यासाठी अनेक विषयांची मांडणी केली आहे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांवर डॉ. सौताडेकर यांनी हिंदी विषयात मिळवलेल्या डॉक्टरेट पदवी बद्दल प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी त्यांचा सत्कार केला.

तीन दिवसीय प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आपले सण उत्सव, संत परंपरा, पर्यटनस्थळे, गडकिल्ले , धरणे साहित्य, प्रादेशिक विभाग, समाजसुधारक, ऐतिहासिक वास्तू, क्रांतिकारक, शिल्पे, विद्यापीठ, विधानभवन इत्यादी विषयांची अभ्यासपूर्वक मांडणी केली आहे

कार्यक्रमास मुख्याध्यापिका सविता नरहर, उपमुख्याध्यापक शिवशंकर राऊत, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, शालेय समिती सदस्य प्रभाकर हिप्परगे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन संपदा पांडे यांनी केले. या उपक्रमाची पार्श्र्वभूमी प्रशांत शिंदे यांनी मांडली. मुलांना हा अनुभव देण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते राम कथा मंडपाचे पूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** औसा तालुक्यातील किल्लारी येथे दि. २३ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रसंत प.पू. मोरारी बापू यांच्या रामकथा ज्ञानयज्ञाच्याभव्य सभा मंडपाचे भूमिपूजन शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी दुपारी ३:३१ वाजता औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते होणार आहे. किल्लारीच्या निळकंठेश्र्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या भव्य मैदाना-वर हा रामकथा ज्ञानयज्ञ पार पडणार आहे. केवळ लातूर जिल्ह्यातूनच नव्हे तर देश - विदेशातून, आसपासच्या अनेक जिल्ह्यातून, शहरातून, शेजारच्या कर्नाटक प्रांतातील भाविक भक्तही या रामकथा ज्ञानयज्ञाचा लाभ घेणार आ-हेत. त्यादृष्टीने भव्य दिव्य मंडप उभारणी केली जाणार आहे. त्याचा भूमिपूजन सो-हळा शुक्रवारी संपन्न होण-ार आहे. या सोहळ्यास भाविकांनीमोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,असे आ-वाहन रामकथा आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## रिंगरोडवरील अतिक्रमण हटणार...?
### मनपात सहा तास खलबतं-आढावा अन् सूचनांचा पाऊस

**तभा वृत्तसेवा**



**लातूर,दि. ३० एप्रिल :** महापौर, उपमहापौर आणि स्थायी समितीच्या सभापतींची निवड झाल्यानंतर बुधवारी पहिल्यांदाच आ. अमित देशमुख यांनी महापालिकेमध्ये विभागनिहाय मॅरेथॉन बैठका घेतल्या. त्यांनी घेतलेल्या पहिल्याच बैठकीत नेमके काय होणार याकडे लातूरकरांचे लक्ष लागले होते. बैठकीच्या दरम्यान सर्वच विभागाचा आढावा घेऊन योग्य त्या सूचना केल्या पण चर्चेत राहिला तो नगररचना विभाग. शहराभोवतालच्या रिंगरोडवरील नियमबाह्य अतिक्रमण हटवून सर्व्हिस रोड मोकळा करावा तसेच या विभागाने २०११ ते २०२५ पर्यंतचे रेकॉर्ड सादर करावे लागणार आहे. यामधून नगररचना विभागाचा दरम्यानचा कारभार चव्हाट्यावर येणार आहे.

शहरात सध्या राबविण्यात येत असलेल्या विकास योजना, प्रस्तावित योजना, नियमित कामकाजाबाबत आढावा घेतला. शहरात वाहतूक कोंडीच्या तक्रारी येत आहेत. यावर तातडीने कार्यवाही करून शहरा-तील वाहतुकीला शिस्त लावावी. सिग्नल आणि सीसीटीव्ही यंत्रणा अद्ययावत करावी. शहरातील कचरा व्यवस्थापनात सुधारणा झाली असली तरी त्यात आणखी दुरुस्त्या कराव्यात.

तसेच शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य-दिव्य पुतळा उभारणीचे काम हैदराबादच्या धरतीवर हे काम व्हावे, अशी लोकभावना असल्याने तेथे अभ्यास गट पाठवून सूचना घ्याव्यात. नियमित स्वच्छ पाणीपुरवठा, नागरिकांना बांधकाम परवाना मिळण्यात होणारी दिरंगाई टाळावी आणि दिलेल्या परवान्याप्रमाणेच बांधकामे होतील याची दक्षता घ्यावी, असेही आ. देशमुख यांनी सांगितले. यावेळी खा. डॉ. शिव-ाजी काळगे यांच्यासह महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे,किरण जाधव, काँग्रेसचे गटनेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, परिवहन समिती सभापती फैसलखान कायमखानी, मनपा आयुक्त मानसी मीना, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, नगरसेवक फारुक शेख, पवन सोलंकर विकास कांबळे, युनुस मोमीन, इसरार सगरे, डॉ. बालाजी सांळुके, अतिश चिकटे, मुक्तार शेख, अमोल लांडगे, सचिन गायकवाड यांच्यासह मनपाचे विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

### मुरुड पोटनिवडणुकीत तिलोतमा गाडे विजयी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** मुरुड येथील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत तिलोतमा सूर्यकांत गाडे बहुमताने विजयी झाल्या. २८ एप्रिल रोजी पार पडलेल्या मतदान प्रक्रियेत एकूण ३४९४ पैकी ९३६ मतदारांनी म्हणजेच २६ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. बुधवारी मोजणी प्रक्रिया पार पडली. यात तिलोतमा गाडे यांना ५५० मते मिळाली असून, त्यांनी १७४ मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे.

## आयएमए इमारतीसाठी वर्षभरात जागा देऊ : दिलीपराव देशमुख

**तभा वृत्तसेवा**



**लातूर,दि. ३० एप्रिल :** शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेल्या लातूरने आता वैद्यकीय क्षेत्रातही आपली ओळख निर्माण केली आहे. लातूर हे मेडिकल हब झाले आहे. येथील डॉक्टर्स देत असलेल्या दर्जेदार आरोग्यसेवा अन् विश्र्वासाचे ते फलित आहे. समाज आरोग्यासाठी मोलाचे यो-गदान देणाऱ्या व महत्वाची भूमिका बजावणाऱ्या आयएमएची इमारत लातुरात नाही. इमारत उभारणीसाठी आपण वर्षभरात जागा उपलब्ध करुन देऊ, असे आश्र्वासन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी रविवारी (दि.२६) येथे दिले.

आयएमए लातूर जिल्हा शाखा पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्यात ते अध्यक्षपदावरुन बोलत होते. हॉटेल कार्निवल येथे झालेल्या या कार्यक्रमास खासदार डॉ. शिवाजी काळगे, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते पाटील, सीप-ीएसचे माजी अध्यक्ष गिरीश मैंदरकर, राज्य आयएमएचे उपाध्यक्ष डॉ. कल्याण बरमदे, प्रतिनिधी डॉ. रमेश भराटे, लातूर आयएमएचे नूतन अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. श्र्वेता काटकर, सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी, डॉ. अशोक पोतदार, डॉ. अजय जाधव, डॉ. विकास साळुंके, डॉ. अभय कदम, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. चेतन सारडा, डॉ. अविनाश कुडूकर, डॉ. सारिका देशमुख, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. मेघना गुगळे, डॉ. मन्सूर भोजगे, डॉ. हमीद चौधरी, डॉ. दीपक गुगळे, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. किरण डावळे, डॉ. वेदांत अवस्थी उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. डॉक्टरांना शपथ देण्यात आली. यावेळी पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे व आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी चित्रफीतीतून शुभेच्छा दिल्या.

दिलीपराव देशमुख म्हणाले, १०० वर्षांपूर्वी समाजमनावर अंधश्रध्देचा पगडा होता. त्यातून समाजाला बाहेर काढून त्यांना आरोग्यसाक्षर करण्याचे काम आयएमएने केले. डॉक्टर व पेशंट यांच्या नात्याचा धागा विश्र्वासाचा असावा. वैद्यकीय व्यवसायाची प्रतिष्ठा वाढावी, यासाठी आ-पणही डॉक्टरांकडे विश्र्वास व आदराने पाहण्याची गरज आहे. आरोग्यसेवा ही शेवटच्या माणसापर्यंत पोहोचावी. कमीत कमी लोक आजारी पडतील, अशी वातावरण निर्मिती करावी, आजघडीस मानसिक आज-ाराचे प्राबल्य वाढत आहे. माणसे शारीरिक आजाराबद्दल बोलतात, डॉक्टरांना दाखव-तात. मात्र मानसिक आजाराबद्दल सांगण्यात व उपचार घेण्यास ते संकोचतात, म्हणून यावर आयएमएने जनजागृती करावी, अशी अपेक्षा दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केली. अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांनी आयएमए कार्यकारिणीत शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांचा सहभाग असल्याचे सांगितले. अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी लातूरमध्ये आयएमएची इमारत व रुग्णालय उभारणीची मागणी केली. प्रास्ताविक सचिव डॉ. विश्रांत भारती यांनी केले. डॉ. मैंदरकर, डॉ. बरमदे, डॉ. श्र्वेता काटकर, डॉ. आकांक्षा त्रिपाठी यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन निवेदिका क्षीप्रा मानकर यांनी केले. आभार डॉ. मन्सूर भोजगे यांनी मानले.

### कारचालकाची रिक्षाला जोराची धडक; ७० हजारांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** भरधाव वेगात आणि चुकीच्या दिशेने येणाऱ्या एका मद्यधुंद कारचालकाने समोरून येणाऱ्या मालवाहू रिक्षाला जोराची धडक दिल्याची घटना गांधी चौक परिसरात घडली आहे. या अपघा-तात रिक्षाचे अंदाजे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, पोलिसांनी आरोपी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

मंगळवारी २८ एप्रिल रोजी रात्री ९:१५ च्या सुमारास गांधी चौक परिसरात हा अपघात झाला. फिर्यादी अमोल आनंदराव जोशी हे आपल्या मालवाहू ऑटो रिक्षामधून (एमएच २५ एके ०६२५) जात असताना, समोरून येणाऱ्या गुंदाई कारने (एमएच २५ आर ९१२७) त्यांना जोरदार धडक दिली. कारचालकाने दारूच्या नशेत आपली कार अतिशय हायगयीने, निष्काळजीपणे आणि रस्त्याच्या विरुद्ध दिशेने चाल-वून रिक्षाला समोरून धडक दिली. या धडकेत रिक्षाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २८१, ३२४(४) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५, ११९/१७७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार बनसोडे करत आहेत.

## जे.एस.पी.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. ३० एप्रिल :** जे.एस.पी.एम शिक्षण संस्था संचलित जे. एस. पी. एम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या हिवाळी २०२५ प्रथम सत्र परी-क्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स शाखेत हर्षदा कदम हिने एसजीपीए ८.६१ गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला, तर तेजस्विनी आडगिळे हिने एसजीपीए ७.९० गुणांसह द्वितीय क्रमांक पटकाविला. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेत मेहेक जानअहमद हिने एसजीपीए ८.४० गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला, तर जाधव सुरज याने एसजीपीए ८.३० गुणांसह द्वितीय क्रमांक प्राप्त केला. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेत साळुंखे विद्या, बलसुरे अभिजीत तर सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेत कल्लूरकर श्रेयस, श्रीनिवास सोमवंशी याने यश मिळवले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष शिवाजी पाटील कव्हेकर, सचिवा प्रतिभा पाटील कव्हेकर आणि उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेचे समन्वयक विनोद जाधव, बापूसाहेब गोरे, अनिरुद्ध पाटील, प्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत गौड, उपप्राचार्य हासबे, अकॅडमिक डीन डॉ. बकवाड, प्रा. चाळकीकर गौरव, प्रा. पाटील ज्योती तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

## शिवनेरी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पदी डॉ.एन. बी. सुर्यवंशी



**तभा वृत्तसेवा**

शिरूर अनंतपाळ **दि. ३० एप्रिल :** शहरातील शिवनेरी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पदी इतिहास विभाग प्रमुख तथा मराठवाडा इतिहास परिषदेचे माजी अध्यक्ष प्रोफेसर डॉ एन बी सूर्यवंशी यांची नियुक्ती संस्थेने केली असून त्याना विद्यापीठाने मान्यता दिली असून . प्रोफेसर डॉ एन बी सूर्यवंशी हे यापूर्वी दोन वर्षे प्राचार्य म्हणून उत्कृष्ट काम केले आहेत . ते इतिहास संशोधन मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली जवळपास चार विद्यार्थी पीएच डी झाले आहेत . त्यांनी इतिहासाच्या अभ्यासक्रमावर आधारीत चार ग्रंथाचे लिखान केले आहे . तर त्यांचे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नियत कालीका रिसर्च जर्नल मधून संशोधन पेपर प्रकाशीत झाले आहेत . या सर्व गोष्टींचा व अनुभवाचा विचार करून संस्थेने प्राचार्य म्हणून काम करण्याची डॉ सूर्यवंशीला संधी दिली . व त्याला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने नुकतीच मान्यता दिली आहे .

या बदल संस्था अध्यक्ष प्रतापराव माने संस्था सचिव पदमाकर मोगरगे कोषाध्यक्ष जयेश माने , उपाध्यक्ष ड सुतेज माने यांनी व मित्र परिवारांनी प्राचार्य डॉ एन बी सुर्यवंशी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या .

## टाकळगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

रेणापूर **दि. ३० एप्रिल :** तालुक्यातील टाकळगाव येथे मंगळवार दि. .२८रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली .

जयंती समितीच्या वतीने सकाळी ठिक ९.३५ वाजता तथागत बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रा.किशोर चक्रे सरपंच उषाताई चोरमले,नागनाथ मेकले,आश्रुबा चोरमले,प्रकाश गडदे,अनंत घडले या प्रमुख पाहुणे यांनी पुजन करून अभिवादन केले. गावच्या प्रथम नागरीक सरपंच उषाताई चोरमले यांच्या हास्ते ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर त्रिसरण पंचशील प्रा.किशोर चक्रे (भारतीय बौद्ध महासभा जिल्हा महासचिव) यांनी घेतले.

जयंती समीतीच्या वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रा.किशोर चक्रे मार्गदर्शन करताना म्हणाले भारतीय संविधान हा धर्मग्रंथ आहे या संविधानाने हक्क व अधिकार दिला आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपणास बौद्ध धम्म दिला आहे .समाजाचा विकास करायचा असेल संस्कार व पिडी उभा करावयाची असेल तर गाव तिथे बुद्ध विहार उभा करावे असा समाज बांधवाना संदेश दिला यावेळी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य सोसायटी चेअरमन गावातील प्रतिष्ठीत नागरिक बौद्ध उपासक उपासिका व बालक तथा बालिका आदींची उपस्थिती होती.

सायकांळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच पुजन करून मिरवणुक काढण्यात आली जयंती यशस्वीतेसाठी समाधान नाईकवाडे,योगेश नाईकवाडे,बाळु मेहते,धम्मानंद सोनवणे,कचरूबा मेहत्ते,बुद्ध भुषण मेहत्ते,गंगाबाई नाईकवाडे,तसेच जयंती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले

## श्री अनंतपाळ यात्रेनिमित्त शिक्षण प्रेमींचा उपक्रम



**तभा वृत्तसेवा**

शिरूर अनंतपाळ **दि. ३० एप्रिल :** नगरीचे ग्रामदैवत श्री अनंतपाळ महाराज यांच्या यात्रेच्या निमित्ताने सामाजिक कार्यकर्ते डॉ.अरविंद भातांब्रे यांच्या संकल्पनेतून प्रथमच शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धेच्या युगात आपल्या भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षाचे महत्त्व व आवड निर्माण व्हावी या उद्देशाने शहरातील अनंतपाळ नुतन विद्यालय येथे अनंतपाळ प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते या परीक्षेला शहरातील व तालुक्यातील ४८२ विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन परीक्षा दिली या स्पर्धा परीक्षेचे सेवानिवृत्त प्राचार्य बालाजी येरोळे, शिक्षक गोविंद हंद्राळे,गुंडेराव आवाळे, देविदास सांगवे, दिलीप देवशेट्टे,किरण आवाळे, शिवाजी शेरसांडे, परमेश्र्वर तोंडारे,प्रा.राजकुमार अचवले,वैजनाथ नाब्दे,विलास हासबे,गुरबस सुगावे,मालेवाडे सर,मारुती शिवणे,राघो सर आदी शिक्षकांना परिक्षक म्हणून कामकाज पाहिले तसेच चक्रधर शेळके,महादेव आवाळे, अशोक कोरे,व्यंकट हांद्राळे,संदिप धुमाळे, आसिफ उजेडे,बालाजी बरबटले यांनी या स्पर्धा परीक्षेचे सुंदर आयोजन केले होते या वेळी नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे,लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष डॉ.मन्मथ भांताब्रे,प्राचार्य शिवाजीराव मादलापुरे यांनी भेट देऊन स्पर्धेची पाहणी केली.

## किनगावात करुणा कांबळे विजयी



**तभा वृत्तसेवा**

**किनगाव दि. ३० एप्रिल :** येथील ग्रामपंचायत सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीत मंगळवारी मतदान पार पडले. बुधवारी तहसील कार्यालयात मतमोजणी झाली. मतमोजणीतून करुणा धम्मानंद कांबळे यांनी तब्बल १२९४ मतांनी विजय मिळवला. चुरशीची वाटणारी लढत एक तर्फी झाली.

# जळकोटच्या बस डेपो चा प्रस्ताव मंत्रालयात धुळखात

## माजी मंत्री आ. बनसोडे साहेब या प्रस्तावाकडे लक्ष देतील का..?



**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. ३० एप्रिल :** डोंगरी तालुका' ओळख असलेल्या जळकोट तालुक्याला स्वतंत्र बस आगार मिळावे, या मागणीचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून शासनदरबारी प्रलंबित आहे. नवीन बसस्थानकाचे काम चालू आहे , तरी बस आगार नसल्याने या इमारतीचा उपयोग काय? असा सवाल नागरिक करीत आहेत .व तालुका विकास परिषद समितीने अनेक वेळा या मंडळास कार्यालयास डिपो मंजुरी करण्यासाठी व माजी क्रीडामंत्री संजय बनसोडे यांना ही निवेदन देण्यात आले होते .आता तालुका विकास परिषद ने मोठा निर्णय घेतला आहे तहसील कार्यालय येथे अमरण उपोषण करणार .अशी माहिती विकास परिषद अध्यक्ष संग्राम कदम यांनी दिली .

लातूर जिल्ह्याच्या टोकावर असलेल्या जळकोटडोंगरी तालुक्याच्या विकासासाठी मजबूत दळणवळण व्यवस्था अत्यावश्यक आहे. माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी बसस्थानकासाठी निधी मंजूर केला असून त्याचे काम प्रगतिपथावर आहे. मात्र बस आगाराच्या प्रस्तावाकडे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. विकास परिषद वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस हालचाल झालेली नाही.

**बस आगारासाठी लागणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेऊन जळकोट बस आगाराचा प्रस्ताव मुंबईला पाठविण्यात आला आहे. याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.अशी माहिती अश्वजित जानकर, लातूर विभागीय नियंत्रकयांनी दिली.**

तालुक्यातील काही गावांमध्ये आजही एसटी बस पोहोचलेली नाही. त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन धावणाऱ्या खासगी वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढला असून प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. लातूर विभागीय नियंत्रक अश्र्वजित जानराव यांनी जळकोट बस आगाराचा प्रस्ताव मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविल्याची माहिती दिली होती. मात्र त्यानंतरही प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने मंत्रालयात धूळखात पडला .जळकोट कराची अनेक वर्षापासून डेपोची मागणी आहे .परंतु आज पर्यंत मागणी पूर्ण झाली नाही .माजी क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी पहिले आमदार झाले . त्यावेळेस मोठी मोठी घोषणा करण्यात आले होते बस डेपो .न्यायालयअजून कुठलीच हालचाली झाली नाही जो हवेतच आहे.

जळकोट रावणकोळा,बाराळी,देगलूर . जळकोट ते वांजरवाडा हा रस्ता अर्ध्या अवस्थेमध्ये धुळ कात पडून आहे .याकडे लोकप्रतिनिधी लक्ष देण्याची गरज आहे .

## उन्हात राबणाऱ्या कष्टकऱ्यांसाठी आयएमएची बांधिलकी हिट वेव्ह रिलीफ अंतर्गत आज विविध वस्तूंचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३० एप्रिल : कडाक्याच्या उन्हातही पोटासाठी राबणाऱ्या कष्टकऱ्यांवर लातूर इंडीयन मेडीकल असोसिएशन 'हिट वेव्ह रिलीफ ॲक्टिव्हिटी' च्या माध्यमातून मायेची सावली धरणार असून या अंतर्गत कष्टकऱ्यांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी आज शुक्रवार (दि.१मे) महाराष्ट्रदिनी विविध वस्तुंचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. यावेळी डॉक्टर्स त्यांना उन्हापासून आरोग्याची काळजी कशी घ्यावी ? याबाबत माहिती सांगणार असून माहिती पत्रकांचे वाटपही करण्यात येणार आहे.**

**सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून उष्णतेच्या लाटा पुढेही येणार आहेत.अशा परिस्थितीतही आपल्या पोटासाठी व सर्वांच्या सुविधेसाठी जे लोक भर उन्हात रस्त्यावर उभे राहून काम करतात, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे आहे. या अंतर्गत गंजगोलाई, छत्रपती शिवाजी महाराज चौक, रेणापूर नाका, पीव्हीआर चौक व विवेकानंद चौक येथे प्रामुख्याने फळ आणि भाजी विक्रेते, सुरक्षा रक्षक ,मजूर आदिंना शुक्रवारी सायंकाळी छत्र्या टोप्या, पाणी बॉटल्स, ओआरएस पाकीटे, छोटे पंखे, स्टॉल अंबरेलाज आदींचे वाटप करण्यात येणार आहे.**

**याशिवाय शहर वाहतुक सुरळीत करण्यासाठी योगदान देणाऱ्या ट्रॅफिक पोलिसांनाही टोप्या, पाण्याच्या बॉटल्स देण्यात येणार आहेत. आपल्या सुखासाठी जे स्वता उन्ह झेलतात, घाम गाळतात, त्यांच्यासाठी लातूर आयएमएने उचललेले हे एक छोटेसे पाऊल असून काळजी घ्या, सहकार्य करा आणि आधार द्या**

**या ब्रीदवाक्यासह हा उपक्रम लातूर शहरात राबवला जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.**

## आनंदवाडी येथे टीबी मुक्त भारत अभियान संपन्न



**तभा वृत्तसेवा**

शिरूर अनंतपाळ **दि. ३० एप्रिल :** माझं गाव आरोग्यसंपन्न गाव या अभियाना अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय आनंदवाडी येथे टिबी मुक्त भारत अभियानांतर्गत छातीचे एक्सरे काढण्यात आले. हे अभियान तालूक्याचे कर्तव्यदक्ष तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राथमिक आरोग्य केंद्र येरोळ उपकेंद्र शिरूर अनंतपाळ अंतर्गत ग्रामपंचायत च्या पुढाकाराने हे अभियान यशस्वी करण्यात आले. या अभियानात गावातील महिला पूरूष असे गावातील एकूण १०५नागरिकांची तपासणी करण्यात आली. या अभियानात डॉ. संजय गिराम एक्सरे वैद्यकीय अधिकारी यांनी टिबी व एक्सरे संदर्भात मार्गदर्शन केले. या अभियानाला आनंदवाडी चे सुप्रसिद्ध सर्जन डॉ. हरिश्र्चंद्र वंगे यांनी भेट दिली.व मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ. गिराम साहेबां सोबत आरोग्य सेवक योगेश खुळे, एक्सरे परीवेक्षक अविनाश डुकरे, आरोग्य सेविका वर्षाताई सगर , आशा सुपरवायझर मनिषा मुसळंबे हे होते. हा कार्यक्रम आनंदवाडीचे सरपंच तथा शिवसेनेचे तालुकाप्रमुख भागवत वंगे यांच्या पूढाकाराने हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला उपस्थित उपसरपंच व्यंकट कल्ले, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानोबा शेळके, आशा कार्यकर्ती अनूसया पेद्देवाड, बचतगट अध्यक्ष अनूसया शिरूरे , सेवक रंजित मरे, यांच्या सह गावातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून माझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियानात सहभागी होवून हा कार्यक्रम यशस्वी केला .

## गव्हाण येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

रेणापूर **दि. ३० एप्रिल :** तालुक्यातील गव्हाण येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी तथागत भगवान गौतम बुद्ध व बोधीसत्व विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन गावचे सरपंच व्यकंट पवार, प्रा. किशोर चक्रे, डॉ. सागर माटेकर, श्रीकृष्ण पवार, शहाजी पवार, अरोग्य कर्मचारी कदम, जि.प. शिक्षक नागरगोजे यांच्या हस्ते करण्यात आले. पंचशील ध्वजारोहण सरपंच व्यकंट पवार व डॉ. सागर माटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्रिसरण पंचशील व बुद्ध वंदना प्रा. किशोर चक्रे (भारतीय बौद्ध महासभा जिल्हा महासचिव) यांनी घेतले सर्व मान्यवरांचा जयंती समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रा. किशोर चक्रे यांनी बौद्ध समाजाने पंचशीलाचे पालन करावे शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही सध्या जगाला युद्धाची नाही तर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची गरज आहे, असे सांगितले. यावेळी सार्वजनिक जयंती समितीचे अध्यक्ष आशिष घोडके, सुमेध घोडके, विजय घोडके, सुशील घोडके, उज्वल घोडके, अजय घोडके, पप्पू घोडके, विकास गायकवाड, अनिकेत घोडके, रोहीत घोडके इत्यादी भिमसैनिक महिला व पुरूष उपस्थित होते. सायंकाळी विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तैलचित्रांची मिरवणूक काढण्यात आली.

## प्रा. डॉ. क्रांती मोरे यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन




**तभा वृत्तसेवा**

रेणापूर **दि. ३० एप्रिल :** येथील शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागात कार्यरत असणाऱ्या साहित्यीक प्रा. डॉ. क्रांती मोरे यांच्या 'मानवतेचा क्रांतीप्रवाह' या पहिल्या कविता संग्रहाचे प्रकाशन पुणे येथे करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहात वर्ल्ड बुक रेकॉर्ड व एशिया वर्ल्ड बुक रेका र्ड अंतर्गत वेलवेट कविशा व झेप सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मंचावर एकाच वेळी ५० पुस्तकांचे प्रकाशन करून विक्रम नोंदविण्यात आला. या उपक्रमात वय वर्ष ९ ते ७० पर्यंतच्या लेखकांचा सहभाग होता. या कार्यक्रमास ज्येष्ठ लेखिका रोहिणी निनावे, मित्र म्हणे'चे सौमित्र पोटे तसेच गायन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मंजुश्री ओक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. डॉ. क्रांती मोरे यांच्या या कविता संग्रहात सामाजिक जाणिवा, खी मनाच्या विविध छटा, सामाजिक वास्तव आणि अंतर्मनातील भावविश्र्व यांचा प्रामाणिक वेध घेतला आहे.

नातेसंबंधातील गुंतागुंत, खी अस्मिता, आत्मभान, जीवनातील संघर्ष आणि समकालीन घडामोडींवर भाष्य करणाऱ्या या कविता वाचकांना विचारप्रवृत्त करतात. अगदी साध्या, सरळ आणि ओघवत्या भाषेत मांडलेल्या या कविता कधी कोमल, कधी विद्रोही तर कधी अंतर्मुख करणाऱ्या आहेत. निसर्गाच्या प्रतिमा आणि समाजातील विसंगतीवर थेट भाष्य करीत या रचना स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवतात. मानवतेचा क्रांतीप्रवाह' हा संग्रह केवळ कवितांचा संच नसून एका खीच्या विचारांचा, प्रश्र्नांचा आणि स्वतः ला शोधण्याच्या प्रवासाचा शब्दबद्ध आ रसा ठरत आहे.

## भारतीय संविधान मानवमुक्तीचे महाप्रयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३० एप्रिल : हजारो वर्षांपासून असणारी विषमतावादी व्यवस्था नाकारून नवी जीवनमूल्ये भारतीय संविधानाने आपल्या देशात प्रस्थापित केली. तथागत बुद्धांपासून स्विकारलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही महामूल्ये संविधानाने भारतीय समाजाला दिली. समाजातील शेवटच्या माणसाला सर्वांगीण विकास करण्याची संधी भारतीय संविधानाने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे भारतीय संविधान हे मानवमुक्तीचे महाप्रयोजन असल्याचे प्रतिपादन संविधानाचे अभ्यासक प्रशांत वंजारे यांनी केले.**

**'जी २४' या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित बसवेश्र्वर फुले आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून वंजारे बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. अशोक नारनवरे हे होते. 'भारतीय संविधान, धर्मनिरपेक्षता आणि धर्मराज्य' या विषयावर बोलताना वंजारे म्हणाले, संविधानाला अडगळीत टाकून काही अतिवादी धर्मांध समूह धर्माधिष्ठित राष्ट्र निर्माण करण्याच्या वल्गना करत आहेत. संविधानाच्या अस्तित्वामुळे सुरक्षित झालेल्या आणि संविधानाचे फायदे घेणाऱ्या मागासवर्गीय समूहाने प्राणपणाने भारतीय संविधानाचे रक्षण केले पाहिजे. अन्यथा देश विभाजित होण्याचा धोका आहे, असेही वंजारे म्हणाले.**

**यावेळी विचारमंचावर जयंती समीतीचे प्रमुख अफझल कुरेशी, रामराजे आत्राम, यु. डी. गायकवाड, प्रा. दत्ता सोमवंशी, नवनाथ शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. श्रीकांत मुद्दे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. सदाशिव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. हर्षवर्धन कोल्हापूरे, नरसिंग घोडके, डी. उमाकांत आदींनी परिश्रम घेतले.**

# ओंकार साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांची अडवणूक

## चार महिने उलटले तरी ऊस बिले मिळेनात!

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. ३० एप्रिल :** तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, 'ओंकार साखर कारखान्याने' लीजवर घेतला आहे., ओंकार साखर कारखाना प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. ऊस तोडून चार महिने उलटले तरी हक्काचे पैसे मिळत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला असून, कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे हेदेखील अनेक महिन्यांपासून कारखाना साईटवर आले नसल्याने दाद मागायची कुणाकडे? असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.लग्नाच्या पत्रिका छापल्या, पण हाती दमडी नाही अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पिकवलेला ऊस जानेवारी महिन्यातच कारखान्याला दिला. नियमानुसार १५ दिवसांत मिळणे अपेक्षित असलेले बिल चार महिने झाले तरी अद्याप मिळालेले नाही. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी याच बिलाच्या पैशांवर आपल्या मुलींची लग्ने ठरवली आहेत. लग्नपत्रिका छापून वाटपही झाले आहे, मात्र हातात पैसेच नसल्याने आता ही लग्ने पुढे ढकलण्याची किंवा मोडण्याची भीती निर्माण झाली आहे. शेकडो शेतकऱ्यांनी लग्नाच्या पत्रिका अर्जासोबत जोडून कारखाना प्रशासनाकडे विनवणी केली, मात्र प्रशासनाला पाझर फुटलेला नाही.

### कारखान्यावर हेलपाटे, पदरी निराशाच

कारखान्यावर खेटे मारून शेतकऱ्यांच्या चपला झिजल्या आहेत, पण साधे समाधानकारक उत्तरही मिळत नाही.

कारखाना प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे शेतकरी पुरता नैराश्यात बुडाला आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर उभा राहिलेला कारखाना आज त्याच शेतकऱ्यांच्या मुळावर उठल्याचे विदारक चित्र निलंगा मतदारसंघात पाहायला मिळत आहे.

आम्ही काबाडकष्ट करून ऊस पिकवला, कारखान्याने तो नेला, पण आता घामाचे पैसे मागण्यासाठी आम्हाला भिकाऱ्यासारखे उभे राहावे लागत आहे, अशी भावना पीडित शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. जर येत्या काही दिवसांत थकीत ऊस बिले मिळाली नाहीत, आंदोलन करण्याचा इशारा पिडीत शेतकऱ्यांनी दिला आहे.

## कडक उन्हात बचावासाठी लिनेन्स क्लब चा उपक्रम



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. ३० एप्रिल :** राज्यात वाढत्या उष्णतेने उच्चांक गाठला असून तापमानाची नोंद ४६ अंश सेल्सिअस होताना दिसत आहे . या वाढत्या उष्णतेने रोजगार करणारे हात बाधित असल्याने अशा लोकांना माणुसकी भावना दाखवत अहमदपूर येथील लिनेन्स क्लब च्यावतीने सामाजिक जाणिवेचा भाग म्हणून भाजी विक्रेत्यांना मातीचे माठ, पाणी बॉटल त्या प्रमाणे अहमदपूर येथील स्वामी समर्थ केंद्रात थंड पाणी पुरवठा करण्या साठी जार चे वाटप करण्यात आले. राज्य सरकार च्या'प्लास्टिक-मुक्त अभियाना'अंतर्गत, येथील क्लब'ने स्थानिक भाजी मार्केटमध्ये ५०० कापडी पिशव्यांचे वाटप केले.प्लास्टिकच्या वापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल जनतेमध्ये जागृती निर्माण करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन क्लबच्या सदस्यांनी केले.

समाजाचा महत्वाचा घटक असणारे आणि भर उन्हात आपला व्यवसाय करणारे रिक्षा चालक यांना क्लबतर्फे उपयोगी असे टॉवेल आणि चपलांचे वाटप करण्यात आले. या वेळी रिक्षा चालक बांधवांनी क्लब च्या सदस्यांचे आभार व्यक्त केले.

अशा समाज कल्याणकारी कामांमधून क्लबची सेवावृत्ती दिसून येते. या विविध प्रकारच्या सेवा कार्यात क्लब अध्यक्षा शोभाताई टोम्पे, सचिव शुभांगी पाटील, कोषाध्यक्ष छाया विळेगावे यांचे सह सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

# ओबीसींच्या सर्वसमावेशक विकासावर शासनाचा भर : अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ मे -**

इतर मागास वर्गाच्या (ओबीसी) आणि बहुजन समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. 'ओबीसींचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा विशेष भर' असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन विकास, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

नांदेड येथील विष्णू नगर भागातील श्री. शंकरराव चव्हाण सभागृहात इतर बहुजन कल्याण विभागाच्यावतीने आयोजित 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्यात' पालकमंत्री सावे अध्यक्षीय पदावरून बोलत होते. या कार्यक्रमास खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार बाबुराव कोहळीकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, इतर मागास बहूजन कल्याण संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, म.राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. वसंत माने, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलींद नारिंगे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे संचालक प्रताप पवार, वनार्टीचे संचालक प्रशांत वावगे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक तेजस माळवदकर, सहाय्यक संचालक सचिन खुने यांच्यासह परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर येथील संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे म्हणाले की, समाजातील तळागाळातील घटकांना आणि विशेषतः ओबीसी प्रवर्गातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. महामंडळांच्या माध्यमातून सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आजच्या या कर्ज वाटप मेळाव्याचा लाभ घेऊन तरुणांनी स्वतःचा व्यवसाय उभा करावा आणि राज्याच्या विकासात आपले योगदान द्यावे. रोजगार मिळविण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा, असे आवाहन मंत्री सावे यांनी केले.



वर्षभरात ७५ विद्यार्थ्यांना जवळपास ६० लक्ष रुपयांपर्यत परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात ६२ जिल्हानिहाय वसतीगृहे उभारले आहेत. यात केवळ मुंबई-पुणे शहरे अपवाद आहेत. या ६२ वसतीगृहामध्ये ३१ मुलीसाठी आणि ३१ मुलांचे वसतीगृहे आहेत. याशिवाय आधार योजनेच्या माध्यमातूनही ओबीसी विद्यार्थ्यांना राहण्याची सोय शासनाकडून करण्यात येत आहेत. स्पर्धात्मक परीक्षेतही विद्यार्थ्यांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे ते म्हणाले. व्हीजेएनटीच्या ९०० आश्रमशाळेतील १०० विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेतून इस्त्रोसारख्या संस्थाना भेट देण्यासाठी शासन पुढाकार घेत असल्याचेही पालकमंत्री श्री. सावे म्हणाले.

या ऐतिहासिक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना खासदार अशोक चव्हाण म्हणाले, वाढत्या स्पर्धेच्या काळात रोजगार आणि व्यावसायिक गुणवत्तेची गरज अधोरेखित झाली असून, 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. उद्योग उभारणीसाठी गरिबांना येणारी 'मार्जिन मनी'ची अडचण सोडवण्यासाठी सध्या १४ महामंडळे कार्यरत आहेत. आता गावागावांत सुविधा केंद्रे सुरू करून नावीन्यपूर्ण व्यवसायांना चालना दिली जात आहे. ओबीसी आणि इतर मागासवर्गीयांमधील जवळपास ६११ उपजातींना न्याय देण्याच्या उद्देशाने ३१ मार्च २०२६ पर्यंत तब्बल ७० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना कर्जवाटप करण्यात आले आहे. विशेष म्हणजे यातील ७० ते ७५ टक्के निधी परतफेड होत असून, हे या योजनेचे मोठे यश असल्याचे त्यांनी सांगितले.

'महाज्योती' व इतर कौशल्य विकास उपक्रमांच्या माध्यमातून आतापर्यंत दोन हजार ३८२ विद्यार्थ्यांची सरकारी नोकरीत निवड झाली आहे, १८ हजार ७७८ विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला आहे आणि २१ हजार ६६० विद्यार्थिनींनी टेलरिंगसारख्या विविध लघु व्यवसायाच्या माध्यमातून स्वतःचा स्वयंरोजगार सुरू केला असल्याची माहिती खासदार अशोक चव्हाण यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणारा हा अत्यंत यशस्वी आणि दिशादर्शक प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

खासदार डॉ. अजित गोपछडे म्हणाले, या मेळाव्यातून मोठ्याप्रमाणात स्वयंरोजगाराला चालना मिळणार आहे. शासनाच्या या योजनांचा प्रत्येक पात्र लाभार्थ्यांनी लाभ घेऊन इतर पात्र लाभार्थ्यांपर्यत शासनाच्या योजनांचा लाभ पोहचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना आमदार बाबुराव कोहळीकर यांनी बँकांना आवाहन केले की, त्यांनी शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजना तळागाळातील आणि खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

या कार्यक्रमात लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज कसे भरावेत याबाबतची माहिती पुस्तिका, वनार्टीच्या माहिती पुस्तिका तसेच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाच्या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले यासह कार्यक्रमात विभागाच्यावतीने देण्यात आलेल्या लाभार्थ्याच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या.

या मेळाव्यात अनेक गरजू आणि होतकरू लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्जाचे वाटप करण्यात आले. तसेच, पालकमंत्री अतुल सावे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना वाहनांच्या ताबा चावीचे वाटप करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. सदर कार्यक्रमाला नांदेड, लातूर, परभणी, धाराशिव आणि हिंगोली जिल्ह्यातील तरुण-तरुणी, विविध योजनांचे लाभार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाच्या या उपक्रमामुळे मराठवाड्यातील स्वयंरोजगाराला मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. महापौर कविता मुळे यांनीही विचार मांडले.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली. प्रास्ताविक इतर मागास बहुजन कल्याण विभाग संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू दासरी यांनी केले. व्यवस्थापकीय संचालक प्रताप पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## श्री सुभाष शुगर व शिऊर साखर कारखाना येथे रक्तदान, रोगनिदान शिबिर

**हदगाव** -श्री. सुभाष शुगरचे कार्यकारी संचालक सुशीलकुमार सुभाषराव देशमुख हे नेहमीच सामाजिक कार्यक्रम आयोजित करून सामाजिक दायित्व भान जपत समाजासमोर आदर्श निर्माण करत असतात त्यांच्याच संकल्पनेतून दिनांक १ मे २०२६ महाराष्ट्र स्थापना दिनाच्या त्या सोबतच कामगार दिन व चिरंजीव सुजयकुमार सुशील कुमार देशमुख यांचा वाढदिवसाचे औचित्य साधत हा योगायोग जुळून आल्यामुळे श्री. सुभाष शुगर प्रा. लि. हडसणी ता. हदगाव व शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी येथे महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला आज दि.३० एप्रिल रोजी भव्य रक्तदान व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी हदगाव येथे २६ रक्तदात्यांनी तर शिऊर येथे ७० रक्तदात्यांनी स्वइच्छेने रक्तदान करून आपला सहभाग नोंदवला तसेच १६ व्या वर्षी पदार्पण करणाऱ्या चिरंजीव सुजयकुमार देशमुख यांना शुभेच्छा देण्यात आले. श्री सुभाष शुगर कारखान्याचे कार्यस्थळावर श्री गोळवलकर गुरुजी रक्त संकलन करणारी टीम सकाळी ९ वाजता हजर झाली होती त्याचबरोबर रोग निदान करणारे सगळेच सहकारी सुद्धा उपस्थित होते यावेळी श्री सुभाष शुगर येथील अधिकारी, कर्मचारी, कामगार २६ रक्तदात्यांनी तर शिऊर साखर कारखाना लिमिटेड वाकोडी येथे ७० रक्तदात्यांनी स्वच्छं रक्तदान केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. रक्त संकलन व सर्व रोग निदान करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे दोन्ही कारखान्याच्या प्रशासनाच्या वतीने आभार मानण्यात आले.



## स्वारातीम' विद्यापीठात 'कला आणि संस्कृती उन्हाळी शिबिर

**नवीन नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ललित व प्रयोगजीवी कला संकुल आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कला आणि संस्कृती उन्हाळी शिबिर २०२६'चे आयोजन कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या शिबिरातून विद्यार्थ्यांना कला, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा अनुभव देण्याचा उद्देश आहे. या शिबिरात नृत्य, नाट्य, गायन व वादन, छायाचित्रण तसेच चित्रकला अशा विविध कलाप्रकारांचा समावेश असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. धमाल मोज, गंमत, शिक्षण आणि सर्जन या संकल्पनेवर आधारित हे शिबिर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे ठरणार आहे.

शिबिराचा कालावधी ५ ते २० मे २०२६ असा असून दररोज सायंकाळी ४.३० ते ६.३० या वेळेत सत्रे होणार आहेत. ५ ते १५ वयोगटातील मुला-मुलींसाठी हे शिबिर खुले आहे. प्रवेशासाठी अंतिम तारीख ४ मे २०२६ असून प्रवेश शुल्क रुपये १५००/- निश्चित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी इच्छुकांनी ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. शिवराज शिंदे ( ९०९९९४५९९६) आणि प्रा. राहुल गायकवाड (९०४९०४३८४४) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे. या उपक्रमाचे संयोजन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर तसेच ललित व प्रयोगजीवी कला संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी कला शिकून सर्जनशील होण्याची संधी या शिबिरातून उपलब्ध होणार असल्याने पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे

## लोहा तालुक्यात पाचशे कर्मचाऱ्यांचे जनगणना प्रशिक्षण : परळीकर

**लोहा** -तालुक्यात जनगणनेच्या कामाला १६ मे पासून सुरुवात होणार आहे. पहिल्या टप्प्यात घर गणना व फेब्रुवारी २०२७ मध्ये प्रत्यक्षात कुटूबातील सदस्या संख्येची गणना होणार आहे. यासाठी तहसीलदार यांची जनगणनेच्या कामासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे तालुक्यात ५०० कर्मचाऱ्यांना तीन टप्यात प्रशिक्षण देण्यात येणार आहे पारडी येथील सयाद्री शाळेत प्रशिक्षण सुरु होत आहे. तीन टप्प्यात प्रशिक्षण होणार आहे अशी माहिती तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी दिली. तालुक्यात ५०० कर्मचारी प्रगणक, पर्यवेक्षक यांना जगगणनेच्या प्रत्यक्ष कामासाठी प्रशिक्षित केले जाणार आहे. तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार पाठक,विभाग प्रमुख श्रीमती के. आर. खोडवे, इश्वर धुळगंडे, मळगे या प्रशिक्षणासाठी परिश्रम घेत आहेत दरम्यान मागील आठवड्यात प्रशिक्षण आढावा बैठकीस अनुउपस्थित ५८ कर्मचाऱ्यांना तहसीलदार यांनी नोटीस बजावून गैरहजर राहण्या बाबत खुलासा करण्याचे निर्देश दिले आहेत लोहा शहराच्याजवळ असलेल्या सहयाद्री इंग्लिश स्कूल पारडी येथे तीन टप्यात जनगणना प्रशिक्षण होणार आहे. २७ ते २९ एप्रिल या काळात १५० कर्मचारी, दुसरा टप्पा. ३० एप्रिल ते ३ मे,१५० कर्मचारी ४ ते ६ मे या तिसऱ्या टप्प्यात २०० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आठ प्रशिक्षित या ठिकणच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतील. १६ मे ते १४ जून या काळात प्रत्यक्षात घरांची नोंद होणार आहे. त्यात ३३ प्रश्नावली असून प्रगणक घरी जाऊन कुटुंब प्रमुखांना विचारणा करतील. स्वतःच्या मोबाईल मध्ये प्रगणक ही माहिती नमूद करतील. डिजिटल नोंद होणार आहे तर फेब्रुवारी २०२७ मध्ये प्रत्यक्षात कुटुबातील व्यक्तींची मोजणी होणार आहे. तालुक्यात जनगणनेच्या प्रत्यक्ष कामासाठी ५०० कर्मचाऱ्यांची तर शहरी भागात ६० कर्मचाऱ्यांची या कामासाठी नियुक्ती करण्यात आली असल्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी सांगीतले.

# एसजीजीएस आयईटी, नांदेडमध्ये 'संकल्प २.०' आंतरराष्ट्रीय परिषद

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १ मे -**




शाश्वत पर्यावरण, स्वच्छ ऊर्जा आणि हरित तंत्रज्ञानाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकत श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था (एसजीजीएस आयईटी), नांदेड येथे 'संकल्प २.०' अंतर्गत "dvances in Engineering and Science for Sustainable Environment and Energy (ESSEE-2026)' ही दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद दि. २३ व २४ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडली. देश-विदेशातील संशोधक, प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे ही परिषद ज्ञान, संशोधन आणि नवोन्मेषाचा संगम ठरली.याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकारे होते.

रासायनिक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आयोजित या परिषदेत पर्यावरण संवर्धन, ऊर्जा कार्यक्षमता, कार्बन उत्सर्जन नियंत्रण, हरित प्रक्रिया तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. संशोधन आणि उद्योग यांच्यातील दुवा मजबूत करण्यासाठी हे व्यासपीठ विशेष उपयुक्त ठरले.यावेळी

परिषदेचे उद्घाटन दि. २३ एप्रिल रोजी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे कुलगुरू डॉ. व्ही. एस. सपकाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. जयांद्र अहिरे यांनी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकारे होते. यावेळी परिषद संयोजक व विभागप्रमुख डॉ. प्रकाश जाधव, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. अभिजित व्ही. नांदेडकर, संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. ए. बी. गोंडे तसेच विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाराष्ट्रासह देशभरातून एकूण ५६ सहभागी विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.उत्कृष्ट शोधनिबंध आणि नाविन्यपूर्ण सादरीकरणांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एस. बी. देठे, डॉ. ए. डब्ल्यू. देशमुख, डॉ. संदीप मुंढे, डॉ. ए. पी. चव्हाण, प्रा. पी. ए. पवार, डॉ. डी. यू. गिराम आणि डॉ. पी. के. रामटेके यांसह सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यांची मोठ्याप्रमाणात उपस्थित होती.

# अपूर्ण महामार्ग टोलवसुली कि टोलधाड

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १ मे -**

माहूर-किनवट- भोकर-नांदेड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ या मार्गाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. विशेषतः हिमायतनगर ते किनवट या दरम्यान अनेक ठिकाणी रस्त्याची कामे संथगतीने सुरू असून झालेल्या रस्त्याची अवस्था दोन तीन वर्षात अत्यंत दयनीय झाली आहे. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.




गेल्या दहा वर्षांपासून या महामार्गाचे काम सुरू असून, वेळोवेळी कामाच्या दर्जाबाबत तसेच विलंबाबाबत अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. विशेषतः हिमायतनगर ते किनवट पर्यंतचा महामार्ग खड्डेमय असुन या रस्त्यावर अनेक ठिकाणी अद्यापही काम झालेले नाही. अशा परिस्थितीत रस्ता अपूर्ण असतानाच टोल नाके उभारून टोलवसुली सुरू करण्याच्या हालचाली राष्ट्रीय महामार्ग का करतय असा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे. सध्या भोकर ते हिमायतनगर मधील सोनारी फाटा येथे विभागाकडून टोल सुरू केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

भोकर ते हिमायतनगर हा रस्ता पूर्ण झाला असला तरी हिमायतनगर ते किनवट हा मार्ग अद्यापही अपूर्ण आहे.पुढे किनवट ते माहुर हा भागही पुर्ण झाला असला तरीही माहुर चढताना दोन कि.मी.रस्त्याचे काम रखडले आहे. जोपर्यंत हा महामार्ग पूर्ण होत नाही.तोपर्यंत या मार्गावर टोलवसुली सुरू करू नये, अशी जोरदार मागणी जनतेतून होत आहे. .

दरम्यान,राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने जनतेच्या भावना लक्षात घेऊन अपूर्ण रस्त्यावरील टोलवसुलीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा, तीव्र सर्व पक्षीय जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जनतेतून देण्यात येत आहे.

# रॉयल्टीच्या आडून मातीची लूट; प्रशासनाची संशयास्पद भूमिका उघड

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १ मे -**

नायगांव तालुक्यातील धनज हद्दीत मातीमाफियांचा धुमाकूळ सुरू असून नाममात्र रॉयल्टी भरून हजारो ब्रास मातीचे मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या अवैध उत्खननामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडत असून पर्यावरणीय संतुलनालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, काही ठिकाणी दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या सुमारासही मातीची अवैध वाहतूक सुरू आहे. शासनाच्या नियमांना जुमानत नसताना मातीमाफिया सर्रासपणे मातीचा उपसा करत आहेत. यामुळे परिसरातील सुपीक शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

दरम्यान, धनज येथील तलाठी कदम (पी. एम.) यांच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिक नागरिकांकडून माहिती मिळाल्यानंतर दैनिक 'तरुण भारत'च्या प्रतिनिधींनी तलाठी कदम यांच्याशी संपर्क साधून उत्खननाबाबत विचारणा केली असता त्यांनी पाहतो, विचारतो अशी केवळ जुजबी व उडवाउडवीची उत्तरे दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. जबाबदारीच्या पदावर असलेल्या अधिकाऱ्यांकडून अपेक्षित असलेली तत्परता व संवेदनशीलता न दिसता उलट बेफिकीर आणि उध्दट भूमिका घेतली जात असल्याने संताप अधिकच वाढला आहे.

महसूल विभागातीलच काही कर्मचारी जर अशा अवैध उत्खननाला मूक संमती देत असतील, तर कुंपणच शेत खाते अशी स्थिती निर्माण झाल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या या ढिसाळ आणि संशयास्पद भूमिकेमुळे संपूर्ण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधित मातीमाफिया तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. महसूल विभागाने तातडीने हस्तक्षेप करून बेकायदेशीर उत्खननावर आळा घालावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

## अतिक्रमणाकडे नगर परिषदेचे दुर्लक्ष; नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १ मे -**

मुदखेड शहरातील प्रभाग क्र. २ मधील मुख्य नाल्यावरील आणि बाजूच्या रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याबाबत नगर परिषदेने केवळ नोटिसा बजावून थातूरमातूर कारवाई केल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. मागील पावसाळ्यात या अतिक्रमणामुळे नाल्याचे पाणी भरवस्तीत शिरून मोठे नुकसान झाले होते. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ११ सप्टेंबर २०२५ आणि ४ फेब्रुवारी २०२६ रोजी तक्रारी अर्ज देऊनही ठोस कारवाई झालेली नाही.

नगर परिषदेने दि.८ एप्रिल २०२६ रोजी नोटीस काढल्याचे सांगत कारवाईचे आश्वासन दिले होते, मात्र प्रत्यक्ष घटनास्थळी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. नगर परिषदेची ही नोटीस केवळ 'देखावा' आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. जर तातडीने अतिक्रमण काढून नाला व रस्ता मोकळा करण्यात आला नाही, तर नगर परिषदेच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनावर स्वाक्षरी करत मो. बुरहान अ. मजीद, मो. रहमत आली चाऊस, अवेस खुरेशी आणि शेख रफिक उर्फ बाबा भाई यांसारख्या स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी नगर परिषदेकडे सादर केले आहे.

# हुतात्म्यांच्या रक्ताने पावन भूमी पण स्मारकावर उपेक्षेची धूळ !

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १ मे -**

स्वातंत्र्यलढा आणि मराठवाडा मुक्तीसंग्रामातील हुतात्म्यांच्या बलिदानाने पावन झालेल्या इस्लापूर भूमीवर उभारलेले हुतात्मा स्मारक आज उपेक्षेच्या गर्तेत सापडले आहे. एकेकाळी प्रेरणास्थान असलेले हे स्मारक आज दुर्लक्ष, अस्वच्छता आणि निष्क्रियतेचे प्रतीक बनले असून, सुशोभीकरणाच्या प्रतीक्षेत वर्षानुवर्षे थांबले आहे.

हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या काळात इस्लापूर आणि किनवट परिसर हा निझामी राजवटीच्या अत्याचाराचा केंद्रबिंदू होता. रझाकारांच्या दहशतीला न जुमानता येथील शेतकरी, कामगार, तरुण आणि सामान्य नागरिकांनी भारतीय संघराज्यात विलीन होण्यासाठी प्राणपणाने लढा दिला. या संघर्षात हुतात्मा झालेले स्वातंत्र्य सैनिक हु.लाखासिंग मेघासिंग लमाणी, हु.जयवंतराव विक्रम पाटील, हु.जानकीलाल मोहनलाल राठी, हु.तुकाराम किसनराव चनेवार, हु.गंगाधरराव कवानकर व अनेक क्रांतिकारकांनी आपल्या छातीत गोळ्या झेलत हसत-हसत बलिदान दिले. त्यांच्या या अद्वितीय शौर्याची स्मृती चिरंतन राहावी, यासाठीच हे हुतात्मा स्मारक उभारण्यात आले.



मात्र, आज या स्मारकाची अवस्था पाहिली तर इतिहासच जणू अश्रू ढाळत आहे. स्मारकाभोवती गवताचा विळखा, तुटलेली भिंत, अस्वच्छ परिसर, प्रकाशयोजनेचा अभाव आणि कोणत्याही मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे हे ठिकाण ओसाड पडले आहे. जे स्मारक पिढ्यानपिढ्या देशभक्तीची प्रेरणा द्यायला हवे होते, तेच आज उपेक्षेचे प्रतीक ठरत आहे.

विशेष म्हणजे, स्मारकासाठी भरपूर मोकळी आणि विस्तीर्ण जागा उपलब्ध असूनही स्थानिक ग्रामपंचायतीकडून याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. एवढ्या मोठ्या जागेचा नियोजनबद्ध विकास करून हे ठिकाण एक आदर्श स्मारक व पर्यटनस्थळ बनू शकते, मात्र नियोजनाअभावी आणि उदासीनतेमुळे ही सुवर्णसंधी वाया जात आहे.

स्थानिकांनी सुचवलेल्या आराखड्यानुसार, स्मारक परिसरात आकर्षक आणि हिरवेगार गार्डन उभारता येऊ शकते. मुलांसाठी आधुनिक खेळाचे साहित्य, झोपाळे, स्लाईड्स यांची सोय केल्यास हे ठिकाण कुटुंबांसाठी आकर्षण ठरेल. युवक आणि नागरिकांसाठी योग व व्यायाम साधने बसवून आरोग्यदायी वातावरण निर्माण करता येईल. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र व सुरक्षित वॉकिंग ट्रॅक तयार करून त्यांना शांतपणे फिरण्याची सुविधा देता येईल.

याचबरोबर स्मारकाच्या भिंतींवर मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा इतिहास, हुतात्म्यांच्या शौर्यगाथा, तसेच देशभक्ती जागवणारी भित्तीचित्रे उभारल्यास येणाऱ्या पिढ्यांना इतिहासाची जाणीव होईल. योग्य प्रकाशयोजना, बसण्याची व्यवस्था, स्वच्छता आणि सुरक्षेच्या सुविधा दिल्यास हे ठिकाण खऱ्या अर्थाने प्रेरणास्थळ बनू शकते.

ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाकडून वारंवार आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही दिसून येत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. इतिहास जपण्याची जबाबदारी नेमकी कुणाची? आणि हुतात्म्यांचा सन्मान केवळ भाषणापुरताच का? असे प्रश्न आता उघडपणे विचारले जात आहेत.

हुतात्म्यांच्या बलिदानाचा सन्मान राखायचा असेल, तर केवळ शब्द नव्हे तर कृतीतून दाखवण्याची हीच खरी वेळ असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. सरोजनीताई राऊत यांची रोजगार समन्वय समितीवर निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

कळंब येथील डॉ. सरोजनीताई राऊत यांची राज्यस्तरीय रोजगार समन्वय समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. युवक-युवतींना रोजगार, स्वयंरोजगार, स्टार्टअप व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे.

दि.२९ एप्रिल रोजी कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या शासन निर्णयानुसार समितीची स्थापना करण्यात आली असून अध्यक्षपदी डॉ. रणजीत पाटील यांची नियुक्ती झाली आहे.



या निवडीबद्दल देवेंद्र फडणवीस व मंगलप्रभात लोढा यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

डॉ. राऊत यांच्या निवडीमुळे धाराशिव जिल्ह्यातील युवकांना रोजगार व उद्योजकतेच्या अधिक संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापूरात १५६ कोटींच्या रस्ते कामांवर घोटाळ्याचा आरोप

**तुळजापूर, दि.३० एप्रिल -**
शहरातील नगर उद्यान/नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजूर १५६ कोटी रुपयांच्या रस्ते विकास कामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करत नगरसेवकांनी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चौकशीची मागणी केली आहे. संभाजीनगर येथील मे. के. एच. कन्स्ट्रक्शन कंपनीला या कामांचा ठेका देण्यात आला होता. मात्र, कंपनीने काही रस्ते अर्धवट करून काम बंद केल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ठेकेदाराने बनावट कागदपत्रांच्या आधारे ठेका मिळवल्याचा आरोपही करण्यात आला असून, यासंदर्भातील पुरावे निवेदनासोबत सादर करण्यात आले आहेत. या प्रकरणी ठेकेदार व संबंधित कंपनीवर कारवाई करण्याची मागणी करत अधीक्षक अभियंता यांना काँग्रेस गटनेते अमोल कुतवळ, रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय कदम, प्रगती लोंढे व ऋषिकेश मगर यांनी निवेदन दिले आहे.



### डॉ. श्रीकांत गायकवाड यांना 'शांतिदूत पुरस्कार'

**उमरगा, दि.३० एप्रिल -**
शांतिदूत परिवाराच्या वतीने आयोजित समारंभात प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना 'शांतिदूत पुरस्कार' प्रदान करण्यात आला. माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना डॉ. गायकवाड यांनी सामाजिक कार्याची जबाबदारी वाढल्याची भावना व्यक्त करत शांतता व सौहार्दासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास पं.स. सभापती आकांक्षा चौगुले, डॉ. विठ्ठल जाधव, प्रल्हाद सूर्यवंशी, जि.प. उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, प्रा. भैरवनाथ कानडे, सुलक्षणा शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



### तुळजापूरात आंबेडकर जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**तुळजापूर, दि.३० एप्रिल -**
तुळजापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी उपक्रमांनी साजरी करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष शुभम कदम यांच्या पुढाकारातून उपजिल्हा रुग्णालयात नवजात शिशूंना बेबी किट व रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे,

राजाभाऊ ओव्हाळ व जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. तसेच कै. साहेबराव हंगरगेकर विद्यालयाचे मुख्याध्यापक नारायण मरळ व स्वच्छता निरीक्षक दत्तात्रय साळुंके यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.



### तुळजापूरमध्ये पाणपोईचा निवारा पाडल्याचा आरोप

**तुळजापूर, दि.३० एप्रिल -**
आर्य चौकात काँग्रेसचे युवा नेते सुदर्शन वाघमारे यांनी भाविकांच्या सोयीसाठी उभारलेला पाणपोईचा निवारा नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी मोहिमेत राजकीय द्वेषातून पाडण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना भाविकांना दिलासा मिळावा यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता.

राजकारणासाठी नव्हे तर भाविकांच्या सोयीसाठी असे सांगत वाघमारे यांनी पुन्हा पाणपोई सेवा सुरू केली आहे. श्री तुळजाभवानी मंदिर येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. मात्र नगर परिषदेकडून शहरात पाणपोई किंवा निवाऱ्याची व्यवस्था नसल्याचा आरोप वाघमारे यांनी यावेळी केला.

# धाराशिवमध्ये डिजिटल जनगणनेला आजपासून प्रारंभ

### १६ मेपासून घरगणनेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यात देशाच्या आगामी जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा उद्या (१ मे) पासून सुरू होत असून, १ ते १५ मे दरम्यान नागरिकांना 'स्वयंगणना' करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कालावधीत नागरिकांना अधिकृत पोर्टलवर स्वतःची व कुटुंबाची माहिती ऑनलाइन भरता येणार आहे.

यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणकांमार्फत प्रत्यक्ष घरयादी व घरगणना करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, ही जनगणना देशातील पहिली डिजिटल जनगणना ठरणार असून प्रशासनाने तांत्रिक व मनुष्यबळाच्या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण केली आहे.

जिल्ह्यातील जनगणना सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण ३५८० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये तहसील स्तरावर २८८८, नगरपालिका क्षेत्रात ६४० आणि ५२ फील्ड ट्रेनर्सचा समावेश आहे. सर्व कर्मचाऱ्यांना जनगणनेचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले असून, १६ मेपासून ते प्रत्यक्ष कामाला लागणार आहेत.



स्वयंगणना करताना नागरिकांना पोर्टलवर ३३ प्रश्नांची प्रश्नावली भरावी लागणार आहे. यामध्ये घराची स्थिती, कुटुंबाची रचना, उपलब्ध सोयी-सुविधा, मालमत्ता तसेच इतर सामाजिक-आर्थिक माहितीचा समावेश असेल.

ऑनलाइन माहिती भरल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला एक विशेष ओळख क्रमांक दिला जाणार आहे. हा आयडी सुरक्षित ठेवणे आवश्यक असून, १६ मेनंतर प्रगणक घरभेटीला आल्यावर तो आयडी दाखवणे बंधनकारक राहणार आहे. संबंधित प्रगणक हा आयडी आपल्या प्रणालीवर अपलोड करून माहिती अधिकृतरीत्या नोंदवणार आहेत.

प्रशासनाच्या मते, स्वयंगणनेमुळे प्रत्यक्ष घरगणनेदरम्यान लागणारा वेळ कमी होणार असून, माहिती अधिक अचूक व जलद पद्धतीने संकलित होणार आहे.

त्यामुळे नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## धडाकेबाज कारवाई : चोरीची मोटारसायकल जप्त; एक आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० एप्रिल -**

वाशी पोलिसांनी रात्रीच्या गस्तीदरम्यान तत्परता दाखवत चोरीची मोटारसायकल जप्त केली असून एका आरोपीस ताब्यात घेतले आहे. या प्रकरणातील दुसरा आरोपी मात्र अंधाराचा फायदा घेत फरार झाला आहे.



दि.२९ एप्रिल रोजी रात्री वाशी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक हद्दीत नियमित गस्त घालत होते. यावेळी पिंपळगाव पाटी परिसरात विनानंबर प्लेट असलेल्या मोटारसायकलवर दोन इसम संशयास्पदरीत्या फिरताना आढळले. पोलिसांनी त्यांना थांबविण्याचा इशारा केला असता त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलीस पथकाने तत्काळ पाठलाग करून मोटारसायकल अडवली. या कारवाईत एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात आला, तर दुसरा आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाला. ताब्यात घेतलेल्या आरोपीने आपले नाव भागवत पंजा शिंदे असे सांगितले असून फरार आरोपीचे नाव बबलू रामा शिंदे असे समोर आले आहे.

तपासादरम्यान संबंधित मोटारसायकल आंबेजोगाई शहर पोलीस ठाणे येथील गुन्ह्याअंतर्गत चोरीची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

### डिकसळमध्ये पाणीटंचाईचा तीव्र प्रश्न...

## दयावान प्रतिष्ठानकडून मोफत टँकर सेवा सुरू




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३० एप्रिल -**

कळंब शहरालगत असलेल्या डिकसळ गावात पाणीटंचाईचा तीव्र प्रश्न निर्माण झाला असून, कळंब नगरपरिषदेने मागील महिन्यापासून पाणीपुरवठा बंद ठेवल्याने नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाकडून कोणतीही पर्यायी व्यवस्था नसल्याने गाव पूर्णतः नगरपरिषदेच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून असल्याचे समोर आले आहे.

एकता नगर, फरीद नगर, अशोक सम्राट नगर, गणेश नगर आणि इस्लामपुरा या भागांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. वाढत्या उन्हामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे हाल अधिकच वाढले आहेत.

> डिकसळ ग्रामपंचायत प्रशासनाकडून पाण्याची कोणतीही व्यवस्था नसताना कळंब नगरपरिषदेच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून असलेल्या ग्रामस्थांना ऐन उन्हाळ्यात नळपट्टी थकीत असल्याचे कारण देत पाणी बंद करण्यात आले. यामुळे डिकसळ ग्रामस्थांचे हाल होत असून, गावकऱ्यांचे वाली कोण? असा सवाल उपस्थित होत आहे.
>
> - **अभय गायकवाड,** सचिव

> 'माझं गाव, माझी जबाबदारी' या भावनेतून जोपर्यंत गावाचा नियमित पाणीपुरवठा सुरू होत नाही, तोपर्यंत आम्ही नागरिकांचे हाल होऊ देणार नाही. टँकरद्वारे प्रत्येक घरापर्यंत पाणीपुरवठा केला जाईल.
>
> - **इम्रान मुल्ला,** संस्थापक अध्यक्ष

या गंभीर परिस्थितीत माझं गाव, माझी जबाबदारी या भावनेतून दयावान प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य इम्रान मुल्ला यांनी स्वतःच्या खर्चातून मोफत पाणी टँकर सेवा सुरू केली आहे. या उपक्रमांतर्गत दररोज १० ते १२ टँकरद्वारे गावातील विविध भागांत पाणीपुरवठा केला जात असून, घराघरापर्यंत पाणी पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या सेवेमुळे अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांकडून या कार्याचे कौतुक केले जात आहे. उपक्रमावेळी अभय गायकवाड व इम्रान काजी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पाणी वितरणात सहभाग घेतला.

## भीमनगरचा 'सक्सेस पॅटर्न' संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी : माजी मंत्री बसवराज पाटील



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० एप्रिल -**

१९४४ मध्ये सुरू झालेली प्राथमिक शाळा असो वा १९५५ मध्ये स्थापन झालेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहर वाचनालय, या संस्थांनी पेरलेल्या विचारांचे आज एका विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. मुरूम येथील भीम नगर वस्तीने केवळ स्वतःचा विकास केला नाही, तर सामाजिक क्रांतीचा एक नवा वस्तुपाठ देशासमोर मांडला आहे, असे गौरवपूर्ण प्रतिपादन माजी मंत्री बसवराज पाटील यांनी केले.

मुरूम येथे आयोजित 'भूमिपुत्र अधिकारी-कर्मचारी स्नेहमिलन' व वस्तीचा इतिहास मांडणाऱ्या भव्य 'स्मरणिकेच्या प्रकाशन सोहळ्या'त अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष बापुराव पाटील मुरूमकर, राजस्थान राज्यपालांचे सचिव राजकुमार मंगेश सागर, साखर आयुक्तालयाचे माजी सहसंचालक डी.आय. गायकवाड, अप्पर निबंधक राजेश सुरवसे, सिद्धार्थ भालेराव, अशोक गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात वस्तीतील नवनियुक्त अधिकारी निखिल लिंबराज मस्के यांची 'सहाय्यक नगर रचनाकार' पदावर निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

याच कार्यक्रमादरम्यान डॉ. आंबेडकर शहर वाचनालयासाठी नगराध्यक्ष बापुराव पाटील यांच्या तर्फे ५०,००० रुपयांचे स्पर्धा परीक्षा संच वाचनालयाचे सचिव अण्णाराव कांबळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मदनलाल गायकवाड यांनी केले. सिद्धार्थ भालेराव, अशोक गायकवाड, राजेश सुरवसे व राजकुमार सागर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जयंत गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. महेश कांबळे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अण्णाराव कांबळे, प्रशांत गायकवाड, प्रणित गायकवाड, आनंद गायकवाड, राहुल गायकवाड, महिंद्र गायकवाड, संदेश सीतापुरे, प्रतीक कांबळे, राजेश कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

### मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

शिराढोण पोलीस ठाण्यात मारहाणीच्या प्रकरणी बबलु उर्फ आशितोष केशव आडसुळ (रा. देवळाली, ता. कळंब) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

खामसवाडी येथील अंबिका हॉटेलमध्ये फिर्यादी संदीप महादेव जाधव यांच्याकडे दारू पाजण्याची मागणी केली. पैसे नसल्याचे सांगितल्याने आरोपीने शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व बिअरच्या बाटलीने मारहाण करून गंभीर जखमी केले, तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार आहे.

## भूम नगरपरिषदेतील अनियमिततेविरोधात नगरसेवकांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.३० एप्रिल -**

नगर परिषदेतील कथित अनियमितता, भ्रष्टाचार व मनमानी कारभाराच्या विरोधात जनशक्ती शहर विकास आघाडीच्या १५ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे. यापूर्वी १७ एप्रिल रोजी सविस्तर निवेदन देऊनही प्रशासनाने दखल न घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.




नगरसेवकांनी घनकचरा व्यवस्थापनातील (मार्च २०२१ ते सप्टेंबर २०२५) कथित भ्रष्टाचाराची चौकशी, देयके थांबविणे, तसेच विविध योजनांतील कामांना सर्वसाधारण सभेचा ठराव न घेता दिलेल्या प्रशासकीय मान्यतेवर आक्षेप घेतला आहे. कसबा क्रीडांगण विकास कामातील नियमबाह्य देयके व नागरोत्थान योजनेतील ११४ कोटींच्या सिमेंट रस्ते कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई, निलंबन व गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने उपनगराध्यक्ष लक्ष्मी साठे यांच्यासह रुपेश शेंडगे, अनिल शेंडगे, नवनाथ रोकडे आदी नगरसेवकांनी उपोषणात सहभाग नोंदविला आहे.

या सर्व तक्रारींकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत जनशक्ती शहर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे

या उपोषणात उपनगराध्यक्ष लक्ष्मी साठे तसेच गटनेते रुपेश शेंडगे, अनिल शेंडगे, नवनाथ रोकडे, रामराजे कुंभार, आबासाहेब मस्कर, चंद्रमणी गायकवाड, विठ्ठल बागडे, शमशाद मुजावर, शीतल गाडे, चंद्रकला पवार, सुनिता वीर, नूरजहाँ मणियार व सुरेखा काळे हे नगरसेवक सहभागी झाले आहेत.


## नळदुर्गमध्ये उष्णतेचा कहर; तापमान ४३ अंशांवर

### वृक्षलागवडच ठरतेय एकमेव उपाय...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० एप्रिल -**

सध्या सर्वत्र वाढत्या तापमानामुळे हाहाकार माजला असून नळदुर्ग शहर व परिसरात तापमान ४० ते ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. या उष्णतेमुळे नागरिक, जनावरे आणि पशुपक्षी सर्वच त्रस्त झाले आहेत. या नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आणि त्यांचे संगोपन हाच प्रभावी उपाय असल्याचे मत व्यक्त होत आहे.

सध्या सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत कडक उन्हामुळे रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. वाढत्या तापमानाचा नागरिकांच्या




आरोग्यावरही गंभीर परिणाम होत असून उष्माघात, अशक्तपणा यांसारख्या तक्रारी वाढताना दिसत आहेत.

सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान नळदुर्ग परिसरातील शेकडो वर्षे जुनी वड, पिंपळ, लिंब, बाभूळ यांसारखी मोठी झाडे तोडण्यात आली. यामुळे पूर्वी सावली देणारा हा परिसर आज पूर्णतः बोडका झाला आहे. दरम्यान, शहरात काही सकारात्मक उपक्रमही राबवले जात आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीने मुख्य रस्त्यालगत, तसेच नगरपालिकेच्या रस्त्यांवर वृक्षलागवड केली आहे. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने आपल्या परिसरात, वृक्षमित्र अमर भाळे यांनी घरासमोर, तर वाहतूक नियंत्रक दीपक डुकरे यांनी बसस्थानक परिसरात झाडे लावून त्यांचे संगोपन केले आहे. या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भावी पिढी सुरक्षित राहावी आणि वाढत्या तापमानावर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी वृक्षलागवड आणि संवर्धन हीच काळाची गरज आहे. अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण उष्णतेला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## धाराशिवमध्ये 'अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा'चा समारोप




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० एप्रिल -**

जलसंपदा विभागाच्या वतीने दि.१५ ते ३० एप्रिल दरम्यान राबविण्यात आलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा'चा समारोप दि.३० एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झाला.

समारोप कार्यक्रमाला जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक राजकुमार मोरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, जलदूत व जलप्रेमी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात जिल्हाधिकारी पुजार यांनी पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित करत शेतकऱ्यांनी 'जलतारा'सारखे उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. तर कृषी अधीक्षक मोरे यांनी पाणी संवर्धनासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमात पंधरवड्यातील उपक्रमांची माहिती देणारी चित्रफीत सादर करण्यात आली.